शके १९४३-४४
जून २०२१ – मे २०२२

# कार्यवृत्त

# ज्ञान प्रबोधिनी
## निगडी केंद्र





अलाईव्ह संस्थेतर्फे
ज्येष्ठ लेखक, दुर्ग व वनस्पती तज्ज्ञ
प्राध्यापक प्र. के. घाणेकर यांच्या हस्ते
'हरित पुस्तक पुरस्कार स्वीकारताना
श्री.शिवराजक्ष पिंपुडे



आ. भाऊंचे पुण्यस्मरण




मुक्तीसोपान विभागातर्फे आयोजित
दिवाळी पहाट कार्यक्रमात सादरीकरण
करताना चिपळूणचे श्री. विशारद गुरव

# ज्ञान प्रबोधिनी

## निगडी केंद्र

# कार्यवृत्त

## शके १९४३-४४

* संपर्क *

**ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय**

निगडी, पुणे - ४११ ०४४.

दूरभाष : ०२० - २७१६८०००

Email : info@jpnvnigdi.org / nigdi@jnanaprabodhini.org.

Website : https://jpnvnigdi.org

# ❋ शाळा समिति ❋

| | |
|---|---|
| संचालक | वाच. गिरीशराव बापट |
| कार्यवाह | श्री. सुभाषराव देशपांडे |
| केंद्रप्रमुख व प्राचार्य | श्री. मनोजराव देवळेकर |
| केंद्रव्यवस्थापक | श्री. आदित्य शिंदे |
| केंद्र प्रशासक | श्री. शिवराज पिंपुडे |
| शिक्षण समिती अध्यक्ष | डॉ. राजीव रानडे |
| संपर्क प्रमुख | श्री. ज्ञानेश्वर सावंत |
| अर्थ कार्यालय प्रमुख | सौ. मधुराताई देव |
| पर्यवेक्षक | श्री. सुधीर कुलकर्णी |
| पूर्व-माध्यमिक विभाग प्रमुख | श्री. शिवराज पिंपुडे |
| पर्यवेक्षिका : माध्यमिक इंग्रजी | सौ. कल्याणीताई पटवर्धन |
| मुख्याध्यापिका : प्राथमिक गट १ (१ली, २री) | सौ. मीनाताई दीक्षित |
| मुख्याध्यापिका : प्राथमिक गट २ (३री, ४थी) | सौ. सुवर्णाताई विसे |
| प्राथमिक शिक्षण समन्वयक | सौ. आरतीताई बिजुटकर |
| विभागप्रमुख : पूर्वप्राथमिक | सौ. वैशालीताई तळेगांवकर |
| गुरुकुल | श्री. आदित्य शिंदे |
| क्रीडाकुल | श्री. मनोजराव देवळेकर |
| संगणक | सौ. अनुजाताई भंडारी |
| मुक्तिसोपान | सौ. शीतलताई कापशीकर |
| अटल धडपडालय | श्री. कल्पेश कोठाळे |
| जैवतंत्रज्ञान विभाग | सौ. संगीताताई कुलकर्णी |
| संवेद विभाग | सौ. अस्मिताताई बारसावडे |
| औपचारिक अभिरुची प्रमुख | सौ. विद्याताई उदास |
| अनुभव अभिरुची प्रमुख | सौ. अनुजाताई भंडारी |

## मंत्रणा समिती

मा. वाच. गिरीश बापट    मा. श्री. यशवंत लिमये

मा. श्री. ज्ञानेश्वर सावंत    मा. श्री. मनोज देवळेकर

# अनुक्रमणिका


## औपचारिक शिक्षण विभाग

पूर्व प्राथमिक विभाग

प्राथमिक गट १ (१ली, २री)

प्राथमिक गट २ (३री, ४थी)

पूर्व माध्यमिक विभाग

माध्यमिक विभाग - मराठी

माध्यम विभाग - इंग्रजी

गुरुकुल

क्रीडाकुल

## अनुभव शिक्षण विभाग

संगणक

मुक्तिसोपान

अटल धडपडालय

ग्रंथालय

## संशोधन विभाग

जैवतंत्रज्ञान

संवेद

## निगडी केंद्र

## अभिरुची

## संघटन विभाग

युवक

युवती

पालक महासंघ

स्नातक संघ

## संलग्न विभाग

मातृमंदिर विश्वस्त संस्था

चिपळूण विस्तार कार्य



| | |
|---|---|
| प्रकाशक | : प्रशासक, ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्र |
| संपादन मंडळ | : सौ. वृंदा गाडगीळ |
| मुद्रक | : प्रबोध संपदा १२४८, शुक्रवार पेठ, सुभाष नगर, गल्ली क्र. ५, पुणे - ४११०३० |
| प्रकाशन दिनांक | : सौर ३० अश्विन शके १९४४ २२/१०/२०२२ |

# प्रस्तावना

गत शैक्षणिक वर्ष हे कोरोनाच्या सावटातून बाहेर पडण्याचे वर्ष होते. तरी त्यासाठी फेब्रुवारी महिना उजाडावा लागला. त्यामुळे या शैक्षणिक वर्षाचा आढावा घेताना ऑनलाईन व प्रत्यक्ष स्वरूपात झालेले कामकाज अशा दोन्ही स्तरावर घ्यावा लागेल. ऑनलाइन शाळा चालवण्यात अध्यापक माहीर झाले होते तर विद्यार्थी त्यांच्यापुढे दोन पावलं होते. कोरोनाने सगळ्यांना तंत्रस्नेही तर बनवलेच पण शिक्षण क्षेत्रातील सर्वांनाच चाकोरी बाहेरचा विचार करण्यास भाग पाडले यात शंका नाही.

निगडी केंद्रासाठी हे वर्ष अनेक अर्थाने संस्मरणीय ठरले. २१ जून रोजी हर्षदराय रतीलाल कारिआ इमारतीच्या चौथ्या मजल्याचा उद्घाटन सोहळा पार पडला. हितचिंतक मा. मोहनराव गुजराथी, श्री. दत्तात्रय निकम यांच्या हस्ते नेमबाजी, योग, रायफल शूटिंग व कब्बडी या क्रीडा प्रकारांच्या सुसज्ज दालनांचे उद्घाटन झाले. याच दिवशी संध्याकाळी तिसऱ्या मजल्यावरील कलादालनांचे उद्घाटन कलाक्षेत्रातील आपल्याच माजी विद्यार्थ्यांच्या हस्ते करण्यात आले. या विस्तारित इमारतीचा मुख्य उद्घाटन सोहळा २२ जून रोजी संपन्न झाला. हितचिंतक मा. नितीनभाई कारिआ मा. पार्थ मुखर्जी, मा. संजय कुलकर्णी, मा. अनंत चिंचोलकर व ज्ञान प्रबोधिनीचे संचालक मा. श्री. गिरीशराव बापट हे कार्यक्रमासाठी उपस्थित होते. विद्यालयातील शिक्षण प्रक्रिया प्रभावी होण्याच्या दृष्टीने या सुविधा लाभदायक ठरत आहे. पालक तसेच परिसरातील नागरिकांनाही या सुविधा उपयुक्त ठरत आहेत.

कोरोना पश्चात सुमारे दीड वर्षांनंतर सप्टेंबर महिन्यात ९,१० वी चे विद्यार्थी प्रथम प्रत्यक्ष शाळेत येऊ लागले. तेव्हा प्रत्यक्ष भेटण्याचा आनंद अध्यापक-विद्यार्थी सर्वांनाच होता. पण अभ्यासाच्या- शाळेच्या मुलभूत सवयी विद्यार्थी हरवून बसले आहेत असे जाणवले. एका जागेवर ३० मि. स्थिर बसणे, आवाजातील- वागण्यातील नम्रता, शांतता- एकाग्रता, वर्गात बोलणे-जागा सोडणे यासाठी परवानगी घेणे, सामुहिक पाठांतर इ. अनेक गोष्टी मुले विसरले होती. त्यातून मागे पडलेल्या पाठ्य विषयांकडे पोहोचणे अवघड जात होते. माध्यमिकच्या सर्व अध्यापकांशी चर्चा करून यावर एक उपाय दुसऱ्या सत्रात सुरु केला. वेळापत्रकात आवश्यक तो बदल करून ६० मिनिटांचा पहिला परीपाठाचा तास एकत्र सभागृहात घेण्याचे ठरले. शारदास्तवन-राष्ट्रगीत-प्रतिज्ञा यानंतर दिनामाहात्म्याचा उतारा वाचन-अध्यापकांचा संवाद- मनाच्या श्लोकांच्या आधारे एकेका रागाची ओळख-शिक्षण- प्रबोधन गीत शिकणे- एका अध्याय म्हणणे अथवा शिकणे- त्यानंतर प्राचार्यांचा अथवा पर्यवेक्षकांचा रोज मुलांशी संवाद आणि शेवटी पसायदान असा भरगच्च कार्यक्रम सुरु झाला. मुक्तीसोपान संगीत विभागाची गायन आणि वाद्यवृन्दासाठी भरभक्कम साथ यातून हा परिपाठ अत्यंत प्रभावी होत गेला. पुढे सर्वच विभागातून आता तो घेतला जात आहे. सर्वजण एकत्र, सोबत सर्व अध्यापक, प्रभावी प्रार्थना-उत्तम नियोजन -विविध विषयांवरील रोजचा संवाद- सामुहिक पद्य-श्लोक यांचे उच्चारण यातून मुलांच्या-अध्यापकांच्या वर्तनात

अमुलाग्र बदल होत आहे. दिवसभराचे शाळेतील वातावरणच बदलून गेल्याचे जाणवत आहे. गेल्या वर्षीची ही एक मोठ्ठी मिळकत आहे असे नक्कीच म्हणावेसे वाटते.

नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण डोळ्यासमोर ठेवून प्राथमिक विभागांच्या बाबत एक महत्त्वाचा निर्णय करण्यात आला. यापूर्वी प्राथमिक मराठी व प्राथमिक इंग्रजी या दोन विभागात कामकाज चालायचे. त्याऐवजी आता वयोगट लक्षात घेऊन पहिली - दुसरी प्राथमिक मराठी व इंग्रजी एकत्र तर तिसरी - चौथी प्राथमिक मराठी व इंग्रजी एकत्र असे दोन गट करण्यात आले. नवीन इमारतीत प्राथमिक विभागासाठी स्वतंत्र मजला झाल्याने मुलांचा वयोगट लक्षात घेऊन विविध प्रकारच्या सुविधांची निर्मिती करणे शक्य झाले.

हे वर्ष विद्यालयाने अभिरुची वर्ष म्हणून साजरे केले. औपचारिक व अनुभव अभिरुची अशा दोन गटात इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारचे उपक्रम घेतले गेले. औपचारिक अभिरुचीत ११ तर अनुभव अभिरुची १६ विषयांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या आवडीच्या विषयात अध्यापकांसह प्रयोग करत रमून जावे आणि त्या विषयाच्या सर्व बाजूंचे दर्शन विद्यार्थ्यांना घडावे अशी योजना करण्यात आली होती. परीक्षेसाठी नव्हे तर आपल्या आनंदासाठी, आपल्या आवडीच्या विषयाचे मुक्त शिक्षण मुलांना घेता आले पाहिजे, एखाद्या विषयात सातत्याने सखोल अभ्यास करायचा असतो, हा संस्कार शालेय वयातच करण्यासाठी ही अभिरुची योजना.

पालक व स्नातक संघांनीही आपापल्या कामाची चढती कमान ठेवली. स्नातक संघाच्या आरोग्य गटांनी वेल्हा व ज्ञानप्रबोधिनीच्या हरळी केंद्रावर जाऊन आरोग्य शिबिरे घेतली महिला पुरुष बालके यांची मोहोत वैद्यकीय तपासणी करून त्यांना औषधे देण्यात आली. प्रतिवर्षी होणाऱ्या पालक क्रीडा स्पर्धांच्या दशकपूर्ती निमित्त यंदाच्या स्पर्धा भव्य स्वरुपात झाल्या. विशेष म्हणजे पुणे प्रशालेसह परिसरातील अन्य ३ शाळांमधील पालकांच्या संघांनी थ्रो बॉल, व्हॉली बॉल, क्रिकेट इ. स्पर्धात सहभाग घेतला. तर सर्व स्पर्धांचे 'युट्यूब' लाईव्ह प्रक्षेपण करण्यात आले. सामुहिक पराक्रमाच्या संस्काराचा उपक्रम म्हणून सुमारे १०५० पालक आणि त्यांचे पाल्य ३०० विद्यार्थ्यांची यांनी एकत्र मिळून दि. ६ फेब्रुवारी २२ रोजी केलेली सिंहगड मोहीम, ही पालक संघाच्या आजवरच्या संघटनेचे एक प्रात्यक्षिकच म्हणता येऊ शकेल.

'तव स्मरण संतत, स्फुरणदायी आम्हां घडो' या भावनेने १६ फेब्रुवारी २२ रोजी कै. वामनराव अभ्यंकर तथा भाऊंचा प्रथम पुण्यस्मरणाचा कार्यक्रम संपन्न झाला. यानिमित्ताने समर्थभक्त मोहनबुवा रामदासी यांच्या प्रवचनाचे आयोजन करण्यात आले होते. भाऊंच्या विचारांचा लाभ सर्वांना सतत होत राहावा याकरिता, त्यांच्या 'चिंतनिका' या पुस्तकाच्या पुढील आवृत्तीचे प्रकाशन करण्यात आले.

आदरणीय भाऊंच्या स्मृती मनात ठेवून, त्यांनी घालून दिलेला मार्ग अधिक प्रशस्त करण्याचा प्रयत्न करीत करीत निगडी केंद्राची सगळी वाटचाल सुरू आहे, याचा आनंद वाटतो.

श्री. मनोज देवळेकर<br>(केंद्रप्रमुख)

शैक्षणिक विभाग

# पूर्व प्राथमिक विभाग



## * स्नेहसंमेलन- वर्गशः सादरीकरण

आनंदी आनंद गडे, जिकडे तिकडे चोहीकडे!

असच काहीसं वातावरण बालभवन आणि मनोहर सभागृहात पाहायला मिळाले. कारण होते मुलांचे वर्गशः सादरीकरण. म्हणजे पूर्व प्राथमिक विभागाचे स्नेहसंमेलन. एका दिवशी, एक बालवर्ग आणि एक शिशुवर्ग असे वर्गशः सादरीकरण दिनांक ४ एप्रिल ते ११ एप्रिल यादरम्यान घेण्यात आले. सर्व कार्यक्रमासाठी पाहुणे म्हणून विद्यालयातीलच काही अध्यापक, माजी विद्यार्थी व पालक उपस्थित होते. विशेष म्हणजे हे सर्व अभ्यागत कला क्षेत्रात विशेष अभिरुची असणारे होते. शिशुवर्ग आणि बालवर्ग दोन्ही सत्रांच्या सर्व कार्यक्रमाची जबाबदारी ही पालकांनी घेतली होती यामध्ये सूत्रसंचालानापासून ते फोटो पर्यंत सर्व जबाबदारी आपआपल्या ताईंच्या मार्गदर्शनाने पालकांनी समर्थपणे पेलली याचा आनंद वाटतो. याचबरोबर मुलांच्या सादरीकरणासाठी गाणं, गोष्ट, नाटक याची निवड करण्यापासून ते त्याचा सराव घेण्याचा मोलाचा वाटा हा फक्त पालकांचाच होता. म्हणूनच हे संमेलन खऱ्या अर्थाने पालक-पाल्य-शिक्षक यांचे होते असे म्हणायला हरकत नाही.

सादरीकरणात मुलांनी गाण्यांवर नाच, गोष्ट सांगणे, स्वतः गाणं म्हणणे, अभिनयासह गोष्ट सादर करणे, एकपात्री, नाटुकली अशी विविधरंगी सादरीकरणं केली. यामध्ये काही पालकांनीही आपल्या पाल्यांसोबत उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. वैयक्तिक सादरीकरणानंतर सर्व मुलांनी एकत्र व्यासपीठावर जाऊन आपल्या मित्रमैत्रिणींसोबत एकत्र नृत्य करणाचा आनंदही घेतला. कार्यक्रमासाठी उपस्थित सर्व पाहुण्यांनी मुलांच्या या कलाविष्काराचे खूप कौतुक केले आणि मुलांना, पालकांना शुभेच्छा दिल्या. मुलांचा भाषिक विकास होणे, आत्मविश्वास वाढणे, त्यांना सादरीकरणाची संधी देऊन त्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करुन देणे आणि प्रकल्पाधारित अभ्यासपद्धतीचे नकळतपणे मूल्यांकन, निरीक्षण करणे अशी उद्दिष्ट्ये समोर ठेवून या स्नेहसंमेलनाचं आयोजन केलं होतं. आणि ते खऱ्या अर्थाने पूर्ण झालंय असं वाटतं. यात एकूण १४ वर्गाचे वैयक्तिक सादरीकरण झाले त्यात ३१३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यावर्षी प्रथमच एवढ्या लहान वयातच मुलांनी मोठ्या व्यासपीठावर वैयक्तिकरित्या

सादरीकरण केले हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरले. अशाप्रकारे खूप आनंदात आणि नवी उमेद मनात ठेवून शैक्षणिक वर्षाची सांगता झाली.

## ❊ बालसभा

दूरस्थ पद्धतीने मुले शाळा अनुभवत असताना मुलांची शाळेची गोडी वाढावी यासाठी बालसभेसारखा उपक्रम आम्ही वर्षभर राबवला. यामध्ये मुलांसाठी गाणी गोष्टींवर अधिक भर दिला. अनेकदा नुसत्या गोष्टी सांगून मुलांना कंटाळा येतो म्हणून दरवेळी वेगवेगळ्या पद्धतीने गोष्ट सांगण्याचा प्रयत्न सर्व अध्यापकांनी केला. यात प्रामुख्याने राजाई व कृष्णाच्या गोष्टीवर आधारित पपेट शो, चीलू बाळाची गोष्ट व मूळ्याच्या गोष्टीवर आधारित गोष्टीचे नाट्यीकरण केले. गणेशोत्सवाला विशेष करून गणपतीची छान छान गाणी अध्यापकांनी सादर केली. मुलांच्या आवडीचा विषय म्हणजे टी. व्ही. वरील कार्टून याच कार्टून मालिकांची गाणी, बालविश्व, कोड्यांवर आधारित गाणे हे असे बरेच विषय घेऊन मुक्तीसोपान विभागातील अध्यापकांनी आमच्या बालचमुंसाठी संगीतसभा हा कार्यक्रम सादर केला. मुले ऑनलाईन उपस्थित असूनही गाण्यांचा मनसोक्त आनंद घेत होती. याशिवाय दर महिन्याला ज्या मुलांचे वाढदिवस होते त्या मुलांसाठी विशेष उपासना घेतली. वाढदिवसाचे मराठी व संस्कृत गाणे त्यांच्यासाठी म्हणत ऑनलाईन औक्षणही केले. पालकही यासर्व बालसभांना आवर्जून उपस्थित होते. सर्व कार्यक्रमांना भरभरून प्रतिसाद देत होते. अर्थातच हे सर्व ऑनलाईनच! याचा परिणाम म्हणजे मुलांनीही ताईंच्या वाढदिवसाला वाढदिवसाचे मराठी व संस्कृत गाणे म्हणून ताईंना शुभेच्छा दिल्या. ही भेट सर्वच ताईंसाठी खूप मौल्यवान ठरली.

## ❊ अध्यापक प्रशिक्षण

दिनांक १२ ऑगस्ट २०२१ रोजी स्वातंत्र्य दिनाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त अध्यापकांसाठी संविधान हा विषय धरून त्यातील नागरिक संवाद याबद्दल मार्गदर्शनपर सत्र आयोजित केले. सत्रासाठी म्हणून मा.भक्ती भावे यांना वक्ते म्हणून बोलावले होते.

यात पूर्व प्राथमिक विभाग व प्राथमिक गट १,२ या विभागातील ३५जण यात सहभागी होते अशा प्रकारची अन्य काही प्रशिक्षणेही घेतली. यात पुढील प्रशिक्षणांचा समावेश होता.

| दिनांक | विषय | वक्ते |
|---|---|---|
| २६ मार्च २०२२ | उपासनेचे महत्त्व | मा. मनोजराव देवळेकर |
| २६ फेब्रुवारी २०२२ | संकल्पना दृढीकरण | मा. वनिताताई आपटे |
| ४ मे २०२२ | टीम बिल्डींग (गट बांधणी) | मा. शिल्पाताई संधाने |

## ❊ सर्वांचा आवडता सण - दिवाळी

सर्वांचा आवडता सण म्हणजे दिवाळी त्यातही बालभवनची मुले या सणांची आतुरतेने वाट बघत असतात. शैक्षणिक वर्षातील प्रथम सत्राचा शेवट म्हणून आणि दिवाळीची मोठी सुट्टी घेण्यासाठी मुले घरी जाणार म्हणून दिवाळी कार्यक्रम हा बालभवनमध्ये फार उत्साहात आणि मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. यावर्षी तो दूरस्थ पद्धतीने पण यथासांग साजरा झाला. २९ ऑक्टोबर २०२१ रोजी पूर्व प्राथमिक विभाग बालभवन येथे या कार्यक्रमासाठी आवश्यक ती वातावरण निर्मिती केलेली होती. संपूर्ण बालभवन हे आकाश दिवे, पणत्या, रांगोळ्या आणि विशेष करून फुग्यांची सजावट करून सजवले होते. यात दिवाळीच्या माहितीवर आधारित दिवाळीच्या पाचही दिवसांची वेगवेगळी साहित्य मांडणी व सजावट केली होती. विशेष म्हणजे धन्वंतरीच्या आणि गाय वासराच्या मूर्तीसकट सर्व गोष्टी मुलांना दाखवता आल्या. ही सर्व सजावट दाखवत त्या दिवसांचे महत्त्व व माहिती मुलांना सांगितली. फराळाची ताटली व चक चक चकली ही गाणी अभिनयासह मुलांसमोर सादर केली. मुलेही दूरस्थ असूनही खूप उत्साहाने व आनंदाने हे सर्व अनुभवत होती. प्रत्यक्ष दिवाळी कार्यक्रमापूर्वी मुलांना दिवाळीचा फराळ का करतात? दिवाळीला फटाके का उडवायचे नाहीत? यासंबंधी चर्चा केली होती. याच धरतीवर विभागप्रमुख मा. वैशालीताईंनी सर्व पालकांशी व मुलांशी संवाद साधला. दिवाळीच्या खूप शुभेच्छा देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

## ❊ वर्गभेट

पूर्व प्राथमिक विभागातील लहान व मोठ्या अशा दोन्ही गटांतील चिमुकल्यांनी आपआपल्या गटानुसार शाळेला जवळ जवळ दोन वर्षांनी भेट दिली. या वयोगटातील मुलांच्या शिक्षणाची सुरुवात इथूनच होत असते त्यामुळे शाळा नेमकी कशी असते हे त्यांनी प्रत्यक्ष अनुभवलेच नव्हते आणि ते अनुभवण्याची सर्वांची खूप इच्छा होती. सर्व अध्यापकही मुलांना भेटण्यासाठी उत्सुक होते. या मुलांच्या स्वागताची जय्यत तयारी केलेली होती. मुलांसाठी क्षेत्रानुसार वर्ग मांडणी केली होती. यामध्ये परिसरचे विविध प्रयोग, कृती उपक्रम, शारीरिक/कारक कौशल्य या विषयामध्ये विविध खेळ तसेच जीवन व्यवहारातील चाळणे, कुटणे, ताक घुसळणे या व यासारख्या मुलांना घरी करायची खूप इच्छा असूनही करायला मिळत नाहीत अशा कृती प्रत्यक्ष साहित्य वापरून अनुभवण्यास मांडल्या होत्या. वाचन गणन लेखनमध्ये सापशिडी, वस्तू मोजणे, शब्दरचना असे साहित्य मांडले होते. भाषनुभव यामध्ये गोष्टी तयार करणे, पपेट, विविध पझल्स जोडणे, काही बौध्दिक खेळांची मांडणी केली होती. कलानुभव यामध्ये पिस्त्याच्या सालीची रचना, आईस्क्रीम काड्यांपासून फोटोफ्रेम बनवण्याचा आनंद मुलांनी घेतला. त्याचबरोबर मुलांना खेळण्यासाठी विविध खेळण्यांचीही मांडणी केली होती. मुलांनी प्रत्येक वर्गात जाऊन अतिशय उत्सुकतेने सर्व सर्व गोष्टींमध्ये भाग घेऊन आनंद लुटला. मुलांना बालभवन मध्ये असणाऱ्या पद्मदुर्ग या किल्ल्याची माहिती सांगितली. किल्ल्याभोवती उभे राहून

घोषणा देताना मुले उत्साहाने सहभागी झाली. ताईंनी सर्व मुलांना औक्षण करुन छान खाऊ दिला तसेच जम्मतघर मधून दोन पुस्तकेही वाचण्यासाठी देण्यात आली. खाऊ घेऊन मुले आनंदाने घरी परतली मात्र आपली शाळा कधी सुरु होणार असा प्रश्न विचारतच!!!

## ❊ संस्कृत संभाषण

पूर्व प्राथमिक गटात असणाऱ्या बालकांच्या वयोगटात मुलांच्या जिभेला योग्य वळण मिळावे यासाठी संस्कृत संभाषण हा उपक्रम राबवला. या उपक्रमांतर्गत दर महिन्याला एक या प्रमाणे दर शुक्रवारी संस्कृत भाषेतील श्लोक, गाणी मुलांना पाठवत होतो. दररोज ५ नवीन संस्कृत शब्द आणि त्याचा अर्थ मुलांना सांगितला जात होता. यामध्ये प्राण्यांची नावं, पक्ष्यांची नावं मुलांना संस्कृतमध्ये सांगितली. १ ते १०अंक शिकवले. 'नमो नमः, मम नाम' यासारखी छोटी वाक्ये मुलांना शिकवली. या सर्वांचे योग्य उच्चारणासह मुलांचे चांगले पाठांतर व्हावे या उद्देशाने मुलांना प्रत्येक शब्दाचे योग्य उच्चारण शिकवणारे व्हिडिओ तयार करून पाठवले गेले. त्यातून मुलांना संस्कृत उच्चार चांगल्या पद्धतीने येऊ लागले. त्याचबरोबर गीतेच्या १२वा अध्यायातील १० श्लोक पाठ करण्याचा प्रयत्न मुलांनी केला.

✷ ✷ ✷

### ❊ अभिनंदन ❊

**इयत्ता नववीची विद्यार्थिनी भूमिका महाजन हिने ABCUS च्या सातव्या पातळीवर रौप्यपदक मिळवले.**

### ❊ शिवण अभिरूची ❊

**विद्यार्थी मनोगत - कु. सोनाली चव्हाण इयत्ता नववी अ.**

**नमस्कार**

**शिवणाची आधीपासूनच खूप आवड होती त्यामुळे अभिरुचीमध्ये शिवण हा विषय घेतला. मला वेगवेगळे टाके घालून बघायला आवडतात त्याचे वेगवेगळे नमुने करून बघायला आवडतात. आणि माझ्या आवडीला मंजिरीताई व वृंदाताईंनी प्रोत्साहन दिले त्यामुळे आणखी जास्त उत्साह आला. या वर्षात आम्ही वेगवेगळ्या प्रकारचे मास्क शिकलो. तसेच लोड व आसन शिकलो. मशीन चालवायला सुद्धा आम्हाला खूप आवडायचे. ताईंनी शाळेत शिकवलेले मी होस्टेलच्या मुलींना शिकवायचे. दोन ठिकाणी क्षेत्रभेटी झाल्या. त्यातून खटला वर्क सारखी एक वेगळीच नवीन कला पाहायला मिळाली. त्याबद्दल माहिती मिळाली. पुढील वर्षी सुद्धा जर अनुभव अभिरुची असेल तर मी शिवणकलाच घेईन.**

# प्राथमिक विभाग
# गट १
(१ली, २री)



## ❋ प्राथमिक विभाग नवीन वास्तू उद्‌घाटन सोहळा

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार सन २०२१- २०२२ या शैक्षणिक वर्षापासून मुलांच्या वयोगटानुसार प्रत्येक मुलांमध्ये असणाऱ्या क्षमता व वैशिष्ट्ये लक्षात घेऊन त्यांचा शारीरिक, मानसिक, भावनिक, बौद्धिक विकास करता यावा यासाठी पहिली, दुसरीचे या इयत्तेचे मराठी माध्यमाचे तीन वर्ग व इंग्लिश माध्यमाचा प्रत्येकी एक एक वर्ग जोडून प्राथमिक विभाग गट क्रमांक एक तयार केलेला आहे. याच प्रकारे तिसरी, चौथीच्या वर्गाचा देखील गट क्रमांक दोन तयार केला आहे. या सर्व मुलांसाठी नवीन स्वतंत्र इमारत बांधण्यात आली. या इमारतीचा उद्‌घाटन सोहळा मंगळवार दि. २२ जून रोजी श्री. नितीनभाई कारिआ, श्री. पार्थ मुखर्जी, श्री.संजय कुलकर्णी, ज्ञान प्रबोधिनीचे संचालक मा.गिरीशराव बापट यांच्या हस्ते संपन्न झाला. या इमारतीमुळे प्राथमिक विभागाची एक स्वतंत्र वास्तू (१ मजला) तयार झाला. प्रत्येक वर्गात वेगवेगळ्या आकारांचे रंगीबेरंगी बाक व खुर्च्या आहेत. ज्यांची रचना मुलांच्या गरजेनुसार व आवडीनुसार बदलता येऊ शकते. या वयोगटाचा विचार करून मुलांना दृक्‌श्राव्य माध्यमातून विविध अनुभव देता यावेत यासाठी प्रत्येक वर्गात आधुनिक तंत्रज्ञान असलेल्या सोयी येथे केलेल्या आहेत. अशा प्रकारे सर्व सोयींनी सुसज्ज असे वर्ग हे या नवीन वास्तूचे वैशिष्ट्ये आहे.

## ❋ विद्यार्थी विविध गुणदर्शन - ऑनलाईन सादरीकरण

श्रीगणेश हा लहान मुलांचा अतिशय आवडता बाप्पा आहे. गेली दोन वर्षे कोरोनामुळे शाळा बंद आहेत, मुले घरात कोंडली गेली आहेत अशा परिस्थितीत गणेशोत्सवानिमित्त मुलांना स्वतःमधील गुण दाखवून ऑनलाईन अभिव्यक्त होण्याची संधी मिळावी, मुलांमधील कलागुण वाढावेत, मुलांना आनंद मिळावा म्हणून गणपती हा विषय देऊन त्यावर आधारित गोष्ट, गाणे, स्तोत्र, नृत्य, नाट्य यापैकी कोणत्याही आवडत्या एका प्रकारात मुलांनी ऑनलाईन सादरीकरण करायचे ठरले होते. पालकांनी त्याचा व्हिडिओ बनवून वर्गशिक्षकाकडे पाठवला होता. या सर्व व्हिडिओचे वर्गशिक्षकांनी एकत्रीकरण केले. गटातील इतर मुले व पालकांसमोर दि.२ ऑक्टोबर रोजी ऑनलाईन सादरीकरण

होते. यासाठी प्रत्येक गटातील पालक प्रतिनिधींचे विशेष सहकार्य लाभले. हे सादरीकरण वर्गशः व ऑनलाईन केल्याने मुले स्वतःचे तसेच आपल्या मित्र मैत्रिणींचे व्हिडिओ आपल्या सर्व कुटुंबासमवेत पाहू शकली. यामुळे पालकांना स्वतःच्या मुलांमधील कलागुण समजण्यास मदत झाली. हा उपक्रम आवडला आहे असा प्रतिसाद बऱ्याच पालकांनी फोन व मेसेजच्या माध्यमातून नोंदवला आहे.

## ✻ पालक पाल्य सादरीकरण

दि. १४ नोव्हेंबर रोजी बालदिनानिमित मुलांमधील आत्मविश्वास वाढवणे, सुप्त गुणांचा विकास करणे, पालकांना आपल्या मुलांमधील क्षमता समजणे व भरपूर आनंद मिळवणे अशा विविध उद्देशाने पालक पाल्य ऑनलाईन सादरीकरणाचे आयोजन करण्यात आले होते. याच्या सविस्तर सूचना ऑक्टोबरमधील वर्गशः पालक बैठकीत पालकांना दिल्या गेल्या होत्या. त्यानुसार पालक व मुलांची तयारी सुरु झाली होती. याचा वर्ग शिक्षक आढावा घेत होते. बुधवार दि. २४ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर या कालावधीत पहिली, दुसरीच्या आठही गटातील इच्छुक पालक व पाल्यांचे ऑनलाईन सादरीकरण झाले. यात पहिलीच्या चार गटातील एकूण ५० व दुसरीच्या चार गटातील एकूण ५६ अशी एकूण १२६ सादरीकरणे केली गेली. ही सादरीकरणे करताना पालक व पाल्यामध्ये खूप उत्साह जाणवला. सादरीकरणाचे अनेक नवनवीन प्रकार पहायला मिळाले. सादरीकरणासाठी आवश्यक साहित्याचा वापर केलेला दिसून आला. पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला. पालकांना स्वतःच्या मुलांमधील कलागुण व क्षमता समजल्या. मुलांना सादरीकरणाची तयारी करताना आई बाबांचा सहवास लाभला यामुळे मुले खूप खूश होती.

## ✻ उन्हाळी शिबिर

या वर्षी प्रथमच इयत्ता दुसरीच्या मुलांसाठी त्यांच्यामधील समूहभावनेचा विकास करणे, नवीन गोष्टींचा अभ्यास करता येणे, परिसराचे बारकाईने निरीक्षण करता येणे अशा विविध हेतूने या उन्हाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात परिसर निरीक्षण, कथाकथन, हस्तकला सत्रांचे आयोजन केले होते. दुसरीची सर्व मुले मोठ्या उत्साहाने तिन्ही सत्रात सहभागी झाली होती परिसर निरीक्षणाच्या प्रथम सत्रात बागेत जाताना व येताना आजूबाजूच्या परिसराचे बारकाईने निरीक्षण करणे व बागेतील विविध खेळ खेळण्याचा मनसोक्त आनंद मुलांनी घेतला. यात मुलांना परिसरातील विविध झाडांची पक्ष्यांची, आवाजांची ओळख झाली. मुले यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे आपापल्या ताईंना देत होती. कथाकथनाच्या दुसऱ्या सत्रात सौ. तृप्तीताई दिकोंडा यांनी मुलांना कथाकथनाचे विविध प्रकार सोप्या शब्दांत स्पष्ट केले तसेच शब्दांचा वापर न करता एखादे वाक्य किंवा समोरच्या मुलांशी संवाद कसा साधता येईल याचे प्रात्यक्षिक मुलांकडून करुन घेतले. हस्तकलेच्या तिसऱ्या सत्रात सौ. शैलजाताई यांनी मुलांना घोटीव कागदापासून फोटोफ्रेम कशी तयार करायची हे स्वतः करुन दाखवले व मुलांकडून फोटोफ्रेम करूनही घेतल्या. मुलांनी अतिशय सुंदर व आकर्षक अशा

फोटोफ्रेम तयार केल्या. शिबिरात मुलांना शाळेकडून आठवण म्हणून एक भेटवस्तू देण्यात आली. या सर्व शिबिराचे नियोजन सौ. उर्मिलाताई यांनी केले होते.

## ❊ कार्यपत्रकांचे नियोजन

कोरोनामुळे मार्च २०२० ते जून २०२१ या काळात शाळेत न आलेल्या मुलांचा अभ्यास ऑनलाईन घेणे हे शिक्षकांपुढील एक आव्हान होते. या काळात मुले झूम मिटींग हे तंत्र वापरुन शिकण्यात हुशार झालेली होती. श्रवण, भाषण कौशल्याचा विकास चांगल्या प्रकारे झालेला दिसत होता. परंतु वाचन व लेखन कौशल्याचा विकास करणे, मुलांच्या संकल्पना दृढ करणे या दोन गोष्टी करणे अत्यंत कौशल्याचे काम होते. त्यात वेळेची मर्यादा होती. अशावेळेस प्रत्यक्ष ऑनलाईन शिकवताना संकल्पना स्पष्ट करण्यावर भर देण्यात आला. मराठीचा जोडाक्षरे हा भाग अभ्यासक्रमात पहिलीत शिकवायचा नाही असे ठरले तसेच पाढे पाठांतर सुद्धा पहिलीत घ्यायचे नाही असे नक्की केले. पाढे पाठांतर व जोडाक्षरे हा भाग इयत्ता दुसरीत शिकवायचे असे ठरवले. त्याप्रमाणे मुलांचा अभ्यास सुरु झाला आणि सरावासाठी मुलांना रोज कार्यपत्रक तयार करुन पाठवायचे ठरले. पहिली आणि दुसरीच्या आठ वर्गावर १०० वाचनपत्रक व ४० श्रुतलेखन पत्रके ऑनलाईन पाठवली. यासाठी पालकांनी आम्हाला खूप छान सहकार्य केले.

### हस्ताक्षर पत्रक

मुख्याध्यापिका सौ. मीनाताई दीक्षित यांच्या 'सुंदर माझे अक्षर' या उपक्रमांतर्गत पहिली व दुसरीच्या आठ वर्गावर वर्षभरात ८० हस्ताक्षरपत्रके ऑनलाईन पाठवण्यात आली. त्यामुळे अक्षरांचे अवयव आणि अक्षर काढण्याचा क्रम पालकांना समजला. घरी मुलांचा छान सराव झाला. पालकांनी त्याबद्दल पालक बैठकीत आनंद व्यक्त केला. पालकांनी घरी मुलांकडून सराव करून घेतल्याने मुले वळणदार अक्षरात लिहू लागलेली आहेत. प्रत्यक्ष शाळेत आल्यावर मुलांच्या वह्या पाहिल्या तेव्हा ९०% मुलांचे अक्षर वळणदार आहे असे लक्षात आले. त्यामुळे हा उपक्रम ऑफलाईन शाळेत दरवर्षी घेण्याचे निश्चित केले.

✸✸✸

### ❊ अभिनंदन ❊

**हेरिटेज फाऊंडेशन ऑफ आर्ट आणि कल्चर, बंगलोर तर्फे आयोजित आंतरशालेय नृत्य स्पर्धेत पहिली मोगरा गटातील *कु. रितू गोखले* हिला कथ्थक नृत्य सादरीकरणात पाचवे पारितोषिक मिळाले आहे. ही स्पर्धा एप्रिल २०२२ मधे घेण्यात आली. यात एकूण ९३ शाळांनी सहभाग घेतला होता.**

# प्राथमिक विभाग
# गट २
(इ. ३री – ४थी)



## ✻ विषय वर्गरचना

हा एक दीर्घकालीन उपक्रम विभागात होत आहे. इयत्ता तिसरी व चौथीसाठी गेली तीन वर्षे आपण ‘विषय वर्ग’ रचना हा उपक्रम राबवत आहोत. आवडीच्या औपचारिक विषयात म्हणजेच मराठी, गणित, परिसर या विषयात देखील विद्यार्थ्यांमध्ये गोडी निर्माण करता यावी. विषयाच्या गतीनुसार त्यांना पुढे नेता यावे. ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विषयवार वर्ग रचनेची संकल्पना पुढे आली आणि त्याचे नियोजन व कार्यवाही सुरु झाली.

त्या त्या विषयांसाठी त्या त्या वर्गात विविध उपक्रम राबवले गेले. सखोल ज्ञान देण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे त्या विषयासाठी विविध कार्यशाळा आयोजित केल्या. वेगवेगळे प्रकल्प घेतले गेले.

मराठी भाषा समृद्ध होणे. गणितीय कौशल्य विकसित करणे. परिसरामध्ये निरीक्षणातून वृत्ती घडण होणे. ही त्या त्या विषयांची उद्दिष्टे समोर ठेवून नियोजित अभ्यासाबरोबरच आवडीच्या विषयात मुलांचा जास्तीत जास्त विकास व्हावा त्यांच्या आवडीच्या विषयांमध्ये त्यांना प्रगती करता यावी यासाठी ही विषय वर्गरचना केलेली आहे. त्यासाठी अभ्यासक्रम निश्चित केला गेला आणि पालक बैठकीचे आयोजन केले गेले. त्यामध्ये अभ्यासक्रमाची मांडणी आणि त्याची कार्यवाही स्पष्ट केली. विषय वर्ग रचना हा प्रयोग पालकांना खूप आवडला. सर्व गटांमध्ये पालकांचा प्रतिसाद चांगला होता.

### निवड प्रक्रिया

ऑनलाईन शिक्षणामुळे विषय वर्गरचना करताना ती कशी करायची? हा मोठा प्रश्न समोर आला. त्यासाठी विभाग प्रमुख व सहविचार सदस्य यांच्या संमतीने एक निर्णय झाला की, इयत्ता दुसरीतून तिसरीत आलेल्या मुलांचा विषयातील कल ओळखण्यासाठी अभ्यासक्रम निश्चित करून त्यावर लेखी परीक्षा व गुगल फॉर्मद्वारे परीक्षा घेऊयात. या दोन्ही परीक्षेच्या गुणांच्या आधारे विषय वर्गरचना करूयात असे ठरले.

## परीक्षा स्वरूप

दि. १२, १३ व १४ जुलैला अनुक्रमे मराठी, गणित व परिसर अभ्यास यांचे पेपर घेण्यात आले. एका दिवशी एक पेपर पहिला गुगल फॉर्मचा पेपर, त्यानंतर लेखी पेपर घेतला. ही परीक्षा ऑनलाईन पद्धतीनेच झूम मिटिंग चालू असताना घेण्यात आली. त्यानंतर लेखी पेपरची पीडीएफ करून क्लासरूमवर मागवण्यात आली. त्यानंतर चार दिवसाच्या आतच मराठी, गणित व परिसर इयत्ता तिसरीच्या सर्व वर्गशिक्षकांनी तपासून त्याचे गुणदान केले. त्याचप्रमाणे लेखी पेपरला मिळालेले गुण व गुगल फॉर्म मध्ये मिळालेले गुण याची तुलना करून मराठी, गणित व परिसर यापैकी कोणत्या विषयात त्या विद्यार्थ्यांला जास्त गुण मिळाले आहेत. त्यानुसार तो विद्यार्थी त्या विषयाच्या गटात गेला. याप्रमाणे प्रत्येक मुलाचे त्याची स्वतःची तुलना करून तो कोणत्या विषयात पुढे आहे. त्यानुसार त्याला त्या विषयी गटांमध्ये समाविष्ट करण्यात आले. अशा प्रकारे इयत्ता तिसरीची विषय वर्गरचना पूर्ण झाली.

## उपक्रम

| विषय | इयत्ता | उपक्रम-१ | उपक्रम | उपक्रम | उपक्रम |
|---|---|---|---|---|---|
| मराठी | ३ री | चित्रवर्णन | समानार्थी - विरुद्धार्थी शब्द | शब्दांची गंमत | अष्टविनायक कथा |
| | ४ थी | एका शब्दाचे दोन अर्थ | अनुस्वाराचे शब्द | श्रावण महिना सणांचे लेखन | अष्टविनायक माहिती व महती |
| गणित | ३ री | भौमितिक आकारापासून चित्र काढणे. | बेरीज रुपात पाढे तयार करणे | सुडोकू कोडी | काड्यांची भौमितिक कोडी |
| | ४ थी | भौमितिक आकारांची रचना व नक्षीकाम | संख्यावृक्ष | मोबाईल डिरेक्टरी | गाड्यांचे क्रमांक लिहिणे |
| परिसर | ३ री | किती प्रकारचे हे प्राणी | निवारा आपला आपला | गणेश पत्री | पाण्याचे प्रयोग |
| | ४ थी | किटकांचा अभ्यास | पाण्यावर आधारित प्रयोग | असे कसे ? प्रश्न शोधणे - उत्तर मिळवणे | हवेच्या तत्वावर आधारित प्रयोग |

याची निष्पत्ती काय तर मुलांची आवड जाणून घेण्यास मदत झाली आणि आवडीच्या विषयांमध्ये पुढे जाण्यासाठी त्यांना संधी मिळाली.

## ❊ विद्यार्थी पालक प्रबोधन कार्यशाळा

कोरोनाची वाढती परिस्थिती, त्याबाबतचे समज-गैरसमज, त्यातच शासकीय आदेशानुसार सुरू होणाऱ्या शाळा, मुलांना शाळेत पाठविण्याबाबत असा पालकांचा संभ्रम व त्याबाबतची सामाजिक परिस्थिती या सर्वांच्या विचारातून पालक- विद्यार्थी प्रबोधन कार्यशाळा घ्यावी असा विचार पुढे आला. त्यानुसार शनिवार दिनांक १८ डिसेंबर २०२१ रोजी इयत्ता ३ री व ४ थी च्या विद्यार्थी व पालकांसाठी 'आता शाळा सुरू होणार, मग तुम्ही काय काळजी घेणार?' या विषयावर ऑनलाईन पद्धतीने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. तब्बल ३४६ पालक व विद्यार्थ्यांनी कार्यशाळेचा लाभ घेतला. यासाठी डॉ. श्री पराग पाटील यांनी आहार, विहार, झोप, व्यायाम अशा अनेक गोष्टी खूप चांगल्या पद्धतीने समजावून सांगितल्या. प्रतिकारशक्ती वाढवणे, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर घ्यावयाची काळजी याविषयी माहिती दिली. पालकांचे सर्व समज-गैरसमज दूर केले आणि प्रश्नोत्तराच्या भागात त्यांनी पालकांशी मुक्त संवाद साधला.

## ❊ गणेशोत्सव

ऑनलाइन असताना सुद्धा परंपरेचे जतन करणे. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करणे. मनोरंजनातून ज्ञान देणे अशी उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून ऑनलाईन कार्यक्रमात विद्यार्थ्यांबरोबर पालक सुद्धा सहभागी होतील अशा कल्पनेतून यावर्षीचा विभागातील गणेशोत्सव साजरा झाला. तसेच नाटकातून पर्यावरण पूरक गणेशोत्सव कसा साजरा करायचा याचा संदेश दिला. अशाप्रकारे महाआरतीचा कार्यक्रम ऑनलाइन संपन्न झाला. ऑनलाइन असल्यामुळे बाहेरगावी असणाऱ्या विद्यार्थ्यांना सुद्धा यात सहभागी होता आले.

हा उपक्रम इथेच संपला नाही तर; संपन्न झालेल्या महाआरतीवर विद्यार्थ्यांना काही प्रश्न देण्यात आले. आणि गणपतीला दाखवल्या जाणाऱ्या विविध प्रसादाची तयारी विद्यार्थ्यांनी करावी यादृष्टीने सोपे सोपे प्रसाद विद्यार्थी करतील त्याच बरोबर गणपतीला वाहिल्या जाणाऱ्या पत्री तसेच गणपतीच्या अवयवांची माहिती विद्यार्थ्यांनी मिळवावी असाही उपक्रम विद्यार्थ्यांना दिला. यात प्रमुख अभ्यागत म्हणून उपस्थित असलेल्या सौ. मेधाताई देशपांडे यांनी प्लॅस्टिक संकलन व त्यावरील उपाय योजना यावर माहिती दिली. प्लास्टिक संकलनात छोटेसे पाऊल पण सुरुवात महत्त्वाची आहे असे त्यांनी सुचवले. पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करण्याची प्रेरणा मुलांना यातून मिळाली कोरोनाच्या संकट काळात सुद्धा सांस्कृतिक सण साजरे करण्यातून एक प्रकारचा आनंद मुलांना मिळाला.

## ❊ गुरुपौर्णिमा

गुरुपौर्णिमेनिमित्त इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांचे गुरु महिमा पद्य गायन आणि इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांचे आधुनिक गुरु शिष्य कथाकथन स्पर्धा संपन्न झाल्या.

विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणे. शाळा ऑनलाईन असली तरी परंपरेचे जतन करण्याचा प्रयत्न करणे. विविध स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठीचा आत्मविश्वास निर्माण करणे. गायन आणि कथाकथन या कलांची जोपासना करणे. अशी उद्दिष्टे समोर ठेवून गुरुपौर्णिमा कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

विद्यार्थ्यांची पाठांतर क्षमता वाढवणे. शाळा जरी ऑनलाईन असली तरी आपल्या परंपरेचे जतन होईल असे वातावरण विद्यार्थ्यांच्या घरी आणि ऑनलाईन निर्माण करणे. विद्यार्थ्यांमध्ये सभाधीटपणा निर्माण होणे. याही गोष्टी या उपक्रमातून साध्य व्हाव्यात असे वाटत होते. म्हणूनच १५ दिवस अगोदर सूचना विद्यार्थ्यांना दिली. गाण्यासाठी कोणते पद्य निवडायचे आणि कथाकथनासाठी कोणती गोष्ट निवडायची याविषयीचे मार्गदर्शन अध्यापकांनी केले.

तासाच्या शेवटच्या पंधरा मिनिटांमध्ये सहभागी विद्यार्थ्यांचे पद्य आणि गोष्टी अध्यापकांनी ऐकल्या. आवश्यक तेथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि सुधारणा सांगितल्या. अध्यापकांनी वेळोवेळी सूचना दिल्या. विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनांचे पालन करून त्यानुसार सर्व कार्यवाही केली. यशस्वी विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र ऑनलाइन पाठवले. अशाप्रकारे या स्पर्धांना उत्तम प्रतिसाद मिळाला आणि स्पर्धा अतिशय यशस्वीपणे पार पडल्या..

✸✸✸

## ✼ अभिरूची गायन गट ✼

**अध्यापक मनोगत (मुक्तीसोपान)**

**गायन हा विषय अभिरुचीसाठी आहे असे कळल्यावर, जे नेहमीच्या तासांना शिकवणे जमत नाही, तेही शिकवता येईल असा शिक्षक म्हणून आनंद वाटला. त्याप्रमाणे नियोजनात नवरस हा विषय निवडला. याचं कारण मुलांना गाणं किती पद्धतींनी ऐकता येऊ शकतं याचा अनुभव मिळेल. ठरवलेले उद्दिष्ट पूर्ण झाले, असे मुलांच्या चर्चेतून नक्की जाणवले. साचेबद्ध अभ्यासक्रमाव्यतिरिक्त वेगळे काही शिकता व शिकवता आले, तसेच विद्यार्थ्यांशी मैत्रीपूर्ण नाते निर्माण झाले ज्याचा उपयोग विद्यार्थी आणि अध्यापक दोघांना झाला. सुरुवातीच्या तासांच्या चर्चेतून लक्षात आले की मुलांचा कल आधुनिक संगीताकडे जास्त आहे. व अभिजात संगीताबद्दल काहीही माहिती नाही; पण आता मुलांना पारंपरिक अभिजात संगीताची आवड निर्माण करण्यात काही अंशी यश आले आहे असे म्हणता येईल. गायन गटात आम्ही तिघे अध्यापक एकाच विभागातील असल्यामुळे सतत चर्चा, विचार, मतं, यांची देवाण घेवाण झाल्याने एकमेकांच्या ज्ञानात भर पडली ज्यामुळे गटबांधणी सहज व चांगल्या प्रकारे झाली.**

# पूर्व माध्यमिक विभाग



पूर्व माध्यमिक विभागाने विद्यार्थ्यांसाठी एका वर्षभराच्या कालावधीत विविध प्रकारचे सहशालेय उपक्रम मोठ्या संख्येने यशस्वीपणे राबवण्याचा आनंद घेतला. अध्यापकांच्या मार्गदर्शनाने अत्यंत दर्जेदार पद्धतीने विद्यार्थी गटाने उत्तम सादरीकरण करण्याचा, अध्यापकांनी ऑनलाइन, ऑफलाइन आणि हायब्रीड शिक्षणाचा उत्तम ताळमेळ साधण्याचा अनुभव घेतला. यंदाचे शैक्षणिक वर्ष आव्हानात्मक असूनही विविध उपक्रमांच्या यशस्वी पूर्ततेमुळे नक्कीच आनंददायीही ठरले. शिक्षण प्रकिया किती 'चैतन्यदायी' आणि 'वैविध्यपूर्ण' आहे याची प्रचिती सर्वांना आली.

## * विषयतज्ज्ञांची व्याख्याने-

विषय तज्ज्ञांची व्याख्याने हा उपक्रम जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्यामध्ये इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी समांतर स्तरावर राबविण्यात आला. ऑनलाइन, ऑफलाइन आणि हायब्रीड या तीनही माध्यमातून सदर उपक्रमांतर्गत आठवड्याच्या प्रत्येक गुरुवारी अभ्यास विषयांसंदर्भात तज्ज्ञांचे मार्गदर्शन आयोजित करण्यात आले. विषयाचे सखोल मार्गदर्शन देणे, विद्यार्थ्यांच्या अभ्यासाच्या कक्षा रुंदावणे, विषयामध्ये विशेष रुची निर्माण करणे, अभ्यासपूरक वाचनाची आवड निर्माण करणे ही उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवून क्रमिक शिक्षणातल्या विषयासंदर्भात एकूण २१ व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते.

या उपक्रमाद्वारे अवांतर वाचन, संग्रहात्मक प्रकल्प, छत्रपती संभाजीमहाराज, महाराणी ताराराणी, अश्मयुगीन मानव, गणितातील कोडी, कंपोस्ट खत निर्मिती, भाषा विषयातील लेखन कौशल्य तंत्र, संवाद कौशल्य तंत्र, शब्दसंग्रह वृद्धी अशा विविध विषयांवर तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना उपलब्ध झाले. व्याख्यानानंतर गुगल फॉर्मच्या माध्यमातून सर्व तज्ज्ञांचे संपर्क, व्याख्यानाबाबतचे सर्व संदर्भ गोळा करण्यात आले.

व्याख्यानांच्या निमित्ताने ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालयातील तीन माजी अध्यापक, त्याचबरोबर सायन्स पार्कचे श्री. सुनील पोटे, निवृत्त आयुक्त श्री. चंद्रकांत अलसटवार, विज्ञान अभ्यासक श्री. ए. पी. सिंग यांसारखे तज्ज्ञ, ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्रातील अन्य विभागातील अध्यापक, माजी

विद्यार्थी यानिमित्ताने पूर्व माध्यमिक विभागाशी जोडले गेले व त्यांच्या अनुभवाचा लाभ विद्यार्थ्यांना झाला. या व्याख्यानाच्या माध्यमातून मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग विद्यार्थ्यांना दैनंदिन अध्ययन करताना निश्चितपणे झाला. संग्रहात्मक प्रकल्पावरील व्याख्यानातून प्रेरणा घेऊन इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी विज्ञान दिनाच्या निमित्ताने ४४ संग्रहात्मक प्रकल्पांची मांडणी केली. सातवीच्या संपूर्ण वर्गाने कंपोस्ट खत निर्मितीचा प्रयोग केला. इयत्ता पाचवीत शिकणाऱ्या सुमारे ८०% विद्यार्थ्यांनी पालकांसमवेत सायन्स पार्कला भेट दिली. इंग्रजीमधील संभाषण कौशल्य या व्याख्यानातून विद्यार्थी तोंडी परीक्षेला अधिक आत्मविश्वासाने सामोरे गेले अशी उदाहरणे सांगता येतील. अभ्यासास प्रवृत्त करणाऱ्या या नावीन्यपूर्ण उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्यास मदत झाली. सर्व विषय अध्यापकांनी आपल्या विषयाच्या व्याख्यानांचे आयोजन केले होते. उपक्रमाच्या प्रमुख म्हणून सौ. स्मिता माने यांनी जबाबदारी पार पाडली.

## * अध्यापक मुलाखती

गतवर्षी पूर्व माध्यमिक विभागामध्ये राबवलेल्या अनेक यशस्वी उपक्रमांमध्ये 'अध्यापक मुलाखत' हा एक अत्यंत नावीन्यपूर्ण उपक्रम होता. या वेळी सहा अध्यापकांच्या मुलाखती घेण्यात आल्या होत्या. यंदाच्या वर्षी हाच उपक्रम थोड्या नावीन्यपूर्ण रितीने राबविला जाऊन उर्वरित अध्यापकांच्या मुलाखती विद्यार्थ्यांनी घ्याव्यात असे निश्चित करण्यात आले. हा उपक्रम व्यक्तिमत्त्व खात्यांतर्गत राबवला गेला. विद्यार्थ्यांमध्ये संवाद कौशल्याचा व प्रश्न कौशल्याचा विकास होणे. प्रसंगावधान व आत्मविश्वासाने प्रश्न विचारता येणे, लेखन कौशल्य व पूरक तांत्रिक कौशल्ये विद्यार्थ्यांना आत्मसात व्हावीत ही उद्दिष्ट्ये नजरेसमोर ठेवून 'सफर अध्यापकांच्या अनुभव विश्वाची' या शिक्षक मुलाखत उपक्रमाची योजना करण्यात आली.

या उपक्रमाकरिता इयत्ता सातवीच्या तीन वर्गातून १८ विद्यार्थ्यांची निवड केलेली होती व एक प्रशिक्षण प्रक्रिया घडवून आणली. सहभागी निवडक विद्यार्थ्यांसाठी 'मुलाखत तंत्र व मंत्र' या विषयावर श्री. सौगंध देशमुख यांनी मार्गदर्शन केले. वर्षभरात या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी पाच अध्यापकांच्या मुलाखती घेतल्या.

या उपक्रमांत मुलाखतीचे प्रश्न तयार करणे, मुलाखतीची माहिती सांगणारा व्हिडिओ तयार करणे, मुलाखतीची रंजकता वाढवण्यासाठी मनोरंजनात्मक गोष्टींची योजना करणे याबाबी विद्यार्थी उपक्रमातून शिकत गेले.

सदर उपक्रम ऑनलाइन आणि ऑफलाईन या दोन्ही माध्यमातून घेण्यात आला. सर्व मुलाखतींचे प्रसारण युट्युब लाईव्हच्या माध्यमातून करण्यात आले.

## ✻ एकदिवसीय निवासी शिबिर

विविध सहलींच्या व शिबिरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची समाजशीलता वृद्धींगत होते. सहली आणि शिबिराच्या माध्यमातून नियोजनबद्धपणे मनावर कायम टिकणारे अनुभव उत्तम प्रकारे देण्याची संधी मिळते. परंतु असा अनुभव देण्याची संधी गेली दोन वर्षे मिळाली नव्हती. यावर्षी अगदी दोन - तीन दिवसाचे नाही तर किमान एक दिवसीय निवासी शिबिराचे आयोजन इयत्ता सहावी आणि सातवी करिता एप्रिल महिन्यामध्ये स्वतंत्र पद्धतीने करण्यात आले. यात इयत्ता सहावीतील ८४ तर इयत्ता सातवीचे १०५ विद्यार्थी शिबिरामध्ये सहभागी झालेले होते. पहिल्या दिवशी सायंकाळी उद्‌घाटन आणि खेळाच्या सत्राने पाच वाजता सुरु होणारे शिबिर दुसऱ्या दिवशी दुपारी समारोपाच्या सत्रापर्यंत विद्यार्थ्यांना विविध अनुभूती देणाऱ्या सत्रांनी परिपूर्ण होते.

मनोरंजनात्मक कार्यक्रमामध्ये जादूचे प्रयोग, कथाकथन, कोण होणार विद्यावाचस्पती सारखा बुद्धीला चालना देणारा खेळ, आपले सहाध्यायी, अध्यापक यांच्यासोबत चित्रपट पाहणे, चित्रपटावर चर्चा करणे इ. सत्रे घेण्यात आली. सर्वच विद्यार्थ्यांनी दिवसा शाळा कशी दिसते याचा अनुभव वर्षानुवर्षे घेतलेला असतो. परंतु, रात्री चंद्राच्या प्रकाशात विद्यालयातील परिसर कसा दिसतो, इमारत कशी भासते, परिसरातील कीटकांचे, पक्ष्यांचे, प्राण्यांचे आवाज रात्रीच्या शांततेत अनुभवण्याचे सत्र घेण्यात आले. रात्री मोकळ्या आकाशाखाली मैदानावर थोडा वेळ पहुडण्याचा आनंदही विद्यार्थ्यांनी घेतला. आपले वर्गमित्र, मैत्रिणी, अध्यापक यांच्या सोबत सहनिवास, सहभोजनाची अनुभूती विद्यार्थ्यांनी या शिबिराच्या माध्यमातून घेतली. दोन वर्षाच्या प्रदीर्घ कालखंडानंतर निश्चितच विद्यार्थ्यांसाठी हा एक आनंददायी अनुभव होता जो विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट जाणवत होता. काहींनी हा आनंद शब्दातही व्यक्त केला.

दुसऱ्या दिवसाची सुरुवात दुर्गा टेकडीवर व्यायामाचे सत्र घेऊन झाली. यानंतर 'अध्यापक मुलाखत' हे सत्र प्रत्यक्ष आणि ऑनलाइन या दोन्ही माध्यमातून आयोजित करण्यात आले होते. इयत्ता सहावीकरिता आपल्या विद्यालयातील कला अध्यापक श्री. अशोक कामथे सरांची मुलाखत अध्यापकांनी व इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांकरिता सौ. दिपाली थोरात यांची मुलाखत इयत्ता सातवीतील विद्यार्थ्यांनी घेतली.

सदर शिबिरात दोन्ही इयत्तांसाठी गटकार्याचे सत्र आयोजित करण्यात आले होते. गटकार्यासाठी शालेय परिसरातील नैसर्गिक घटकांपासून विद्यार्थ्यांनी रांगोळी तयार करणे हा विषय देण्यात आला होता. या सत्रात सर्जनशीलतेला व संघभावनेला वाव मिळाला. इयत्ता सहावी आणि सातवीच्या शिबिराचा समारोप माननीय विभाग प्रमुख श्री. शिवराज पिंपुडे यांनी केला व उत्तम गटकार्यासाठीची पारितोषिके देऊन विद्यार्थ्यांचे कौतुकही केले. विद्यार्थ्यांचा शिबिराचा अनुभव विद्यार्थ्यांनी याप्रसंगी आपल्या मनोगतातून व्यक्त केला.

## ✻ छत्रपती शिवरायांची शौर्यगाथा- गीतगायन कार्यक्रम

इयत्ता सातवीसाठी अभिव्यक्ती विषयांतर्गत यंदाच्या वर्षी एक नावीन्यपूर्ण प्रयोग करण्यात आला. क्रमिक शिक्षणातील इतिहास विषयांतर्गत 'शिवचरित्राचा' अभ्यास करताना त्याची सांगड 'संगीत' विषयाशी घालून 'शिवरायांची गौरवगाथा' हा प्रयोग विभाग प्रमुख श्री.शिवराज पिंपुडे यांच्या कल्पनेतून साधता आला. दोन विषयांची सांगड उत्तम रीतीने साधत, विद्यार्थ्यांमधील संघभावनाही कळत नकळत जोपासता आली. इयत्ता सातवीच्या तीनही वर्गांनी स्वतंत्रपणे, एकाच दिवशी व्यासपीठावरून सादरीकरण केले हे या कार्यक्रमाचे एक वैशिष्ट्य म्हणता येईल. सातवीतील १००% विद्यार्थ्यांनी या उपक्रमांमध्ये उत्तम सहभाग नोंदवला.

शिवरायांच्या जीवनावरील विविध प्रसंगाचे पोवाडे, गीते, शिवरायांचा पाळणा, शिवबाचा गोंधळ, शिवराय गौरवगीत, मानाचा मुजरा, नरवीर तानाजी मालुसरे, वीर बाजीप्रभू देशपांडे यांचे पोवाडे विद्यार्थ्यांनी मुक्तीसोपान विभागाच्या प्रमुख सौ. शितल कापशीकर यांच्या मार्गदर्शनाखाली जोशात सादर केले. उत्तम शब्दफेक, तालबद्धता, लयबद्धता, सुरेलपणा आणि मुख्य म्हणजे उत्तम पद्धतीने केलेलं पाठांतर, विषयाशी समरसता, अंगावर रोमांच उभे राहतील असा सादरीकरणातील जिवंतपणा ही या कार्यक्रमाची वैशिष्ट्ये सांगता येतील.

## ✻ कवितांच्या गुदगुल्या

रंगभाषा निर्मित 'कवितांच्या गुदगुल्या' हा मराठी बालकवितांच्या नाट्याविष्काराचे आयोजन पूर्व माध्यमिक विभागामध्ये दिनांक ९ मार्च २०२२ रोजी करण्यात आले होते. ग. दि. माडगूळकर, शांता शेळके, विं. दा.करंदीकर, मंगेश पाडगावकर, अरुणा ढेरे, संगीता बर्वे, शशांक पुरंदरे या कवी-कवयित्रींच्या कविता नाट्याविष्कारासह या कार्यक्रमात अत्यंत प्रभावी पद्धतीने सादर करण्यात आल्या. इयत्ता पाचवी ते सातवीचे विद्यार्थी 'कवितांच्या गुदगुल्या' या कार्यक्रमामध्ये रममाण झालेले होते. कधी हास्य तर कधी भय, कधी वीर तर कधी करूण असे विविध रस दर्शवणाऱ्या मराठी बालकवितांना या कार्यक्रमाच्या निमित्ताने उजाळा देता आला. मराठी बालकवितांचा समृद्ध ठेवा या कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांसमोर उलगडता आला.

✷✷✷

### ✻ अभिनंदन ✻

- **प्राथमिक विभाग गट १ मधील दुसरी ब मधील कु. अपूर्वा टिळेकर हिला अभिरंग बालकला संस्थेतर्फे आयोजित केलेल्या राज्यस्तरीय कथाकथन स्पर्धेत उत्तम सादरीकरण केल्याबद्दल प्रमाणपत्र मिळाले.**
- **अटलमधील इ.९ वीची विद्यार्थिनी जान्हवी पाटील हिला** South Asia University **तर्फे घेण्यात आलेल्या सॉफ्क्ट रोबोटिक्स स्पर्धेमध्ये** Judges award **हे पारितोषिक मिळाले.**

# माध्यमिक विभाग मराठी



## ❊ गणेशोत्सव

**गौरीसुताय गणनाथ नमो नमस्ते ।**

कोरोना कालावधीमध्ये असलेले निर्बंध त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात आणि वातावरणामध्ये आलेली मरगळ घालवण्यासाठी व विद्यार्थ्यांना त्यांच्या कला गुणांना वाव देण्याचे मा. प्राचार्यांच्या मार्गदर्शनाने सांस्कृतिक विभागाने ठरवले. त्यानुसार नियोजन सुरु केले.

कोरोना काळानंतर विद्यार्थ्यांना प्रथमच प्रत्यक्ष आपले कला गुण सादर करण्याची संधी देण्यासाठी गणेशोत्सवाच्या निमित्ताने विविध उपक्रम राबवले. याचा उपयोग अनेक विद्यार्थ्यांनी करून घेतला. आणि आपले पाक कौशल्य, खेळातील कौशल्य, नृत्य, गायन, वादन, सादर केले.

- **गणेशोत्सवाच्या निमित्ताने राबवले गेलेले उपक्रम**

अथर्वशीर्ष पठण व 'चौदा विद्या चौसष्ट कला' या आरतीचे रेकॉर्डिंग करून विद्यार्थ्यांना पाठवले याच्या साह्याने विद्यार्थ्यांनी अथर्वशीर्ष मुखोद्गत केले.

**प्राणप्रतिष्ठा**– प्राणप्रतिष्ठा संबंधीची माहिती रेकॉर्ड, व्हिडिओ पाठवले त्याच्या मदतीने विद्यार्थ्यांनी घरातील गणपतीची प्राणप्रतिष्ठापना केली.

पारंपारिक मंगळागौरीचे खेळ प्रशिक्षण ८ सप्टेंबर– यामध्ये २३ विद्यार्थिनी मनोहर सभागृहात उपस्थित होत्या. संपदाताई कुलकर्णी व त्याच्या ६ जणींच्या गटाने हे प्रशिक्षण दिले.

**व्याख्यान** – १५ सप्टेंबर– विद्यार्थी, पालक, शिक्षक यांच्यासाठी 'बाप्पा आणि मी' या विषयावर व्याख्यात्या सौ. निलिमाताई रास्ते यांनी मार्गदर्शन केले.

**गणेश वंदना १६ सप्टेंबर** – विद्या आणि कलेची देवता गणपती याची आराधना गणेश वंदना नृत्य, गायन, वादन करून विद्यार्थ्यांनी सादर केले.

**पाककृती स्पर्धा १७ सप्टेंबर** - मोदक तयार करणे यासंबंधीचे मार्गदर्शक व्हिडिओ विद्यार्थ्यांना गटावर पाठवले व प्रत्यक्ष मोदक स्पर्धा मनोहर सभागृहात आयोजित केली. याचे परीक्षण मा.श्री. देवळेकर सर व श्री. आदित्य शिंदे यांनी केले.

गणेशोत्सव आणि अभिरूची -बुद्धीची देवता असलेल्या गणेशोत्सवाचा आपल्या अभिरुचीतील विषयानुसार अभ्यास केला.

| | |
|---|---|
| मराठी | आरती रचणे. |
| हिंदी | हिंदी भाषिक परंपरेतील गणेशोत्सव |
| इंग्रजी | गणेशोत्सवाचे महत्व सांगणारे छोटे भाषण देणे |
| संस्कृत | गणेश पुराण ओळख व त्यातील कथा |
| गणित | आरासाची रचना त्यामागील गणित |
| भौतिकशास्त्र | फुले, दुर्वा डोक्यावर ठेवण्यामागील तंत्र/ तत्त्व, प्रकाशरचनेमागील भौतिक |
| रसायनशास्त्र | नैवेद्य मागील रसायन |
| जीवशास्त्र | पत्री व फुले यांचा अभ्यास |
| भूगोल | देश-विदेशातील गणेशोत्सव |
| इतिहास | गणेशोत्सवामागील इतिहास, |

या विविध ऑनलाईन ऑफलाईन पद्धतीने सादर झालेल्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये चैतन्य पूर्ण वातावरण निर्माण झाले. या सर्वांना अभ्यास व मनोरंजन याची जोड मिळाली.

## * १० वी विषयानुसार गट- मार्गदर्शन

कोरोना कालावधीमध्ये मुलांचा झालेला अभ्यास व परीक्षेला अनुसरून अभ्यास कसा करावा व गुण वाढवण्यासाठी कसे प्रयत्न करावेत यासाठी मार्गदर्शन करण्याचे ठरले. जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात इ. १० वीच्या विद्यार्थांसाठी प्रत्येक विषयानुसार दोन गट करून आणि त्यानुसार विद्यार्थांना मार्गदर्शन विषय अध्यापकांनी करायचे असे ठरले. आणि अ व ब असे दोन विद्यार्थांचे गट तयार केले. अ हा गट ७०% पेक्षा अधिक गुण मिळवणारा गट यांना पैकीच्या पैकी गुण कसे मिळवता येतील या दृष्टीने मार्गदर्शन केले आणि ब गट ७०% पेक्षा कमी गुण मिळवणारा गट होता. यांना अधिक गुण कसे मिळतील या दृष्टीने मार्गदर्शन विषय अध्यापकांनी पीपीटीच्या आधारे केले. याचा फायदा विद्यार्थांना बोर्डाच्या परीक्षेचा अभ्यास करण्यासाठी झाला.

**इ. ९ वी साठी अभ्यास पायऱ्या मार्गदर्शन** - इ. ९ वी तील विद्यार्थ्यांना स्वयं अध्ययन कसे करावे व त्याची सवय लागण्यासाठी जुलै महिन्यात अभ्यास पायऱ्यांचे मार्गदर्शन करण्याचे ठरले आणि विज्ञान विषयातील पाठ अभ्यास पायऱ्यांच्या आधारे शिकवण्याचे ठरले. विद्यार्थ्यांना पुस्तक

सर्वेक्षणापासून टिपण काढणे, उजळणी या सर्व मुद्यांच्या आधारे मार्गदर्शन केले. जानेवारी महिन्यात उजळणी स्वरुपात पुन्हा एकदा विविध विषयांना अनुसरून अभ्यास पायऱ्यांच्या आधारे अभ्यास कसा करायचा याविषयी मार्गदर्शन केले. यामुळे विद्यार्थी अभ्यास पायऱ्यांच्या आधारे अभ्यास करायला लागले.

**अभ्यास कौशल्य मार्गदर्शन –** फेब्रुवारी महिन्यात इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी संवेद विभाग यांच्यामार्फत तीन अभ्यास कौशल्याचे मार्गदर्शन करण्याचे ठरले. त्यानुसार निरीक्षण कौशल्य, प्रश्न कौशल्य आणि टिपण कौशल्य यांचा प्रामुख्याने समावेश करण्यात आला. संवेद विभागाच्या गायत्री बोत्रे यांनी ही तीनही सत्रे घेतली. एकूण तीन सत्रे प्रत्येक शनिवारी एक आणि आठवडाभर त्या सत्रावर आधारित कृती अशा पद्धतीने ही सत्रे घेण्यात आली. प्रत्यक्ष विद्यार्थ्यांनी पाठाच्या आधारे नोंदी केल्या.

## ❊ परिपाठ

**अभिवादनशीलस्य नित्यं वृद्धोपसेविनः ।**
**चत्वारि तस्य वर्धन्ते आयुर्विद्यायशोबलम् ।।**

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ या वर्षापासून कोरोना महामारीनंतर जेव्हा शाळा सुरू झाल्या मुले प्रत्यक्ष शाळेत येऊ लागली तेव्हा मुलांच्या सवयींमध्ये खूप परिवर्तन झालेले होते. पूर्वीसारखी स्थिरता एकाग्रता बैठक व शिस्त या सर्व गोष्टी प्रामुख्याने निरीक्षण केल्यानंतर लक्षात आल्या. या सर्व सवयींवर मात करण्यासाठी आदरणीय प्राचार्य देवळेकर सर त्यांनी एक युक्ती सुचवली आणि त्याचे स्वरूप म्हणजे यावर्षी सुरू झालेला परिपाठ. 'विद्यार्थ्यांच्या मनोमय कोशाचा विकास घडवून आणणे. 'परमेश्वराच्या स्मरणाने शाळेची सुरवात करणे. संवेदनशील व सुसंस्कृत जबाबदार विद्यार्थी म्हणून मनोवृत्ती घडविणे. 'मनात सतत चांगले विचार येण्यासाठी आध्यात्मिक पाठांतराची सवय लावणे. प्रासंगिक, आवश्यक विषय घेऊन संवाद साधने मार्गदर्शन करणे. (दिनविशेष, देशातील, समाजातील घडामोडी, विद्यार्थी वर्तन, येणाऱ्या उपक्रमांची उद्दिष्ट्ये इ.इ.) या उद्दिष्टाने रोज परिपाठ घेण्याचे ठरले.

परिपाठाचे स्वरूप बदलले नुसती प्रार्थना न होता. परिपाठामध्ये विद्यार्थी एकत्रित येऊन जडलेल्या सवयींवर मात करण्यासाठी सस्वर प्रार्थना गायन, राष्ट्रगीत, प्रतिज्ञा, उतारा, वाचन मनाचे श्लोक, पद्य, गीता अध्याय व प्राचार्यांचा नित्य संवाद हे सर्व झाले. याच दरम्यान विविध अध्यापकांनी वेगवेगळ्या विषयावर अभ्यास करून मांडणी केली. ज्यामध्ये प्रबोधिनी परिचय केंद्रातील वेगवेगळ्या विभागांची ओळख, भारतीय परंपरा, व्रतचिन्ह, गिरीजा मंत्र, गायत्री मंत्र, विरजा मंत्र अशा विविध विषयांवर अध्यापकांनी मुलांशी संवाद साधला. प्राचार्यांनी विनोबांची जीवनसूत्रे मुलांना सांगितली. यातून मुलांची स्वयंशिस्त व स्वावलंबन वाढताना लक्षात आले. मुलांची स्थिरता व स्वयंशिस्त वाढण्यास मदत झाली असे वाटते. परिपाठाचे आणखी नेमके स्वरूप करण्याचे काम सुरू आहे.

'विद्यार्थ्यांमधील स्थिरता वाढण्यास याची मदत झाली. याचे नियोजन मुक्ती सोपान विभागाच्या मदतीने प्रबोधन खात्यातर्फे करण्यात आले.

## ✻ नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा अभ्यास

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा माध्यमिक विभागात अभ्यास करण्याचा प्रमुख हेतू म्हणजे नव्याने कोणत्या गोष्टी माध्यमिक विभागात स्वीकाराव्या लागतील व कोणते आवश्यक बदल करावे लागतील, तंत्रज्ञान, नवीन विषय कोणते आहेत या सर्वांची माध्यमिक विभागातील व्यवस्था, नियोजन, मनुष्यबळ या सर्वांचा विचार करावा लागेल याचा आढावा घेणे हा या मागील उद्देश होता.

त्या अनुषंगाने नवीन शैक्षणिक धोरणाचा विचार करताना पुढील गोष्टी प्राधान्यक्रमाने जाणवल्या. आर्टिफिशिअल इंटेलिजन्स, होलिस्टिक हेल्थ, ऑरगॅनिक लिविंग ग्लोबल सिटिझनशिप एज्युकेशन कोडींग, संगणक साक्षरता, संवाद व संपर्क कौशल्य, समस्या निराकरण, पर्यावरण शिक्षण यासारख्या काही विषयांचा व कौशल्यांचा माध्यमिक शिक्षणात समावेश करावा लागणार आहे. तसेच सेल्फी व्हॅल्युएशन आणि थ्री सिक्सटी डिग्री असेसमेंट, व्होकेशनल ॲन्ड प्रोफेशनल एज्युकेशन यावरही विशेष भर द्यावा लागणार आहे. शालेय वर्षांमध्ये विद्यार्थी कोणत्यातरी एका कौशल्यामध्ये तरबेज व्हावा अशी अपेक्षा आहे. गणित व विज्ञान या विषयातील असामान्य विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन मिळावे. तसेच सामाजिक शास्त्र या विषयांवरही विशेष भर दिला जाईल त्याच प्रमाणे ट्रायबल इंडिया व भारताचे एकूण सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी विशेष प्राधान्य देण्यात यावे या विषयाची मांडणी देखील नवीन शैक्षणिक धोरणात केलेली आहे. या सगळ्या अभ्यासाचा प्रबोधिनीचा पुढील दहा वर्षांचा भवितव्य लेख लिहिण्यासाठी उपयोग निश्चितच होईल. नव्याने अकरावी-बारावी शाळेला जोडून चालू करावी लागेल व कोणत्या विषयांना प्राधान्य क्रम द्यावा लागेल याचाही अंदाज माध्यमिक स्तरावर करण्यात आला.

## ✻ भारतीय शिक्षण पद्धतीचा अभ्यास -

गुरुकुल परंपरेतून अभ्यास व अध्ययन पूर्ण करून हे स्नातक भविष्यात देशासाठी काय उपयोगी पडतात किंवा आपले कार्य देशसेवेसाठी कसे देतात? असा अभ्यासाचा मुख्य हेतू घेऊन मांडणी केली होती. प्राचीन काळी असलेली गुरुकुल परंपरा व सध्या सुरू असलेली गुरुकुल परंपरा यांच्यामध्ये काळानुसार कसे बदल झालेले आहेत? प्रत्यक्ष अभ्यासासाठी एका गुरुकुल वेदपाठशाळेला आळंदी येथे भेट देऊन तेथील प्रशिक्षक वेदपाठक आचार्य नंदे गुरुजी यांची मुलाखत घेतली. आ. प्राचार्यांनी काढून दिलेल्या प्रश्नांच्या आधारे आचार्य यांची मुलाखत घेण्यात आली. एक वेगळा अनुभव होता. सर्व अध्यापकाना गुरुकुल परंपरेचे महत्त्व समजले.

✷✷✷

# माध्यमिक विभाग
# इंग्रजी




## ✻ विज्ञान दिन

विद्यार्थ्यांना विज्ञानातील प्रयोग व कृती प्रत्यक्ष करता याव्यात या उद्देशाने विज्ञान दिनाचे आयोजन करण्यात आले. अध्यापकांच्या मार्गदर्शनानुसार इयत्ता नववीच्या संपूर्ण वर्गाने इयत्ता पाचवी ते आठवीच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी अनेकविध उपक्रम व मनोरंजक अभ्यास कृतींचे आयोजन केले.

अध्यापक व अग्रणी गट यांच्या प्रत्यक्ष व दूरस्थ बैठकांमध्ये कोणत्या वर्गासाठी कोणते उपक्रम घ्यावेत, किती वेळाचे नियोजन असावे, मूल्यमापन व्हावे का? अशा विविध मुद्द्यांवर सखोल चर्चा झाली व सर्वांना विज्ञानातील संकल्पना सहजपणे समजाव्यात हा विचार केंद्रस्थानी ठेवून अनेकविध कृतींचे नियोजन करण्यात आले. प्रत्यक्ष विज्ञान दिनाच्या दिवशी विभागातील सर्व वर्गखोल्या, वर्गांबाहेरचे व्हरांडे, प्रयोगशाळा व मनोहर सभागृह या सर्व ठिकाणी विद्यार्थी वेगवेगळ्या उपक्रमात सहभागी होण्याचा आनंद अनुभवत होते. वर्गशः आयोजित केलेल्या कृती खालीलप्रमाणे –

| इयत्ता | कृती | परीक्षक / मूल्यमापन करणारे |
|---|---|---|
| पाचवी | प्रश्नमंजुषा | इ.९वी चे विद्यार्थी |
| | Poster making | पालक |
| | वैज्ञानिक खेळ | इ.९वी चे विद्यार्थी |
| सहावी | Treasure Hunt | इ.९वी चे विद्यार्थी |
| | Poster making | पालक |
| सातवी | Model making | बाह्य परीक्षक |
| | Hexathlon | इ.९वी चे विद्यार्थी |

वर्गशः करण्यात आलेल्या वेगवेगळ्या कृतींच्या आयोजनाबरोबरच शेवटच्या सत्रात IISER मधील मा. अशोक रूपनेर सरांच्या दूरस्थ कृतीयुक्त व्याख्यानाने विज्ञान दिनाची सांगता झाली.

उपक्रमांमध्ये व कृतींमध्ये उत्तम सहभाग नोंदविणाऱ्या निवडक विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले. काही विद्यार्थ्यांना त्यांचे मनोगत मांडण्याची संधीही विभागाच्या एकत्रित उपासनेत मिळाली.

२० – २५ दिवस केलेल्या अध्यापक व विद्यार्थ्यांच्या अविरत परिश्रमाचे फलित म्हणजे हा सुनियोजित विज्ञान दिन. यातून विद्यार्थ्यांना मिळालेला वैज्ञानिक साहित्य हाताळणी, गटकार्य, सादरीकरण तसेच जोडीकार्य याचा अनुभव आनंददायी व अनेक गोष्टी शिकवणारा होता. नियोजनात सहभागी असलेल्या नववीच्या विद्यार्थ्यांना नियोजन कौशल्य, गट कार्य, उपक्रम नियोजन व कार्यवाही आणि संवाद कौशल्य प्रत्यक्ष अनुभवातून शिकता आले.

विद्यार्थ्यांच्या क्षमतांचे नव्याने दर्शन घडविणारा व त्यांच्यातल्या ऊर्जेला, कल्पकतेला व्यक्त होण्यास संधी देणारा हा विज्ञान दिन फक्त विद्यार्थीच नव्हे तर अध्यापकांचीही विज्ञानातील रुची वाढविणारा ठरला.

## * कौशल्य प्रशिक्षण

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कौशल्य प्रशिक्षण महत्त्वाचे असते, हे जाणून हस्ताक्षर कौशल्य, वाचन कौशल्य, पाठांतर कौशल्य व वक्तृत्व कौशल्य प्रशिक्षणांचे आयोजन अनुक्रमे इयत्तेनुसार करण्यात आले.

### हस्ताक्षर कौशल्य (इयत्ता पाचवी)

सुंदर अक्षर हाच खरा अलंकार !
सुवाच्य आणि रेखीव हस्ताक्षरासाठी अनेक प्रयत्न केले जातात. विद्यार्थ्यांचे अक्षर सुवाच्य असावे व अक्षरांचे घाट आणि वळण समजावे या हेतूने लेखन कौशल्याचे प्रशिक्षण इयत्ता पाचवीसाठी घेण्यात आले. जून २०२१ ते डिसेंबर २०२१ या कालावधीमध्ये हस्ताक्षर प्रशिक्षण घेण्यात आले. हस्ताक्षरतज्ज्ञ शैलाताई पाचपुते यांनी या वर्गाचे बदलत्या परिस्थितीनुसार प्रत्यक्ष आणि दूरस्थ अशा दोन्ही पद्धतीत मराठी व इंग्रजीचे हस्ताक्षर वर्ग घेतले. या प्रशिक्षणानंतर ८० टक्के मुलांच्या हस्ताक्षरात सुधारणा झाली. इंग्रजी आणि मराठी दोन्ही भाषांतील अक्षरांचे घाट, वळण समजल्याने लेखनकौशल्यही वाढले आहे.

### वाचन कौशल्य (इयत्ता सहावी)

वाचाल तर वाचाल !!!
कोणत्याही विषयाच्या अध्ययनात महत्त्वाच्या असणाऱ्या वाचन ह्या कौशल्याची गोडी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होणे महत्त्वाचे असते. वाचन करताना विरामचिन्हे, अर्थासह वाचन करणे, आशयाचे आकलन होणे, वाचनाच्या विविध पद्धती समजणे, अर्थ व बोधासह उच्चार स्पष्टता येणे असे वाचनाचे

अनेक पैलू लक्षात घेऊन विद्यार्थी उत्तम वाचक व्हावेत या हेतूने वाचन कौशल्याचे प्रशिक्षण इयत्ता सहावीसाठी घेण्यात आले.

जून ते डिसेंबर या कालावधीत दूरस्थ आणि प्रत्यक्ष परिस्थितीनुरूप घेण्यात आला. या विषयातील तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने व कृती कार्यशाळाही यासाठी घेण्यात आल्या. या प्रशिक्षणाचा परिणाम म्हणजे विद्यार्थ्यांची वाचनातील गती वाढली, वाचनाचे महत्त्व त्यांना कळले व वाचन हे नियमित अभ्यासाशीही त्यांना जोडता आले.

कृतीपत्रिका सोडवताना वाचनातल्या अनेक गमतीजमती विद्यार्थ्यांनी अनुभवल्या, ते स्वतः स्वत:ची वाचनातील चूक ओळखू लागले आणि मुख्य म्हणजे वाचनाच्या तासिकेची उत्सुकतेने वाट पाहू लागले.

अतिशय उत्तम प्रतिसाद मिळालेले हे वाचन कौशल्य प्रशिक्षण कृतीयुक्त अध्ययनाचे महत्त्व अधोरेखित करणारे होते.

## पाठांतर (इयत्ता ७ वी)

स्मरण कौशल्यात वाढ करणे, उच्चार शुद्धता व स्पष्टता, आशय समजणे, शुद्ध व चालीत पद्य प्रार्थना अभंग म्हणता येणे, या उद्देशाने इयत्ता सातवीसाठी पाठांतर कौशल्य प्रशिक्षण घेण्यात आले. जून २०२१ ते डिसेंबर२०२१ या काळात, परिस्थितीनुरूप दूरस्थ व प्रत्यक्ष पद्धतीने संपूर्ण विद्यार्थी गटावर मुक्तिसोपान संगीत विद्यालयाच्या अध्यापकांच्या मदतीने पाठांतर प्रकल्प घेण्यात आला.

या वर्गाच्या पालकांचाही यामध्ये कृतीयुक्त सहभाग होता. एका गटात सहा विद्यार्थी व एक पालक असे नऊ गट करण्यात आले. या विद्यार्थ्यांचे पाठांतर या पालकांनी ताईंच्या मदतीने करून घेतले. वर्गाच्या पाठांतराचा आढावा घेणे व पाठपुरावा करणे हे वर्गाध्यापिकांनी केले. निवडक अभंग, स्तोत्र, कविता, प्रार्थना व उतारा अशा विविध प्रकारचे पाठांतर वर्गातील ५०% विद्यार्थ्यांनी पूर्ण केले.

## वक्तृत्व कौशल्य (इयत्ता आठवी)

वक्ता दशसहस्रेषु ।

वक्तृत्व कौशल्याचा विकास व त्याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढवणे या उद्देशाने इयत्ता आठवीसाठी वक्तृत्व कौशल्य प्रशिक्षण आयोजित केले होते. या प्रशिक्षणांतर्गत कथाकथन, प्रकट वाचन व भाषण अशा तीन सत्रांचा समावेश करण्यात आला. भक्तीताई वर्मा यांनी प्रशिक्षणाअंतर्गत तीन सत्रे घेतली. प्रशिक्षणांतर्गत विद्यार्थ्यांना भाषणाचे, लेखनाचे मुद्दे कसे काढावेत, ते सादर करताना चेहऱ्यावरील हावभाव, देहबोली, आवाजातील चढ-उतार कसे असावेत असे सादरीकरणातील अनेकविध पैलू विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. कथाकथन करताना विषय वयाला साजेसा असावा, त्यातील महत्त्वाचा मुद्दा योग्य पद्धतीने विस्तारित कसा करावा हे सांगितले. प्रकट वाचन करताना आवाजातील

चढ-उतार, वाचनाचा वेग इत्यादी वाचनाचे पैलूही अतिशय सोप्या भाषेत उदाहरणाद्वारे विद्यार्थ्यांपर्यंत पोचवले. तीनही interactive व कृतीयुक्त सत्रांना विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

सत्र १ - कथाकथन परीक्षण : मयुरीताई जेजुरीकर (पालक)

सत्र २ - भाषण परीक्षण: दत्तात्रय धुमाळ सर

सत्र ३ - प्रकट वाचन परीक्षण: वैशाली येळगावकर

या तिन्ही परीक्षकांनी विद्यार्थ्यांचे केलेले मूल्यमापन वार्षिक परीक्षेच्या निकालामध्ये श्रेणीच्या स्वरूपात दिले गेले. या मूल्यमापनामध्ये श्रेणी व remarks दिले गेले. हे प्रशिक्षण विद्यार्थ्यांचे इंग्लिश उच्चार सुधारण्यास व शब्दसंग्रह वाढवण्यास साहाय्यकारक ठरले. शिवाय विद्यार्थी आत्मविश्वासपूर्वक गटासमोरही सादरीकरण करू लागले.

## * व्यक्तिपरिचय

विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या व्यक्तींचा परिचय व्हावा, प्रेरणा जागृती व्हावी व नम्रपणे, विश्वासाने प्रश्न विचारण्याचे कौशल्य व संवाद कौशल्य वाढावे या हेतूने व्यक्तिपरिचय घेतले जातात. यावर्षी इयत्ता ५ वी ते १० वी या सर्व इयत्तांचे मिळून एकूण ३० व्यक्तिपरिचय झाले.

परिस्थितीनुसार दूरस्थ व प्रत्यक्ष पद्धतीने झालेल्या या व्यक्तिपरिचयांमुळे विद्यार्थ्यांचे प्रश्न कौशल्य व संवाद कौशल्य वाढले. अनेक मान्यवरांच्या परिचयातून विविध कला, कार्यक्षेत्र यांचा परिचय झाला. भविष्यामध्ये आपण काय निवडावे, कोणते क्षेत्र आपल्यासाठी योग्य आहे असा सारासार विचार करण्याची सवय मुलांमध्ये निर्माण झाली. व्यक्तिपरिचयापूर्वी अध्यापकांसाठी घेतलेल्या सत्रामुळे व्यक्तिपरिचय कसा घ्यावा? प्रश्नावली कशी काढावी? कोणते प्रश्न विचारावेत कसे विचारावेत? याविषयी वर्गाध्यापकांना विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करता आले.

यावर्षी झालेले व्यक्तिपरिचय असे

| इयत्ता | अभ्यागत |
|---|---|
| पाचवी | श्री.निलेश गावडे |
| | कु.तनया गोखले |
| | सौ. शैला पाचपुते |
| सहावी | श्री.निलेश गावडे |
| | कु.सृष्टी सापटणेकर |
| | श्री.विप्रदास सर |

| इयत्ता | अभ्यागत |
|---|---|
| आठवी | डॉ.दोयल लोकापुरे |
| | श्री.अनिरुद्ध किल्लेदार |
| | सौ.पूर्वा देशमुख |
| | श्री.कल्पेश कोठाळे |
| नववी | श्री.मिलिंद जोशी |
| | श्री.प्रकाश खांजोडे |
| | श्री.सिद्धार्थ पणे |
| | श्री.शिवराज पिंपुडे |

| इयत्ता | अभ्यागत |
|---|---|
| सातवी | सौ.मयूरी जेजुरीकर |
| | सौ.शीतल कापशीकर |
| | श्री.राकेश भुजबळ |
| | सौ.स्वाती पाटील |
| | सौ.सोनाली गोलांडे |

| इयत्ता | अभ्यागत |
|---|---|
| दहावी | सौ.सीमा मंचाली |
| | डॉ.विक्रम खरे |
| | मा.श्री.देवळेकर सर |
| एकत्रित | श्री.मातेरे |
| | श्री.अमृत सामक |

## ※ अग्रणी प्रशिक्षण

नेतृत्व कौशल्य विकसनासाठी अग्रणी योजना राबवली जाते. या योजनेअंतर्गत विभागात अग्रणींसाठी नियोजन कौशल्य विकसन प्रशिक्षण घेण्यात आले. वैचारिक, एकत्रित चर्चा, कल्पनाविस्फोट व काही तासिकांना अध्यापकांशी मुक्त संवाद अशा स्वरूपात हे प्रशिक्षण झाले. प्रशिक्षणातील कौशल्यांचे उपयोजन करण्याची संधी English Day च्या निमित्ताने अग्रणी गटाला मिळाली.

इंग्रजी अध्यापकांच्या मार्गदर्शनानुसार सर्व बारकाव्यांसहित प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या पंधरा दिवस आधीपासून नियोजनास सुरुवात झाली. व्याकरण व शब्दसंपत्तीस पूरक असे वर्गशः वेगवेगळे उपक्रम व अभ्यास खेळ अग्रणींनी तयार केले. हा उपक्रम दूरस्थ पद्धतीने होणार असल्याने तांत्रिक व्यवस्थेची जबाबदारीही विद्यार्थ्यांनी घेतली. वेळापत्रक, झूम लिंक्स, flyer अशा सर्व गोष्टींचे उत्तम नियोजन व कार्यवाही केली गेली.

प्रत्यक्ष उपक्रम अतिशय उत्साहाने नियोजनपूर्वक पार पडला. इयत्ता ५ वी ते ७ वी साठी Rapid Fire, Pronunciation, Crossword, Spell bee, Jumble words आणि Poetry यासारखे खेळ व उपक्रम घेण्यात आले. ८वी मध्ये Stories, Literature and Facts Debate, Rapid Fire, Comprehension and Facts यासारखे उपक्रम घेण्यात आले. इयत्ता ९ वी मध्ये Spell bee, Figure of speech, Stories, Comprehension and Facts, Hangman सारखे उपक्रम आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांचा सहभाग व प्रतिसाद उत्तम होता.

या उपक्रमातील विविध अभ्यास खेळांमुळे विद्यार्थ्यांच्या इंग्रजी भाषेच्या ज्ञानात भर पडली, व अग्रणी बारकाव्यांसहित नियोजन करायला शिकले. विद्यार्थ्यांच्या क्षमतांना वाव देणारे हे उपक्रम विद्यार्थ्यांचा उत्साह व आत्मविश्वास वाढविणारे ठरले.

## ※ संग्रहात्मक प्रकल्प

अध्ययनाची नवीन पद्धती वापरून विद्यार्थ्यांचा अभ्यासातील रस दूरस्थ शिक्षण पद्धतीतही टिकवून ठेवण्यासाठी दूरस्थ पद्धतीने संग्रहात्मक प्रकल्प हा उपक्रम विभाग प्रमुखांशी आणि मा. प्रशांत दिवेकर सरांशी (ERC) चर्चा करून इयत्ता ५वी व ६ वी साठी घेण्याचे ठरले.

यामध्ये दोन्ही वर्गातील विद्यार्थ्यांच्या ५ ते ६ जोड्या व एक मार्गदर्शक अध्यापक अशी रचना करण्यात आली होती. संग्रहात्मक प्रकल्पात आवश्यक प्रत्येक पायरीचे (उदा.निरीक्षण कौशल्य, वर्गीकरण कौशल्य) एक प्रशिक्षण सत्र, पाठपुरावा, सुधारणा व मूल्यमापन असे एकूण दीड महिन्याच्या कालावधीचे नियोजन होते.

विद्यार्थ्यांच्या निरीक्षण कौशल्य व वर्गीकरण कौशल्य आत्मसात करण्यातील सकारात्मक फरक प्रत्येक मूल्यमापन करतांना जाणवत होता. (सुरुवातीला ५ ते ६ निरीक्षणे लिहिणारे विद्यार्थी नंतर गोळा केलेल्या वस्तूंची त्यापेक्षा अधिक निरीक्षणे सांगू व नोंदवू लागले. २ ते ३ पद्धतींनी वर्गीकरण करणारे विद्यार्थी वेगळ्या पद्धतीनी वर्गीकरण करू लागले.)

दूरस्थ पद्धतीने हा उपक्रम घेताना एकूण संग्रह संख्या कमी करावी लागली, प्रत्यक्ष प्रदर्शन भरविता आले नाही मात्र PPT द्वारे presentation सगळ्यांनाच करता आले. पालकांचेही सहकार्य सर्व सत्रांच्या वेळी मिळाले.

दूरस्थ पद्धतीने केलेल्या ह्या संग्रहात्मक प्रकल्पाचा अनुभव विद्यार्थीच नव्हे तर अध्यापकांसाठीही वेगळा व आत्मविश्वास वाढविणारा होता.

## * विशेष उल्लेखनीय महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती परीक्षा २०२१

यावर्षी विभागातील इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी च्या २४ विद्यार्थ्यांपैकी शिष्यवृत्ती प्राप्त ६ विद्यार्थी खालीलप्रमाणे –

| इयत्ता | विद्यार्थ्याचे नाव | प्राप्त गुण (%) | तालुकास्तरावरील क्रमांक | जिल्हास्तरावरील क्रमांक |
|---|---|---|---|---|
| ५ वी | कु.अश्विन देवळेकर | ७६% | ४७ | २२७ |
| ८ वी | कु. प्रियांका भाटे | ७६.६६% | १७ | ६८ |
| | कु.अदिती भांडारकर | ७४% | २१ | १०७ |
| | कु.श्रावणी देशमुख | ६८% | ४६ | २३५ |
| | कु.तनिष्का सूर्यवंशी | ६४% | ६१ | ३४२ |
| | कु.आदिनाथ शेडगे | ६२.६६% | ७० | ३९४ |

✷✷✷

### * अभिनंदन *

- **अनमोल तपशाळकर या विद्यार्थ्याने** Amatur Athletic Association, **पुणे आयोजित जिल्हास्तरीय** Sub junior athletics championship **या लांब उडी स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला.**
- **चित्रकलेलच्या** Elementary **परीक्षेमध्ये श्रिया पावसकर, सिद्धी घोडेकर, भूमिका महाजन, अंजोर इंगवले व रेवती नंदे या इयत्ता नववीच्या विद्यार्थिनींना** A+ **श्रेणी मिळाली.**

# गुरुकुल विभाग



पंचाकोशाधारित शिक्षण म्हणून गुरुकुलची ओळख सर्वांना आहेच. या वर्षी ऑनलाईन ऑफलाईन आणि हायब्रीड अशा सर्वच पद्धतीने हे शिक्षण सुरु राहिले हे यावर्षीचे वैशिष्ट्य होते. स्क्रीनचा वेळ कमी ठेवून जास्तीतजास्त उपक्रम देणे ते विद्यार्थ्यांकडून करवून घेणे हे या वर्षीचे मोठे आव्हान होते. पण या परीक्षेतही अध्यापक पालक आणि विद्यार्थीही आत्मविश्वासाने उत्तमरित्या उत्तीर्ण झाले असे पुढील उपक्रमांवरून म्हणता येईल.

## ❊ अन्नमय कोश

दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त गुरुकुलाच्या विद्यार्थ्यांनी १००० सूर्यनमस्कार घातले. यावेळी दूरस्थ पद्धतीने झालेल्या या उपक्रमात गुरुकुलासोबत महाराष्ट्रातील अन्य गुरुकुल, प्रबोधिनीची विविध केंद्र, पालक, माजी विद्यार्थी यांनी त्यांचा सहभाग नोंदवला. निगडी केंद्रातील देखील अनेक सदस्य यात प्रत्यक्ष व आभसीपणे सहभागी झाले होते.

| **सहभागी सदस्य** | |
|---|---|
| विद्यार्थी | १,६३,६६७ (१८९/२०३) |
| अध्यापक | २,५२६ (१५) |
| इतर संस्था | २३,८६० (७-२४१) |
| अन्य | २१,६२८ (१४७) |

| **सर्वाधिक सूर्यनमस्कार** | |
|---|---|
| विद्यार्थी | रोहित काळे (२२२२),<br>भार्गव सावंत (१८००) |
| अध्यापक | कल्याण गरडे (१०००) |
| अन्य | स्वाती वनशेट्टी, सोलापूर (१५००) |

| **हजार सूर्यनमस्कार घातलेले विद्यार्थी** | | | |
|---|---|---|---|
| ५ वी : १७ | ६ वी : २१ | ७ वी : ३० | ८ वी : २९ |
| ९ वी : २९ | १० वी : २१ | अन्य : ८ | |
| **एकूण सूर्यनमस्कार – २,११,६८१** | | **सहभागी संख्या – ५९२** | |

## ✻ प्राणमय कोश

**प्रतिभेला नित्य नव्या लाभती मिती.**

स्वाभाविक बुद्धी आणि अनुभव यांचा मेळ साधून केलेली सृजनशील कामे अथवा कलाविष्कार असा प्रतिभा या शब्दाचा सहज लक्षात येणारा अर्थ होतो. प्रतिभा आणि कौशल्य दोघांचा उत्तम मेळ साधून नवनिर्मिती घडवून आणणे अगदीच शक्य आहे. असा विचार करून या वर्षीच्या छंदवर्गाचे नियोजन करण्यात आले होते.

### ✻ उद्दिष्ट-

१. विद्यार्थ्यांनी अशा छंदवर्गात रमून जाणे.

२. विद्यार्थ्यांना जीवन, पूरक, कारक, प्रेरक कौशल्यांची ओळख करून देणे.

३. विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण लक्षात घेऊन त्यांना मार्गदर्शन करणे. त्यांच्या कला गुणांना वाव देणे या उद्देशाने विचार करून ६०-७० कल्पना काढल्या.

यापुढे सर्वांचा विचार करून त्यातील इ.५वी ते इ.८वी साठी प्रत्येकी १२ कल्पना ७ दिवसांसाठी अंतिम करण्यात आल्या. छंदवर्गात मनोरंजनपर एखादा कार्यक्रम, दर्जेदार व्यक्तिपरीचय, स्पर्धा, एखादा चित्रपट एकत्र बघणे, विद्यार्थ्यांसाठी खाऊ तयार करणे अशा छोट्या छोट्या गोष्टीचा यात समावेश करण्याचा विचार झाला आणि ७ दिवसांचे नियोजन वर्गशः अंतिम करण्यात आले. यासाठी लागणारे सामान, प्रशिक्षक, विद्यार्थ्यांना घरून आणावे लागणारे सामान, वर्गशिक्षक सहभाग, पालक सहभाग, विद्यार्थी कार्यकर्ते असा विचार करून पूर्वतयारी एक महिन्यापासून सुरु करण्यात आली.

विद्यार्थ्यांना घरून आणायची यादी त्यांना देण्यात आली. पूर्ण नियोजनाचा एक मोठा कागद शिक्षक खोलीत लावण्यात आला बऱ्याच बारीक बारीक गोष्टी त्या नियोजनात टिपून ठेवल्या होत्या. सर्व छंदवर्गाच्या नियोजनाने विद्यार्थ्यांमध्ये वेगळा उत्साह संचारला होता.

दि.१३एप्रिल, परीक्षा संपली लगेच दुसरा दिवस...व्यक्तिपरीचय दिवस...सर्व तयारी, सर्व नियोजन वर्गशः सुरु झाले. सर्वच विद्यार्थ्यांनी यात सक्रिय सहभाग घेतला होता. आलेल्या पाहुण्यांचा यथोचित सत्काराने दिवसाची सांगता झाली. पुढचे सर्व दिवस धामधुमीचे नियोजनाचे होते. चित्रकला, गोधडी शिवणे, सुतारकाम, उती संवर्धन, प्रतिभाशाली लेखन, प्रभावी सूत्रसंचालन, वक्तृत्व, भिंत सुशोभित करणे, बागकाम, इस्त्री करणे, कपड्यांच्या व्यवस्थित घड्या करणे, बॅग पॅक करणे अशा अनेक कार्यशाळा ज्यातून जीवन, कारक, प्रेरक कौशल्यांची ओळख विद्यार्थ्यांना करून देण्यात आली. ओळख असे म्हणत असताना त्या ओळखीतून विद्यार्थ्यांनी स्वतःची आवड ओळखावी आणि त्याचे प्रशिक्षण, मार्गदर्शन घेऊन त्याची जोपासना करावी. असा हेतू यामागे होता.

उद्दिष्टाप्रमाणे विचार करत असताना सर्व छंदवर्ग गुणवत्तापूर्ण झाले असे सर्वच आलेल्या प्रतिसादातून

दिसून आले. निष्पत्ती लक्षात घेण्यासाठी विद्यार्थ्यांकडून प्रतिसाद देणारे फॉर्म भरून घेण्यात आले होते. त्या फॉर्मचा अभ्यास केल्यावर लक्षात आलेले विद्यार्थी उपस्थिती रोजच ९९%होती. विद्यार्थ्यांना १२ पैकी १० छंदवर्ग मनापासून आवडले. सर्वच छंदवर्ग त्यांच्या पुढील वाटचालीत मार्गदर्शक आहेत असेही काही विद्यार्थ्यांनी जाणीवपूर्वक नोंदवले. पालक प्रतिसाद-दोन वर्षांनी मुलांच्या चेहेऱ्यावर खूप आनंद बघायला मिळाला. नवनिर्मितीचा आनंद मित्रांबरोबर मनसोक्त लुटला. सर्वच छंद वर्ग खूप नाविन्यपूर्ण होते. मुलांना असे सप्तरंगी अनुभव दिल्याबद्दल गुरुकुलाचे खूप आभार. कोणतेही काम करायचे झाले तर अनेकांचे मदतीचे हात असतील तर काम यशस्वी आणि पूर्ण करण्यात मजा येते. हे सर्व शिक्षकांनी केलेल्या सहकार्यातून दिसून आले. पण त्यातूनही रोज घरातील कामे बाजूला ठेवून गुरुकुलसाठी धावून येणारे पालक मात्र सदैव लक्षात राहतील.

## ❊ मनोमय कोश

नमोस्तुते गुरुदेवा... (गुरुतुल्य व्यक्तींच्या व्याख्यानमाला)

गुरुकुलाचे हे रौप्यमहोत्सवी वर्ष असल्याने प्रत्येक उपक्रमात नवीन काहीतरी व तेही आशयपूर्ण करण्याचा आमचा मानस होता. हाच विचार मनात ठेवून गुरुपौर्णिमेनिमित्त गुरुकुल विभागाने व्याख्यानमालेचे आयोजन केले होते. व्याख्यानमालेचे विषय काय असावेत याबद्दल बोलताना क्रांतिकारक, थोर विचारवंत, तत्त्वज्ञ अशा अनेक नावांचा विचार झाला. आणि त्यातून विद्यार्थ्यांना ज्ञान प्रबोधिनीच्या पथदर्शकांची (आठवी ते दहावी) व्याख्यान सत्रे आणि छोट्या गटाला (पाचवी ते सातवी) थोर व्यक्तींबद्दल कथाकथन सत्रांचे नियोजन केले. ही सर्व सत्रे दूरस्थ पद्धतीने zoom च्या माध्यमातून घेण्यात आली. या सत्रांचा दुवा तयार करणे, पद्य ऐकवणे, प्रस्तावना व व्याख्यात्यांचा परिचय करून देणे असे नियोजन त्या त्या गटाला सांगण्यात आले.

छोट्या गटासाठी सावित्रीबाई फुले यांबद्दल बोलायला सौ. मीरा इनामदार आणि महात्मा गांधी यांबद्दल बोलायला श्री. शुभंकर केळकर हे वक्ते आले होते. त्यांनी मुलांना प्रश्न विचारत सत्रात सहभागी करून घेत वेगवेगळ्या कथा सांगून माहिती दिली. साहजिकच सावित्रीबाई आणि गांधीजी यांच्याबद्दल नवनवीन गोष्टी मुलांना कळल्या. मुलांचा चांगला सहभाग या व्याख्यानांना होता.

समर्थ रामदास, स्वामी विवेकानंद, महर्षी दयानंद, योगी अरविंद यांची ओळख अनुक्रमे श्री. प्रशांत दिवेकर, श्री. आदित्य शिंदे, श्री. नचिकेत नित्सुरे, श्री. कल्पेश कोठाळे यांनी करून दिली. विद्यार्थ्यांना समजेल अशा सोप्या भाषेत, पारदर्शिका वापरून मोठ्या गटात या चार पथदर्शकांची माहिती चार वेगवेगळ्या वक्त्यांनी दिली. व्याख्यानमालेनंतर या थोर गुरुतुल्य व्यक्तींबद्दल अतिरिक्त वाचन केले. तसेच वर्गशः व्याख्यानांबद्दल चर्चा घेण्यात आली. गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने आपले पथदर्शक आपले गुरूच आहेत आणि त्यांच्याबद्दल माहिती घेऊन आपण गुरुपौर्णिमा चांगल्या पद्धतीने साजरी केली असे म्हणता येईल.

## * आनंदमय कोश (स्नेहसंमेलन)

गेल्या दोन वर्षांमध्ये काही जेष्ठ श्रेष्ठ व्यक्ती हे जग सोडून गेल्या. गुरुकुलाने गीत सादरीकरणाच्या माध्यमातून या सर्वांच्या कार्याबद्दलची कृतज्ञातापूर्वक आदरांजली अर्पण केली. मराठी साहित्यातले मोठे नाव म्हणजे शांता शेळके, शिवाजी महाराजांचे गाढे अभ्यासक असे बाबासाहेब पुरंदरे, भारतरत्न व संपूर्ण भारताचा अमृत स्वर असे म्हटले गेलेल्या लता मंगेशकर, व अनाथांची माय असणाऱ्या सिंधू सपकाळ. या दिग्गजांना आदरांजली किलबिल किलबिल पक्षी बोलती, शूर आम्ही सरदार, सर पै हिमालय का छत्र है, वेडात मराठे, तू बुद्धी दे तू तेज दे व बलसागर भारत होवो या गीतांमधून अर्पण केली.

या नंतर कथ्थक नृत्यांगना सौ. सोनिया परचुरे व त्यांच्या गटाने त्यांच्या विविध बॅलेमधील काही गाण्यांवरील नृत्य सादरीकरण केले. या मध्ये सरस्वती वंदन, संत ज्ञानेश्वर, स्वा. सावरकर अशा काही विषयांचा समावेश होता. त्या नंतर मुख्य इमारतीच्या चौकामध्ये सोनियाताईंच्या गटाने कथ्थक नृत्यामधून बुद्धिबळाचा पट आम्हाला दाखवला. बुद्धिबळातील प्रत्येक सोंगटी कशी चाल करते ते एक प्रत्यक्ष खेळ त्यांनी खेळून दाखवला. हे सर्व बघतांना सर्वचजण रोमांचित झाले होते. अशा प्रकारे देखील बुद्धिबळ खेळता येऊ शकतो, शिकता येऊ शकतो असा सर्वांच्याच मनात नक्की विचार आला.

## * पालक मेळावा

पालक संघटन हे प्रबोधिनीची खूप मोठी ताकद आहे. गुरुकुलमध्ये तर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व घडणीतला अविभाज्य घटक आहे. दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील पालक मेळाव्याचे आयोजन केले. डॉ.अनघा लवळेकर यांचे व्याख्यान पालक व अध्यापक यांच्यासाठी आयोजित करण्याचे ठरले. पद्य प्रस्तावना परिचय झाल्यानंतर अनघाताईंनी पालकांशी संवाद करायला सुरुवात केली. पालकत्व हे कायम बदलत राहणारे आहे. मुलांचे वय, प्रसंग यानुसार मुलांना समजून घेत घेत पालकत्व बहरत जात असते. पालकांचे आणि मुलांचे हक्क यामध्ये समनव्य साधून मुलांशी संवाद साधायचा असतो. मुलांना घरातील निर्णय घेण्यात सहभागी करून घ्यावे. विशेषतः जेव्हा त्याची स्वतःची मते मुलांना यायला लागतात. मुलांना वाढवण्याच्या सगळ्या प्रक्रियेत कधीही आपल्याला कोणाला मदतीची गरज असेल तर ती घेण्यात कधीही संकोच करू नका. अशा २५ मुद्यांवर अनघा ताईंनी सविस्तर मार्गदर्शन केले. पालकांना या व्याख्यानाचा खूप उपयोग झाला असे नंतर त्यांच्या प्रतिसादांमधून समजून आले.

***

### * अभिनंदन *

**नागपूर येथे झालेल्या सिनियर स्टेट ओपन बॅडमिंटन चॅम्पियनशिप २०२२ या स्पर्धेत कु. आरती दत्तात्रय चौगुले (इ.१० अ) हिला तृतीय क्रमांक मिळाला.**

# क्रीडाकुल विभाग




## * दिन विशेष

शिक्षण विभाग

हिंदी दिन

क्रीडाकुल विभाग में हर साल की तरह इस साल भी हिंदी दिन का आयोजन किया गया ।इस सम ारोह मे कथाकथन प्रतियोगिता, कविता वाचन प्रतियोगिता, वक्तृत्व प्रतियोगिता, निबंध प्रतियोगिता जैसी प्रतियोगीताये आयोजित कि थी । प्रस्तुत प्रतीयोगीताये ५ वी. ६वी. का एक, ७ वी. ८ वी. का एक और ९ वी दसवी का एक ऐसे समूहोमे आयोजित की गयी ।

इस साल मुख्य अभ्यागत के रूप में सौ. वृंदाताई गोसावी इन्होने उपस्थित रहकर इस कार्यक्रम की शोभा बढाई । हमारे कक्षा ५वीं से १० वीं के बच्चों को मार्गदर्शन किया। कार्यक्रम मंगलवार दि. अट्ठाईस सितंबर को सुबह दस से बारातक पाठशाला के मनोहर सभागृह में हुआ।

### मराठी दिन

दि. २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२२ रोजी मराठी दिन साजरा करण्यात आला मराठी दिन साजरा करताना सगळे विद्यार्थी सहभागी करून घ्यायचे या दृष्टिकोनातून सर्वांची हस्ताक्षर स्पर्धा घ्यायची ठरले. याची सुरुवात प्रत्यक्ष विद्यार्थी शाळेत यायला लागले तेव्हा झाली. हस्ताक्षर लेखनातून पाचवी ते दहावीतील उत्तम हस्ताक्षर असणाऱ्या पंचवीस विद्यार्थ्यांची निवड केली. या विद्यार्थ्यांकडून मनाच्या श्लोकातील एक ते पंचवीस श्लोकांचे लेखन करून घेतले.

निबंध लेखन स्पर्धाही या निमित्ताने घेतली गेली. ५ वी ते ७ वी एक गट व ८ वी ९ वी १० वी एक गट अशा दोन गटात ही स्पर्धा घेतली. निबंधाच्या विषयांमध्ये चरित्रात्मक आत्मकथन वर्णनपर अशांसारखे काही विषय दिले होते. एकूण विद्यार्थ्यांकडून ऐंशी निबंध आले.

याबरोबरच विद्यार्थ्यांसाठी इयत्ता नुसार घोषवाक्य स्पर्धांचे आयोजन केले गेले. त्यांना व्यक्तिशः अथवा गटशः असे घोषवाक्य लेखन करायला स्वातंत्र्य दिले गेले. व्यायाम व आरोग्य, पर्यावरण,

वाचन लेखन, स्वच्छता इत्यादी विषयांवर विद्यार्थ्यांनी भरपूर घोषवाक्य तयार केली. काही संकलन व काही नवनिर्मिती तर काहींनी पालकांची मदत घेऊन घोषवाक्य तयार केली. यातील निवडक घोषवाक्य बाजूला काढून श्री. शेलार सरांकडून त्यांचे लेखन तक्त्यांच्या रुपात करवून घेतले. हस्ताक्षर स्पर्धेतील २५ मनाचे श्लोक, विविध साहित्य प्रकार असलेली पुस्तके इ.चे एक छोटेसे प्रदर्शन विभागात भरवले होते.

इयत्ता ५ वी ते ७ वी च्या गटासाठी नाट्यछटांचे विषय देऊन यावर तुम्ही सादरीकरण करा असे आवाहन करण्यात आले. इयत्ता ७ वी तून नटसम्राट नाटकातील एका स्वगताचा सरावही सुरु झाला. तसेच मराठी भाषेतील साहित्याचे मुलांना प्रकार समजावेत म्हणून निवडक गटाकडून कविता, भारुड, आर्या, ओवी, अभंग इ. बसवून घेतले. यासाठी विभागातील अन्य सहकाऱ्यांची मदत झाली.

विद्यार्थी सादरीकरणाबरोबर अध्यापकांनीही या दिवशी साहित्यातील आपल्या आवडीचा एक प्रकार निवडून विद्यार्थ्यांसमोर सादरीकरण केले.

'मर्द आम्ही मराठे खरे' याचे सुंदर पद्यगायन वि. वा. शिरवाडकरांचे साहित्य व व्यक्तिमत्वाचे विविध पैलू विद्यार्थ्यांसमोर मांडले. यातच अध्यापकांनी पुस्तक परिचय, स्वरचित काव्य वाचन, नाटकातील स्वगत सादरीकरण, मराठी संतांची गोष्टीरूप ओळख, आठवणीतल्या बालकविता आणि पुणेरी पाट्या अशा पद्धतीने विविधांगी मराठी साहित्याचा परिचय करून दिला. विद्यार्थ्यांनी त्यांच्या सादरीकरणात नाट्यछटा, भारुड,निसर्गवर्णन, मराठी चारोळ्या अशा प्रकारची अनेकांनी सादरीकरणे केली. मराठी दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी तयार केलेली घोषवाक्ये तसेच या दोन दिवसात मुलांनी वेगवेगळ्या साहित्य प्रकारांची ओळख करुन घेतली.

## विज्ञान दिन

शनिवार दि. ५ मार्च २०२२ रोजी इ.५ वी ६ वी व ७ वी चा विज्ञान दिन मोठ्या उत्साहाने पार पडला. पाचवीतील विद्यार्थ्यांनी पुढाकार घेऊन सर्व तयारी केली. विज्ञान विषयातील पाठातील असणारे वेगवेगळे प्रकल्प, प्रयोग प्रदर्शनात मांडले होते व विद्यार्थी मांडणीही करत होते इ ६ वी च्या विद्यार्थ्यांनी विज्ञान कोडी तयार केली होती. तीही प्रदर्शनात ठेवली होती. इ ७ वी च्या काही विद्यार्थ्यांनी models बनवले होते तर काही विद्यार्थ्यांना शाळेतील models present करायला सांगितले.

प्रदर्शन पाहण्यासाठी मा. देवळेकर सर मेधाताई सर्व अध्यापक व क्रीडाकुल मधील विद्यार्थी आले होते. प्रदर्शनाची सुरुवात विज्ञान गीताने व नमस्ते घेऊन झाली. सर्वांसमोर विद्यार्थ्यांनी प्रकल्प माहिती सांगितली. नंतर इ ५ वी तील मानसीने अध्यापकांचा अभिप्राय ही घेतला अशा पद्धतीने क्रीडाकुल मध्ये प्रथमच विज्ञान दिन साजरा झाला.

## गणित दिन

दि.२२ डिसेंबर रोजी इ ५ वी ते १० वी गणित दिनाचे आयोजन केले होते. गणित दिनाची सुरुवात इ ५ वी ते ७ वी साठी पूर्वाताईंनी गणितज्ज्ञ रामानुजन बद्दल माहिती सांगितली. तसेच ८ वी ते १० वी साठी ओंकार भोसले या माजी विद्यार्थ्याने pascal's triangle मधील गमती विद्यार्थ्यांना सांगितल्या. दुसऱ्या टप्यात इ ५ वी साठी ठिपक्यांची रांगोळी, ६ वी साठी सर्व विद्यार्थ्यांची उंची व वजन पाहून सर्वांची सरासरी काढणे, ७ वी geometrical diagrams तसेच ८ वी साठी models तयार करणे अशा विविध प्रकारे सकाळचा वेळ दिला गेला. विद्यार्थ्यांना गणित प्रयोगशाळेत नेऊन साहित्यांची ओळख करून दिली. तिसऱ्या टप्यात विद्यार्थ्यांचे गट करून प्रश्नमंजुषा घेतली.

## ❊ आषाढी एकादशी अभंग गायन

२० जुलै रोजी विभागाचा आषाढी एकादशी निमित्त अभंग गायनाचा कार्यक्रम खूप छान आणि उत्साही वातावरणात मनोहर सभागृहात पार पडला. कार्यक्रमात दूरस्थ पद्धतीने विद्यार्थी, पालक सदस्य सहभागी झाले होते.

छोट्या विद्यार्थ्यांनी, पालकांनी व अध्यापकांनी छान तयारी करून अभंग गायन केले. आध्यात्मिक अनुभूती देणारा व भाव भक्तीमय असा हा कार्यक्रम झाला.

कै. आप्पांच्या स्मृतिदिनानिमित्त १९ ऑगस्ट रोजी इयत्ता आठवी ते दहावी एकूण १५ विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष निरुपणासहित पद्य गायनाचा कार्यक्रम मनोहर सभागृहात घेण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख अभ्यागत म्हणून जैवतंत्रज्ञान विभागाच्या प्रमुख सौ संगीता ताई कुलकर्णी उपस्थित होत्या.
खूपच भावपूर्ण असा हा कार्यक्रम झाला

## ❊ दीक्षाग्रहण

दि. १जुलै पासून दीक्षाग्रहण व्याख्यानांना सुरुवात झाली. एकूण पाच व्याख्याने झाली. यामध्ये -
१) मी एक व्रतार्थी - सौगंध देशमुख,
२) शरीर सतेज सुंदर -एकता जाधव
३) मन करा रे प्रसन्न -'अस्मिता व गीताताई मुथ्या
४) बौद्धिक विकसन आरतीताई खोत यांची व्याख्यान झालेली आहेत.
२३ जुलै रोजी इयत्ता आठवी व नववी दोन इयत्तांचे एकत्रित दीक्षाग्रहण संस्कार उपक्रम झाला. या कार्यक्रमास अभ्यागत म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते व दासबोधाचे अभ्यासक श्री अमित कुलकर्णी हे दूरस्थ पद्धतीने उपस्थित होते.

दूरस्थ पद्धतीने कार्यक्रम केल्यामुळे या दीक्षा ग्रहणाचे या वर्षीचे वैशिष्ट्य असे की जवळजवळ सर्व घरांमध्ये होम हवन झाले. पालक भारवले होते. ऑलिम्पिकचे खेळाडू कसे तयार होतात,

त्याच्या मागची प्रेरणा काय? या सगळ्यांबद्दल विद्यार्थ्यांना अभ्यागतानी खूप समर्पक प्रेरणादायी मार्गदर्शन केले. प्रातिनिधिक स्वरूपामध्ये शाळेत हा संस्कार करण्यासाठी दोन विद्यार्थी व त्यांचे पालक उपस्थित होते.

## ※ क्रीडादिन – प्रशिक्षण विभाग

२९ ऑगस्ट हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस. हा दिवस आपण राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा करतो. या दिवशी क्रीडाकुल मध्ये आपण काही कार्यक्रम राबवले होते. त्यावेळी टोक्यो ऑलम्पिक चालू असल्याकारणामुळे त्यावरती मुलांच्या प्रश्नमंजुषा स्पर्धा घेतल्या होत्या. या स्पर्धा तीन फेऱ्यांमध्ये झाल्या होत्या. प्रथम फेरीत सर्व मुलांना प्रकल्प करण्यास सांगितले होते. द्वितीय फेरीत केलेल्या प्रकल्पांवर सर्वांनी पुढे येऊन सादरीकरण करायचे होते.

तृतीय फेरी झालेल्या ऑलंपिकवरती महत्त्वाचे असे प्रश्न तयार करून त्यांची प्रश्नमंजुषा घेतली होती. त्यातून विजयी झालेल्या विद्यार्थ्यांना बक्षिसांचे वाटप करण्यात आली. संपूर्ण कार्यक्रम हा ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आला होता.

✷✷✷

※ **क्रीडाकुल विभाग भर – यावर्षी क्रीडाकुल विभागातील ४ सदस्यांनी कृती संशोधन पत्र प्रकल्प केला.**

**१) जयश्रीताई शारंगधर – हिंदी व्याकरण । काल रचना**

**२) आरतीताई खोत – मूल्यशिक्षणातील माझे विविध प्रयोग**

**३) पद्मिनीताई चव्हाण –** Development & Basic language Skill

**४) पद्मजाताई थिटे – पाल्याच्या विकासात पालकांची भूमिका**

※ **वर्षभर मानस विभागाचे इयत्ता ५वी ते ८वी चे 'वृत्ती घडण' या विषयांवरील विविध उपक्रमांद्वारे तास (सत्र) घेण्यात आले.**

### ※ अभिनंदन ※

**प्राथमिक गट १ मधील दुसरी अ मधील कु. आराध्या जोगदंड बी.डी.एस परीक्षेत गोल्ड मेडल मिळवत राज्यात ३७ वी आली आहे.**

# अनुभव शिक्षण

## संगणक विभाग



### ⁕ संगणकाधारित विकसन प्रकल्प : चला कल्पकतेने कृती करूया

**उद्दिष्ट :** विद्यार्थ्यांनी आत्मसात केलेल्या संगणकीय कौशल्यांचा रंजक पद्धतीने आढावा घेणे (वेगळ्या प्रकारे मूल्यमापन) व याचबरोबरीने गटकार्यातून विद्यार्थ्यांची कल्पकता, सर्जनशीलता, वेळेचे नियोजन, सादरीकरण कौशल्य वाढविणे.

**कार्यवाही :**

१. चार-चार विद्यार्थ्यांचे गट तयार करण्यात आले होते व प्रत्येक गटाला २ संगणक देण्यात आले.
२. संगणकाच्या शिकलेल्या ज्ञानावर आधारित १० परस्परांशी संबंधित टास्क देण्यात आले होते. प्रत्येक टास्कला संगणकीय कौशल्ये, कल्पकता, वेळेत करणे, जसेच्या तसे करणे, नाविन्य आणणे इ. वर आधारित गुण देण्यात आले होते.
३. विद्यार्थ्यांना गटाने मिळून सर्व टास्क ५० मिनिटात पूर्ण करण्यास सांगण्यात आले होते.
४. प्रत्येक विद्यार्थ्याचा सहभाग असणाऱ्या गटाला बोनस गुण देण्यात आले होते.
५. सर्व टास्क कमी वेळात व वरील सर्व अटी पूर्ण करणारा गट विजेता गट घोषित करण्यात आला होता व त्यातील सर्व विद्यार्थ्यांना वार्षिक मूल्यमापनात क्रेडीट गुण देण्यात आले.

**निष्पत्ती : विद्यार्थी :**

१) विद्यार्थ्यांना संगणकीय कौशल्यांचा योग्य वापर करता आला.
२) विद्यार्थ्यांना गटात उत्तम व वेळेत काम करता आले.
३) विद्यार्थ्यांना कल्पकतेने नवीन गोष्टी सुचल्या व त्याचा वापरही करता आला.
४) संगणक क्षेत्रात कोणतेही सॉफ्टवेअर करतांना गटात कशा प्रकारे कामाचे विभाजन करायचे असते याचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला.

**निष्पत्ती : अध्यापक :**

अध्यापकांना मूल्यमापन वेगळ्या पद्धतीने व अधिक रंजकतेने करण्याची पद्धत अवलंबता आली. यातून त्यांच्याही कल्पकतेला वाव मिळाला.

## ⁕ पालक संगणक प्रशिक्षण

**उद्दिष्ट :** परिसरातील नागरिकांची संगणक साक्षरता वाढविणे.

**कल्पना :** गेल्या वर्षी ऑनलाईन पालक प्रशिक्षणाला उत्तम प्रतिसाद मिळाल्यामुळे यावर्षी वेगळ्या प्रकारे व वेगळे कोर्स घेऊया असे अध्यापक बैठकीत ठरविण्यात आले. त्यानुसार चर्चा करून ३ कोर्सेस निश्चित करण्यात आलेत.

**कार्यवाही :** प्रशिक्षणाचे आकर्षक फ्लायर, गुगल फॉर्म आणि पत्र तयार करण्यात आले. सर्व विभाग प्रमुखांशी संपर्क करून त्या त्या विभागाच्या इयत्तेच्या गटावर पाठवण्याची व्यवस्था करण्यात आली. पालकांद्वारे भरण्यात आलेल्या गुगल फॉर्मद्वारे प्रत्येक इच्छुक पालकांशी संपर्क करण्यात आला व प्रशिक्षणाला सुरवात करण्यात आली. या वर्षी हे प्रशिक्षण ऑनलाईन व ऑफलाईन घेण्यात आले.

**निष्पत्ती : पालक विद्यार्थी :**

१) पालक स्वत:च्या कामासाठी संगणकाचा वापर करण्यास शिकले.

२) काही पालक घरातील व्यवसायात मदत करण्यासाठी शिकले.

**निष्पत्ती : अध्यापक :**

नवीन अध्यापकांना अधिकचा अभ्यास पालकांना शिकवतांना त्यांच्या गरजेनुसार उदाहरणे घेऊन शिकवावे लागते हे कळले.

## ⁕ महाविद्यालयीन विद्यार्थी प्रशिक्षण – इयत्ता ११वी व १२वी

**उद्दिष्ट :** विभागात महाविद्यालयीन अभ्यासक्रम राबविला जाणे व प्रशिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांना विभागाशी जोडणे.

**कार्यवाही :** संगणकाधारित विकसन प्रकल्पातील विद्यार्थ्यांना संगणक क्षेत्रातील अभ्यासात अडचणी असल्यास अवश्य संपर्क करावा असे आवाहन नेहमीच करीत असतो. त्यानुसार दोन विद्यार्थ्यांनी संपर्क केला असता सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला व योग्य नियोजनासह वर्ग सुरु करण्यात आले. इयत्ता ११ वीतील २ आणि १२वीतील २ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

**निष्पत्ती : विद्यार्थी :**

१) सहभागी विद्यार्थ्यांची बोर्डाच्या संगणक विषयाच्या परीक्षेची उत्तम तयारी झाली व त्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

२) विद्यार्थ्यांकडून ११ वीच्या विद्यार्थ्यांना वर्गाबद्दल सांगितले गेले, त्यामुळे ११ वीच्या दोन विद्यार्थ्यांनी वर्गाबद्दल विचारणा करून वर्ग पूर्ण केला.

**निष्पत्ती : अध्यापक :**

इयत्ता ११वी व १२वीच्या संगणक पाठ्यपुस्तकातील अभ्याक्रम घेऊ शकतो हा आत्मविश्वास वाढला.

## ❋ संगणक बुद्धिमत्ता स्पर्धा परीक्षा

**उद्दिष्ट :** स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील संगणकीय कौशल्ये, तार्किक क्षमता, कल्पकता आजमावणे.

**कल्पना :** अध्यापक बैठकीत विभागप्रमुख अनुजाताईंद्वारे कल्पना विस्फोट तंत्र वापरून स्पर्धा कशी घेऊ शकतो हे मांडण्यात आले, आलेल्या प्रकारांमधून २ प्रकार निश्चित करण्यात आले.

**कार्यवाही :** प्रथम स्पर्धा पत्रक तयार करून सर्व बाह्य शाळांना email व whatsapp द्वारा पाठविण्यात आले. त्याच बरोबरीने शाळा नाव नोंदणी करण्याकरिता गुगल फॉर्म आणि विद्यार्थी /अध्यापक सहभाग नोंदविण्याकरिता एक्सेलची फाईल पाठविण्यात आली. एकूण २० शाळांमधील ४४२ विद्यार्थी व २६ अध्यापकांनी सहभाग नोंदविला होता. परीक्षेच्या तारखेला शाळांद्वारे प्रात्यक्षिकच्या फाईल्स इमेल द्वारा पाठविण्यात आल्या. त्या फाईल्सचे वर्गीकरण करून तज्ज्ञ व्यक्तींकडून तपासून घेण्यात आले. मग निकाल तयार करण्यात आला, सर्टिफिकेट तयार करून ते इमेलद्वारा शाळांना पाठविण्यात आले. हा संपूर्ण उपक्रम ऑनलाईन घेतला.

**निष्पत्ती : विद्यार्थी :**

१) विद्यार्थ्यांमधील संगणकीय कौशल्ये, तार्किक क्षमता, कल्पकता वाढली.

२) सहभागी अध्यापाकांना संगणकचा वापर करून अध्यापन करण्यासाठी पाठ तयार करता येऊ लागले.

**निष्पत्ती : अध्यापक :**

बाह्य शाळांमधील संगणक विषयातील अध्यापकांशी संपर्क वाढविता आला. त्यांच्याशी अभ्यासक्रमाबाबत व येणाऱ्या अडचणींबाबत चर्चा करता आली.

### निकाल :

**पाठ निर्मिती स्पर्धा - अध्यापक - शहरी**

| क्र. | नाव | शाळा | मार्क | क्रमांका |
|---|---|---|---|---|
| १ | श्वेता श्रीपाद औरसंग | ज्ञान प्रबोधिनी बालविकास मंदिर सोलापूर | ८१.५ | प्रथम |

**पाठ निर्मिती स्पर्धा - अध्यापक - ग्रामीण**

| क्र. | नाव | शाळा | मार्क | क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | सौ. प्रियांका अभिजित ओझर्डे | विद्या प्रतिष्ठान इंग्लिश मीडियम स्कूल, बारामती | ७७.५ | प्रथम |

## विद्यार्थी रँकर रिपोर्ट – शहरी इयत्ता : ३ री

| क्र. | नाव | शाळा | मार्क | क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | पूजन प्रसन्न पाटील | ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय इं. मा | ७८ ७८ | प्रथम |

## इयत्ता : ४ थी MS पेंट

| क्र. | नाव | शाळा | मार्क | क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | राहीणी विकास बडोलिया | सिटी प्राईड स्कूल–निगडी | ७६ | प्रथम |

## इयत्ता : ४ थी – MSW लोगो

| क्र. | नाव | शाळा | मार्क | क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | त्रिशा चौहान | सुयोग सुंदरजी विझडम स्कूल | ७९ | प्रथम |

## इयत्ता : ५ वी –

| क्र. | नाव | शाळा | मार्क | क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | निवेदिता लथेश | सिटी प्राईड स्कूल–मोशी | ९५ | प्रथम |

## इयत्ता : ६ वी –

| क्र. | नाव | शाळा | मार्क | क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | प्राप्ती नाहर | विद्या निकेतन इंग्लिश मीडियम स्कूल | ७८ | प्रथम |

## इयत्ता : ७ वी –

| क्र. | नाव | शाळा | मार्क | क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | रोहन कट्टीमनी | विद्या निकेतन इंग्लिश मीडियम स्कूल | ७८ | प्रथम |

## इयत्ता : ८ वी –

| क्र. | नाव | शाळा | मार्क | क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | उन्नती कुलकर्णी | विद्या निकेतन इंग्लिश मीडियम स्कूल | ७२ | प्रथम |

## इयत्ता : ९ वी –

| क्र. | नाव | शाळा | मार्क | क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | मृण्मय प्रकाश पवार | नॉव्हेल इंटरनॅशनल स्कूल | ७१ | प्रथम |

**इयत्ता : ३ री विद्यार्थी रँकर रिपोर्ट - ग्रामीण**

| क्र. | नाव | शाळा | मार्क | क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | रुद्राणी स्वप्नील देवकते | विद्या प्रतिष्ठान इंग्लिश मीडियम स्कूल, बारामती | ७१.५ | प्रथम |

**इयत्ता : ४ थी**

| क्र. | नाव | शाळा | मार्क | क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | शौर्य गणेश शेरकर | विद्या प्रतिष्ठान इंग्लिश मीडियम स्कूल, बारामती | ७० | प्रथम |

✸✸✸

## ❊ संगणक अभिरुची ❊

**अध्यापक मनोगत -सौ. प्राजक्ता खाडे,**

**नमस्कार,**

गेल्या काही वर्षांपासून नियमित वर्गाना संगणक हा विषय शिकवत आहे. पण संगणक हा विषय अभिरुची म्हणून इ.८ वी व ९ वी च्या विद्यार्थ्यांना शिकवायचा आहे असे जेव्हा कळले तेव्हा मला ते एक आव्हान वाटले. अभिरुची योजनेची अधिक माहिती घेतल्यावर असे लक्षात आले की यात संगणक विषयात असणाऱ्या विविध आविष्कारांचे दर्शन आधी विद्यार्थ्यांना घडवून आणणे गरजेचे होते. त्यामुळे आता वेगवेगळे विषय समजून घेऊन, त्यातील नवनवीन घडामोडी अभ्यासता येतील याचा आनंद वाटला. विभागात सतत आपण कोणत्या न कोणत्या विषयाचा अभ्यास करत राहिल्यामुळे त्याचाही फायदा मला झाला. सध्या ज्या तंत्रज्ञानाचा वेगाने वापर होत आहे असे Artificial Intelligence हा विषय निवडूया असे सहअध्यापकांशी चर्चा करुन ठरवले गेले. पण हा विषय सोपा करुन विद्यार्थ्यांसमोर मांडणे महत्त्वाचे असल्याने त्यादृष्टीने अभ्यास केला व आत्ता उपयुक्त होतील अशा activities काढल्या. त्याला विद्यार्थ्यांनी खूप चांगला प्रतिसाद दिला. तसेच विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा म्हणून विविध events ही घेण्यात आले. काही उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी सामजिक समस्यांवर तंत्रज्ञानाच्या मदतीने उत्तरे शोधण्याचाही चांगला प्रयत्न केला. याबरोबरीने प्रतिसाद न देणाऱ्या विद्यार्थ्यांशीही संवाद वाढवला. त्यात काही विद्यार्थ्यांमधील वाढलेली कौशल्ये लक्षात आली तर काहींचा अधिकाधिक activity पूर्ण करून वाढणारा सहभागही जाणवला. दर शनिवारी अभिरुचीच्या तासाला असे काय वेगळे घेतां येईल म्हणजे विद्यार्थ्यांचा सहभाग वाढेल. याची नेहमीच आम्हा शिक्षकांना उत्सुकता असायची. यानिमित्ताने विद्यार्थ्यांबरोबर आम्हीही नव-नविन विषय शिकण्याची छान संधी मिळाली असे मला वाटते. धन्यवाद!

# मुक्तिसोपान संगीत विभाग



**संगीत ज्ञानं परं ब्रह्म । तदारभ्य न संत्यजेत् ।** या उक्तीनुसार २००५ सालच्या गुरुपौर्णिमेपासून मुक्तिसोपान संगीत विभाग कार्यरत आहे. दैनंदिन जीवनातील संगीताचे अनन्यसाधारण महत्त्व तसेच संगीताचा व्यक्तिमत्त्वावर होणारा सकारात्मक परिणाम लक्षात घेऊन शालेय वयातच विद्यार्थ्यांमध्ये संगीताची गोडी निर्माण करणे, विद्यार्थ्यांना संगीताचे महत्त्व समजावणे, संगीताच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व विकसित करणे अशा विविध उद्देशांनी विभागाचे कामकाज सुरू आहे. यंदाच्या शैक्षणिक वर्षातले हे काही ऑनलाईनं तर काही ऑफलाईन उपक्रम...

## ✻ अष्टविनायक महती

गणपती ही कलेची – विद्येची देवता. गणेशोत्सवानिमित्त कलेची आराधना करताना अष्टविनायक महती व माहिती सांगणारा गीतांचा कार्यक्रम विभागातर्फे सादर करण्यात आला. अध्यापकांच्या कलागुणांना वाव देणे, स्टुडिओ वापराचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण सदस्यांना देणे, एक वेगळा अभ्यासक्रम निवडणे, सर्व प्रकारची निवेदने वाचिक अभिव्यक्ती गटातील मुलींकडून करून घेत त्यांना अनुभव देणे अशा विविध उद्देशांनी हा प्रकल्प राबविण्यात आला. गणेश चतुर्थी (१०सप्टेंबर) पासून ८ गीते, १ आरती, १ श्लोक असे १० व्हिडिओ युट्यूबच्या माध्यमातून सादर करण्यात आले. हा संपूर्ण कार्यक्रम गणेशोत्सवात १७ सप्टेंबर रोजी लाईव्ह सादर करण्यात आला. सर्व गीतांना स्वरेशा पोरे (संवादिनी) व विष्णुपंत कुलकर्णी (तबला) यांनी वाद्यसंगत केली. सर्व गीतांचे गायन मुक्ति सोपान विभागातील अध्यापकांनी केले. मयुरीताई जेजुरीकर व मानसीताई फाटक यांनी निवेदनाची संहिता लिहीत उत्तम निवेदन केले. ध्वनिमुद्रण व ध्वनिमिश्रण आपल्या स्टुडिओत केदारदादा अभ्यंकर यांनी केले.

## ✻ वाद्य पूजन

शब्दांच्या पलिकडला अनुभव देणारे संगीत म्हणजे वाद्यसंगीत. वाद्यांनी संगीत क्षेत्र अधिकच समृद्ध केले आहे. आपल्या संस्कृतीत खंडेनवमीच्या दिवशी वाद्यपूजन करण्याची प्रथा आहेच. या खंडेनवमीच्या निमित्ताने दिनांक १४ ऑक्टोबर रोजी विभागात वाद्यपूजन संपन्न झाले. यावेळी विष्णुपंत कुलकर्णी यांनी सरस्वती देवीची आराधना करणारे विविध श्लोक, त्यांचे अर्थ सांगत पौरोहित्य केले व

विभागात वाद्यपूजन संपन्न झाले. स्नेहल कोकीळ यांनी हंसध्वनी रागात विहरती ब्रह्म नंदिनी ही रचना सादर करत कार्यक्रमाला रंगत आणली.

## ❊ दिवाळी पहाट

दिवाळीची मंगलमय प्रभात आनंदमय व्हावी, आप्तजनांच्या मेळाव्यात सांगीतिक मैफिल ऐकल्यानंतर एकत्रित दिवाळी फराळाचा आनंद लुटावा या उद्देशाने प्रतिवर्षी धनत्रयोदशीच्या दिवशी विद्यालयात या संगीत सभेचे आयोजन केले जाते. यंदाची ही १७ वी दिवाळी पहाट संगीत सभा दिनांक २ नोव्हेंबर २०२१ रोजी मनोहर वाढोकर सभागृहात संपन्न झाली. चिपळूणचे श्री.विशारद गुरव यांनी या स्वरमैफिलीत रंग भरले.

प्रथेप्रमाणे सुरुवातीला सरस्वतीपूजन, मातृभूमी पूजन झाले. यावेळी विद्यालयाची विद्यार्थिनी कु.शार्वी नलावडे हिने सरस्वती वंदना सादर केली. पुढे श्री.गुरव यांनी अहिर भैरव राग सादर केला. सुरुवातीला विलंबित एकतालातील हे रसिया व नंतर द्रुत तीनतालातील 'अलबेला सजन आयो रे' ही बंदिश सादर केली. उत्तरार्धात उपशास्त्रीय गायन सादर करत त्यांनी श्रोत्यांची वाहवा मिळवली.सर्वप्रथम पं. जितेंद्र अभिषेकी यांनी स्वरबद्ध केलेला संत निवृत्तीनाथांचा 'जेथूनी उद्गार प्रसवे ओंकार' हा अभंग सादर झाला. पुढे संत नामदेव लिखित कल्पनेची 'बाधा न हो कोणे काळी, आकल्प आयुष्य व्हावेत या कुळा,' संत चोखा मेळा लिखित 'सुखाचे जे सुख चंद्रभागेतटी' हे अभंग सादर करत वातावरण भक्तीरसाने भारून टाकले. पुढे मीरा मधुरा या नाटकातील 'आनंद सुधा बरसे,' 'कट्यार काळजात घुसली' मधील 'सुरत पिया की' ही पदे सादर करून श्रोत्यांच्या टाळ्या मिळविल्या. प्रेक्षकांच्या आग्रहावरून उतरले आकाश पक्षी हे गीत सादर केले. 'स्वामी कृपा कधी करणार' या भैरवी भजनाने कार्यक्रमाची सांगता झाली. श्री.मिलिंद लिंगायत (पखवाज), श्री. प्रथमेश देवधर (तबला), श्री.हर्षल काटदरे (संवादिनी), श्री.संकेत नवतर (टाळ), कु.सिद्धी कापशीकर (तानपुरा) यांनी वाद्यसंगत केली.

## ❊ गाणं कवितेचं

२७ फेब्रुवारी २०२२ या दिवशी मुक्ति सोपान संगीत विभागातर्फे मराठी राजभाषा दिनानिमित्त 'गाणं कवितेचं' बालभारती पुस्तकातील कवितांना चाल लावणे ही अनोखी स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांना मराठी भाषेची गोडी लागावी, मराठी कवितांचे सौंदर्य जाणून घेता यावे, चाल देताना संगीतातील सृजनशीलता वाढावी या नवनिर्मितीचा आनंद मिळावा असे बहुविध उद्देश या स्पर्धेमागे होते. २७ फेब्रुवारीला संध्याकाळी ५ वाजता विद्यालयाच्या स्पर्धेचा निकाल यु ट्यूब वाहिनीवर जाहीर करण्यात आला. ६ विविध गटात एकूण १०८ स्पर्धकांनी यात सहभाग नोंदवला. विभागातील ६ अध्यापकांनी एकेका गटाचे नेतृत्व केले.

सौ. वृषाली आपटे, सौ. मानसी फाटक, सौ. नादमयी कुलकर्णी, श्री. दुर्वांकुर कुलकर्णी या मान्यवर परीक्षकांनी स्पर्धेचे परीक्षण केले. एकूण २३ विजेत्यांनी स्वतः चाल देत गायलेली कवितांची

गाणी या संगीत सभेत सादर झाली. या स्पर्धेच्या निमित्ताने मराठीचे अध्यापक सहज शिकवू शकतील अशा छान सोप्या चालीतील पहिली ते दहावीच्या पाठ्यपुस्तकातील कवितांचे संकलन विभागाने केले आहे.

## ⁕ कार्यशाळा

ज्ञान प्रबोधिनी निगडी आणि आवर्तन गुरुकुल पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने विविध कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. सर्वच कार्यशाळांना भरभरून प्रतिसाद मिळाला. या कार्यशाळांच्या निमित्ताने विभागाचा कला क्षेत्रातील अनेक मान्यवरांशी संपर्क वाढला आहे. परिसरातील अनेक संगीतप्रेमी, विद्यार्थी कार्यशाळेसाठी आता येत आहेत. अध्यापकांचे दखील प्रशिक्षण होत आहे. एकत्रित काम केल्याने गटबांधणी होऊन विभागात उत्साहाचे वातावरण जाणवत आहे.

### तबला कार्यशाळा

रविवार दिनांक १३ मार्च २०२२ रोजी सकाळी १० ते संध्याकाळी ६ या वेळात तबला कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. बिगिनर्स गटाला श्री. गणेश तानवडे यांनी तर ॲडव्हान्स गटाला पं रामदास पळसुले यांनी मार्गदर्शन केले. बिगिनर्स गटात दर्शन कुलकर्णीने सरस्वती वंदना सादर केली व संपूर्ण वेळ लहरा साथ केली. ॲडव्हान्स गटात स्वरेशा पोरे यांनी नटभैरव रागात नटराज वंदना गायली व पूर्ण वेळ लहरा साथ केली. कार्यशाळेत ठेका कसा तयार होतो, ताल आणि ठेक्यातला फरक, एका लयीत वाजविण्यासाठी मेट्रोनमची कशी गरज आहे, रियाज कसा करावा, शाईवरची अक्षरे, तबल्याच्या रचनांचे प्रकार, विविध तिहाई आदी गोष्टींवर या मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शेवटचा एक तास दोन्ही गट एकत्र करून पं रामदास पळसुले यांनी हातावर मात्रा मोजत तीन तालात गिनती शिकवली. संपूर्ण दिवस मनोहर इमारतीत तबल्याचे बोल घुमत होते. कार्यशाळा खूप आवडल्याचे अनेक सहभागींनी सांगितले.

### संवादिनी कार्यशाळा

दिनांक १७ एप्रिल २०२२ रोजी सकाळी १० ते संध्याकाळी ५ या वेळात संवादिनी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. प्रसिद्ध कलाकार श्री. उमेश पुरोहित यांनी या कार्यशाळेत मार्गदर्शन केले. प्रत्यक्ष वादन करण्याआधी संवादिनीची माहिती सांगून, वादनासाठी बोटे कशी वापरायची, स्वर वाजवताना क्रम कसा असावा आदी मुद्द्यांबाबत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. नंतर लयकारी, आलाप तयार करण्याची पद्धत, झाला, जोड झाला, ताना, पटी असे अनेक विषय हाताळत कार्यशाळा रंगतदार केली. उपस्थित सगळे स्वरवर्षावात चिंब भिजले होते.

### कथक नृत्यासाठी आवश्यक ताल कार्यशाळा

दिनांक १७ एप्रिल रोजी दुपारी ३ ते ७ या वेळात पं. रामदास पळसुले यांनी कथक नृत्यासाठी आवश्यक ताल अशी कार्यशाळा घेतली. नृत्य करताना तालाचे गणित खूप सांभाळावे लागते. विविध

तालात पढत करत पंडितजींनी उपस्थित विद्यार्थिनींकडून सराव करून घेतला. तबल्याच्या तालावर घुंगराचा नाद मनोहर सभागृहात घुमत होता.

## ❊ वेणूसभा

कै. वा. ना अभ्यंकर तथा भाऊंच्या जयंतीचे औचित्य साधून दि. १ मे २०२२ रोजी विद्यालयात पं. रोणू मुजुमदार यांची बासरीची सायंकालीन रागांची एक नितांत सुंदर मैफिल झाली. त्यांना तेवढीच बहारदार अशी तबल्याची साथ पं. रामदास पळसुले यांनी केली.

संध्याकाळच्या त्या करकरीत कातर वेळेला पं. रोणूजींनी त्या वेळेला साजेसा मारवा राग वाजवायला सुरुवात केली आणि काही स्वरात त्यांनी मैफिलीला आपलेसे केले. त्यांनी ज्या धृपद पद्धतीने आलाप, जोड आणि झाला वाजवला, त्याला तोड नाही. त्यानंतर विलंबित लय दुर्मिळ अशा धमार या चौदा मात्रेच्या तालात सुरवात करून सर्वांना आश्चर्यचकित केले. त्यांना पं. रामदासजींनी अतिशय संयत आणि अभ्यासपूर्ण असा धमारचा ठेका धरला होता. त्यात लयीचे निरनिराळे गणिती आकृतिबंध मांडत समेवर अचूक येणे हे थक्क करणारे होते. त्यानंतर द्रुत बंदिश त्रितालात वाजवून येथे पण अति द्रुतलयीची पराकाष्ठा केली.

त्यानंतर केदार रागाची एक सुरेख अशी धून वाजवली. पंडितजींनी सांगितलेली एक माहिती म्हणजे ‘केदार’ हा राग डिप्रेशन वर खूप छान काम करतो आणि हा राग ऐकल्याने डिप्रेशन कमी व्हायला मदत होते. त्यानंतर पंडितजींनी जोग-बहार हा एक अनवट राग फार ताकदीने सादर केला. त्यानंतर शाम कल्याण रागातली एक द्रुत एकतालातली सूंदर चीज वाजवून मग पहाडी रागाच्या एका तराण्याने सांगता केली. हा तराणा पण प्रथमच चक्क द्रुत रूपक या सात मात्रेच्या तालात होता. खूप दिवसांनी ऐकलेला धमार हा ताल आणि द्रुत रूपक ही या जुगलबंदीची वेगळी वैशिष्ट्ये होती.

✸✸✸

## ❊ अभिनंदन ❊

### ‘अन् पारिजातक हसला’ ला ‘हरित पुस्तक पुरस्कार’

**कोरोनाच्या शाळा बंदीच्या काळातही विद्यार्थ्यांना निसर्ग संवर्धनाची प्रेरणा आणि अनुभवशील शिक्षण देणाऱ्या, कृतीला प्रवृत्त करणाऱ्या ’अन् पारिजातक हसला’ या श्री.शिवराज पिंपुडे लिखित पुस्तकास ’अलाईव्ह’ या संस्थेतर्फे ज्येष्ठ लेखक, दुर्ग व वनस्पती तज्ज्ञ प्राध्यापक प्र. के. घाणेकर यांच्या हस्ते ‘हरित पुस्तक पुरस्काराने’ गौरवण्यात आले. वसंत पंचमीच्या दिवशी मनोहर सभागृहात सन्म नचिन्ह, प्रमाणपत्र, पारिजातकाचे रोप आणि नेस्टबॉक्स देऊन श्री. शिवराज पिंपुडे यांना सन्मानित करण्यात आले. ’अलाईव्ह’ संस्थेचे पदाधिकारी श्री. उमेश वाघेला व श्री. चैतन्य राजर्षी यावेळी उपस्थित होते.**

# अटल धडपडालय



## ⁕ अटल मॅरेथॉन २०२१

अटल मॅरेथॉन २०२० मध्ये पहिल्या २०० प्रकल्पांमध्ये मल्हार ओझर्डे, सुबोध पिंगळे आणि अर्णव देवळेकर या विद्यार्थ्यांनी स्थान पटकावले. या विद्यार्थ्यांचे पुढच्या पातळीवरचे प्रशिक्षण दूरस्थ पद्धतीने झाले. Adobe India Pvt. Ltd. या कंपनीतर्फे हे प्रशिक्षण घेण्यात आले. या प्रशिक्षण सत्रात Adobe India Pvt. Ltd. चे श्री. दिनेश भाटी यांनी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक म्हणून काम केले. अटल मॅरेथॉन २०२१ मध्ये शिवम तापकीर, पियुष कुलकर्णी आणि तन्मय नाईक या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

## ⁕ नेक्स्ट्-जेन इनोव्हेटर्स लिग

ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय आणि एरेव्हॉन ओर्बिट शिफ्ट इनोव्हेशन्स प्रा. लि. यांच्या एकत्रित प्रयत्नातून विद्यार्थ्यांसाठी नेक्स्ट्-जेन इनोव्हेटर्स लिग ही योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत इयत्ता ८वीच्या विद्यार्थ्यांना creative ideationच्या तंत्राचे प्रशिक्षण देण्यात आले. दर आठवड्यात दोन सत्र असे नियोजन करण्यात आले होते. ह्या योजनेत माध्यमिक मराठी विभाग, माध्यमिक इंग्रजी विभाग आणि गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. पुढील शैक्षणिक वर्षात हे विद्यार्थी या तंत्राचा उपयोग करून प्रत्यक्ष एक प्रश्न घेऊन त्यावर उत्तर शोधणे असा प्रकल्प करणार आहेत. यासाठी आवश्यक अध्यापक प्रशिक्षण दोन वेळा पुणे येथे झाले. या प्रशिक्षण सत्रात विभागातील सदस्यांनी सहभाग घेतला.

## ⁕ एटीएल स्पेस चॅलेंज

अटल इनोव्हेशन मिशन व इस्त्रो यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या ATL Space Challenge २०२१ या स्पर्धेत आपल्या विद्यालयातील अर्णव हिरेमठ, अर्णव देवळेकर व अथर्व घोलप या विद्यार्थ्यांच्या प्रकल्पाची देशभरातील Top 75 Innovations मध्ये निवड झाली. अंतराळात दिर्घकाळ शून्य गुरुत्वाकर्षणात राहिल्याने अंतराळवीरांचे स्नायू व पर्यायाने हाडे ठिसूळ होण्याचा धोका असतो.

यावर उपाय म्हणून या गटाने हवेच्या दाबाचा उपयोग करून सतत स्नायूंवर दाब देणाऱ्या एका जॅकेटची कल्पना लहान चलप्रतिकृतीच्या माध्यमातून मांडली होती. या विद्यार्थ्यांनी दिवाळीच्या सुट्टीत या प्रकल्पाचे काम स्वतःच ऑनलाईन व ऑफलाईन भेटून पूर्ण केले.

## उन्हाळी शिबिर

गुरुकुलच्या इयत्ता पाचवी आणि सहावीच्या विद्यार्थ्यांसाठी तीन दिवसीय बांबू- वस्तू निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. इयत्ता पाचवीतील विद्यार्थ्यांनी बांबूपासून लहान मोट-ार गाडी बनवण्याचे प्रशिक्षण घेतले. इयत्ता सहावीतील विद्यार्थ्यांनी बांबूपासून छायाचित्राची चौकट आणि लहान कुंडी तयार केली.

## आझादी का अमृत महोत्सव कार्यक्रम

'अटल इनोव्हेशन मिशन'तर्फे देशात नवोन्मेष संबंधित क्षेत्रात काम करण्याऱ्या हितसंबंधीयांचे (स्टेकहोल्डर्स), निमंत्रित प्रतिनिधी अटल इनोव्हेशन मिशन व नीती आयोगातील सदस्य यांच्या एकत्र भेटीसाठी व पुढील नवीन योजना जाहीर करण्यासाठी आझादी का अमृत महोत्सव ह्या कार्यक्रमाचे आयोजन दिल्ली येथे करण्यात आले होते. ह्या कार्यक्रमाला RToC म्हणून कल्पेश कोठाळे यांनी सहभाग घेतला. जवळपास २५ ते ३० आरंभिकांनी त्यांचे उत्पादनातील प्रदर्शन मांडले होते. त्यात दिल्लीतील काही अटल धडपड प्रयोगशाळांतील प्रकल्पही मांडले होते. शेती-उत्पादन (उत्पादन प्रक्रिया उद्योग), शेती-तंत्रज्ञान (शेतीविषयक विविध निकष तपासणी) ते कृत्रिम अवयव, ड्रोन-तंत्रज्ञान, कृत्रिम पेशीची वाढ होण्यासाठी तयार केलेले छोटे साचे, घरून काम करण्यासाठी वातानुकुलीत खोली असे विविधांगी विषय प्रदर्शनात मांडले होते.

✷✷✷

### ✻ अभिनंदन ✻

- **राष्ट्रीय बाल वैज्ञानिक स्पर्धा**
  **एका समस्येवर संशोधन करून त्यावर शास्त्रीय पद्धतीने उपाययोजना शोधणे अशा स्वरूपाची ही स्पर्धा असते. या स्पर्धेत चि. प्रद्युम्न शिंदे या सातवी मधील विद्यार्थ्याच्या प्रकल्पाची निवड राज्यस्तरावरील छाननीसाठी झाली. 'बांबूपासून गणिती शैक्षणिक साधनांची निर्मिती करणे' असे या प्रकल्पाचे स्वरूप होते. प्रद्युम्नने यासाठी बांबूपासून नवीन शैक्षणिक साहित्य निर्माण केले.**
- **अटल मॅरेनथॉनमध्ये ७२०० प्रकल्पांपैकी देशभरातून ३०० तर राज्यातून पहिल्या १० प्रकल्पांची निवड केली. त्यात कु. मल्हार ओझर्डे याचा 'E- कृषी संयोजक' हा प्रकल्प निवडला.**

# ग्रंथालय



भारतीय सौर दिनांक ६ श्रावण शके १९४३ ( २८ जुलै २०२१) रोजी कै. वि. अ. जोशी यांच्या स्मृतीदिनानिमित्त ग्रंथालयात कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाच्यावेळी कै. वि. अ. जोशी यांचे चिरंजीव श्री प्रकाश जोशी व ज्येष्ठ साहित्यिक तेच कै. भाऊंचे मित्र श्री. न. म. जोशी, श्री. रमेश भंडारी हेदेखील या स्मरणदिनाच्या कार्यक्रमास ग्रंथालयात उपस्थित होते. श्री प्रकाश जोशी व न. म. जोशी यांनी कै. भाऊंच्या आठवणी व त्यांच्या कार्याविषयी सांगितले. कै. वि. अ. जोशी, कै. भाऊ व श्री न. म. जोशी यांच्या एकत्रित आठवणी सांगितल्या.

भारतीय सौर दिनांक २० अश्विन १९४३, म्हणजेच १२ ऑक्टोबर २०२१ ला ग्रंथालयात सरस्वती पूजन व ग्रंथदर्शनाचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख अभ्यागत म्हणून श्री अजित जगताप उपस्थित होते. त्यांनी ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांना 'पर्यावरण व आरोग्य' या विषयी माहिती दिली. आपण वापरत असलेल्या रंगांचा आपल्या आहारात पेहेरावात होणारा परिणाम तसेच हिंदूधर्मातील प्रत्येक देवतेविषयी व सणांविषयी माहिती सांगितली. ऋतूंनुसार त्या त्या काळात आपण घेत असलेला आहार व त्याचा आरोग्याशी कसा संबंध येतो हे अगदी सोप्या भाषेत मुलांना समजावून सांगितले.

भारतीय सौर दिनांक १७ कार्तिक १९४३, (८ नोव्हेंबर २०२१ ते ३१ डिसेंबर २०२१) पर्यंत ग्रंथालयात दिवाळी अंकाचे प्रदर्शन मांडण्यात आले. दिवाळी अंकात किल्ल्यांची माहिती असलेले व इतर ललित अंकांचे प्रदर्शन मांडण्यात आले होते. या प्रदर्शनाचे अनेक विद्यार्थ्यांनी व वाचकांनी लाभ घेतला.

* * *

**❊ अभिनंदन ❊**

**इन्स्पायर अवॉर्डच्या राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत इ. १० वी क मधील श्रीरंग वाघ या विद्यार्थ्याची निवड झाली. त्याने गाई म्हशीचा गोठा स्वच्छ करण्यासाठी उपयोगी पडेल असे उपकरण तयार केले होते.**

# संशोधन विभाग

# जैवतंत्रज्ञान विभाग



## जैवतंत्रज्ञान विभागाचे एकूण ३ भागांमध्ये काम चालते.

१) विद्यार्थी प्रशिक्षण

२) संशोधन

३) विस्तार

हे वर्ष जैवतंत्रज्ञान विभागाचे द्विदशकपूर्ती वर्ष आहे. या निमित्ताने विभागाच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात आले.

### ❊ विद्यार्थी प्रशिक्षण:

जैवतंत्रज्ञान विभागातील सुरु असणाऱ्या वनस्पती ऊती संवर्धनाची प्रक्रिया तसेच यासाठी वापरण्यात येणाऱ्या विविध उपकरणांची माहिती शालेय स्तरावर विद्यार्थ्यांना व्हावी या उद्देशाने शाळा प्रत्यक्ष सुरु झाल्यानंतर जैवतंत्रशिक्षणाचे विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण घेतले.

### तंत्रशिक्षण विद्यार्थी प्रशिक्षण:

माध्यमिक मराठी विभागाच्या तंत्राशिक्षाणातर्गत जैवतंत्रज्ञान विभागातील तासिका ह्या तुकडीनुसार घेण्यात आल्या. प्रत्येक तासाला तशी पूर्वतयारी करण्यात आली. तुकड्या अ, ब, क तसेच इंग्रजी माध्यमाच्या सर्व विद्यार्थ्यांनी आठवड्यातून दोनदा विभागात येऊन प्रत्यक्ष वनस्पती ऊती संवर्धनाचे प्रशिक्षण घेऊन उपकरणांची माहिती घेऊन अनुभव घेतला.

यामध्ये मुख्यत्वे utoclaving, उपकरणांची ओळख, bottle wash, laminar activity, initiation, Micropropagation यासर्व विषयांवर माहिती देऊन विद्यार्थी प्रत्यक्ष सहभागी झाले.

### गुरुकुल छंद वर्ग

१८ ते २० एप्रिल असे तीन दिवस गुरुकुल छंदवर्ग शिबिरांतर्गत ७ वीचे ३५ विद्यार्थी ९-११ या आणि ८ वी चे ३५ विद्यार्थी ११-१ या वेळेत प्रशिक्षणात सहभागी झाले होते. यात सर्व दृष्टीकोनातून जैवतंत्रज्ञान व ऊती संवर्धन म्हणजे काय, याचा फायदा, ऊती संवर्धनाची पूर्ण प्रक्रिया त्यातील टप्पे,

संकल्पना याची माहिती देण्यात आली. हार्वेस्टीग, हार्डनिंग, मायक्रोग्रींन्स, हायड्रोपोनिक्स या सर्व विषयाची माहिती देऊन प्रात्यक्षिक दाखवले, कृतीमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी करून घेतले. गटानुसार लॅमिनारवर मल्टीप्लिकेशन प्रक्रिया, प्लांट कटिंग व तंत्रज्ञान शिकवण्यात आले.

**महाविद्यालयीन विद्यार्थी कृतीशील शिक्षण :**

शालेय स्तराप्रमाणे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना ऊतीसंवर्धनाचा प्रत्यक्ष अनुभव घेता यावा या दृष्टीने जैवतंत्रज्ञान विभागामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना कृतीशील शिक्षण दिले.

आदिती चौगले-Callus Induction from Ornamental Plants हा प्रकल्प कृतीशील शिक्षणा मध्ये पूर्ण केला. तिला विभागातर्फे प्रमाणपत्रक दिले.

अमोघ देशपांडे -मंजिष्ठ या औषधी वनस्पतीचे उतीसंवर्धन कार्य

निखिल निघोत - स्टिव्हिया या औषधी वनस्पतीचे ऊती संवर्धन

अनुराग लासुरे -रोटाला या पांणवनस्पतीचे ऊतीसंवर्धन प्रकल्प व्यवस्थित काम करून पूर्ण केला आहे.

सृष्टी सापटणेकर वगीतांजली शिंदे या २ विद्यार्थिनिनी ऊतीसंवर्धन अंतर्गत LF मध्ये शोभेच्या वनस्पतींचे प्रात्यक्षिक आणि स्वतः हाताळण्याचे प्रशिक्षण पूर्ण केले.

या सर्वामधून विद्यार्थ्यांना जैवतंत्रज्ञान हा विषय अधिक सोप्या पद्धतीने आणि प्रत्यक्ष कृतीतून शिकविताना नियोजनात्मक दृष्टीने आणि नेमकेपणाने काम करण्याची संधी मिळाली. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना कृतीशील शिक्षण देताना अनेक शोध निबंधांचे वाचन करण्यास मिळाले तसेच तीन वनस्पतींचे ऊती संवर्धन टप्पे आणि सूत्रे समजली, एकूणच छान अनुभव मिळाला.

## * संशोधन कार्य:

जैवतंत्रज्ञान विभागामध्ये संशोधन विभाग कार्यरत असून समाजास उपयुक्त असे प्रयोगशाळेत वनस्पती ऊती संवार्धनाद्वारे संशोधन करणे हा मुख्य उद्देश आहे. शाश्वत विकासासाठी बांबू लागवड या दृष्टीने बांबूच्या विविध प्रजातींचे ऊती संवर्धनाचे प्रयोग विभागात केले जाते. तसेच औषधी वनस्पती आणि शोभेच्या वनस्पतींचे ऊती संवर्धन संशोधन प्रयोगशाळेत केले जाते.

**मेस बांबू प्रकल्प:**

जूनमध्ये प्रदेशनिष्ठ 'मेस' या बांबू प्रजातीचा ऊती संवर्धन प्रकल्प महाराष्ट्र बांबू प्रमोशन फाऊंडेशन, नवी मुंबई (MBPF) यांच्या अर्थ साहाय्यातून सुरु झाला. मेस बांबूचे दुसऱ्या माध्यमावर हस्तांतरणाचे कार्य प्रयोगशाळेत सुरु आहे. जानेवारी महिन्यात जयतपाड या ठिकाणाहून मेस या बांबू प्रजातीचे डोळे आणून, ऊती संवर्धनाअंतर्गत संशोधनात्मक आखणी तसेच रचनात्मक, पद्धतशीर मांडणी करून ते निगडी प्रयोगशाळेत लावण्यात आले. यासाठी संख्याशास्त्रतज्ज्ञ सुप्रिया सोमण या मार्गदर्शन करीत आहेत.

दिनांक १८ ऑक्टोबर,२०२१ रोजी महाराष्ट्र बांबू प्रमोशन फौंऊडेशन या संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा.श्री.व्ही. गिरीराज आणि प्रशासकीय अधिकारी श्री.दिनेश मळेकर यांनी ऊतीसंवर्धन प्रयोगशाळेस भेट देऊन मेस बांबूचे प्रयोगशाळेत सुरु असलेल्या कामाची पाहणी त्यांनी केली. त्यावेळेस मेस बांबूचे प्रयोगशाळेत झालेल्या कामाचे सादरीकरण केले.

**नव प्रकल्प प्रस्ताव लेखन:**

दिनांक – ०१ एप्रिल २०२२ पासून प्रबोध वेणू प्रकल्प सुरू झाला. प्रबोध या संस्थेने बांबूच्या ब्लॅक बांबू, कटांग आणि हुडा या प्रजातींच्या ऊती संवर्धन संशोधनासाठी मान्यता देऊन त्यासाठी लागणारी आर्थिक तरतूद केली आहे.

प्रकल्पातील बांबु मातृवृक्ष तयार करणे हा पहिला टप्पा आहे. यासाठी ब्लॅक बांबूच्या मातृवृक्ष निवडीसाठी नांदेड सिटी सिंहगड रोड पुणे प्रकल्पाला विभाग प्रमुख संगीता ताई आणि सागर तुपे यांनी भेट दिली. तेथील उद्यानविद्या (हार्टीकल्चर) विभाग प्रमुख तेजस्विनी कुलकर्णी यांच्यासोबत चर्चा झाली.

जानेवारी महिन्यात प्रिन्स बर्नहार्ड नेचर फंड या संस्थेला औषधी, दुर्मिळ होत चाललेल्या वनस्पतींना जतन आणि संवर्धन करण्याच्या दृष्टीने एक प्रकल्प प्रस्ताव जैवतंत्रज्ञान विभागाने पाठविला आहे, त्यावरील सखोल अभ्यास विभाग सदस्य अनिशाताई आणि सागरिका ताई यांनी केला.

या सर्वामधून संशोधन करताना खूप नियोजनात्मक दृष्टीने, सखोल अभ्यास करण्याची आणि नेमकेपणाने काम करण्याची संधी मिळाली. अनेक शोध निबंधांचे वाचन करण्यास मिळाले. प्रत्येक बांबू प्रजातीसाठीचे ऊती संवर्धन टप्पे आणि सूत्रे खूप वेगळी आहेत त्यांना लागणारे माध्यम वेगळे आहे हे यातून समजले, एकूणच छान अनुभव मिळाला.

## ❋ विस्तार कार्य:

लॅब टू लॅण्ड संकल्पने अंतर्गत प्रयोगशाळेतील संशोधन आणि त्यातून तयार झालेली बांबू तसेच औषधी वनस्पतींची रोपे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे. यातून ग्रामीण भागाचा विकास होण्यास मदत होईल हा विस्तार कार्याचा मुख्य उद्देश आहे. फक्त शेतकऱ्यांनी बांबू किवा औषधी वनस्पती लागवड करून न थांबता ते बाजारात योग्य पद्धतीने विकता यावे यासाठी शेतकरी, ग्रामीण महिला बचत गट, नागरीवस्ती महिला बचत गट यांना योग्य प्रशिक्षण देऊन रोजगार निर्मिती तसेच कौशल्य विकसित करणे हाही एक विस्तार कार्यामागील उद्देश आहे.

दिनांक ०७ जुलै२०२१ रोजी आयोजित केलेल्या अभ्यास सहलीमध्ये विभागाचे सर्व सदस्य सहभागी झाले होते. या अंतर्गत श्री.किसान कचरे यांच्या २५ एकर क्षेत्रात केलेल्या बांबू लागवड शेताला भेट दिली. हुडा, मेस, मानवेल या तीन बांबूची बेटे पाहायला मिळाली. तसेच बांबू शेती ही कमी खर्चामध्ये कशी फायदेशीर आहे. हे समजले.

## बांबू विषयक विस्तार कार्य

दिनांक १३ ऑगस्ट २०२१ यादिवशी विभागातील सदस्यांनी जयतपाड, तालुका-भोर येथील शेतकऱ्यांना मेस या बांबू स्थानप्रविष्ट प्रजातीतील 'परिपक्व बांबू ओळख' याविषयी मार्गदर्शन तसेच कलर कोडींगचे प्रात्यक्षिक दाखवून प्रशिक्षण दिले.

दिनांक १८ ऑगस्ट २०२१ रोजी विस्तार प्रकल्पामध्ये निवडलेल्या विभागांपैकी पुरंदर ग्राम गौरव प्रतिष्ठान, खळद ता.पुरंदर या संस्थेच्या माननीय कार्यकारी विश्वस्त डॉ. सोनाली शिंदे ताई, त्यांचे सहकारी प्रशांत बोरवाके सर व योगेश मगर सर यांच्यासोबत पुरंदर तालुक्यातील बांबू लागवड व उद्योग निर्मिती या विषयी बैठक झाली. या दिवशी ग्राम गौरव प्रतिष्ठानने चालू केलेल्या चांबळी येथील कडजाई देवराईला भेट दिली व त्या ठिकाणी असणाऱ्या भौगोलिक बाबींचा व औषधी वनस्पतीचा अभ्यास केला. या सर्व ठिकाणी दिनांक २५ऑगस्ट २०२१ रोजी विस्तार कामाची सुरुवात बांबू जाती ओळख व बांबू परिपक्व ओळख या प्रशिक्षण व प्रात्यक्षिकाने झाली. या प्रशिक्षणामध्ये ग्राम गौरव प्रतिष्ठानच्या कार्यकारी विश्वस्त डॉ.सोनाली शिंदे ताई त्यांचे सहकारी प्रशांत बोरवाके सर, योगेश मगर सर, आणि पंचक्रोशीतील १० शेतकरी यांनी सहभाग घेतला होता. त्यानंतर दिनांक :१८ सप्टेंबर २०२१ रोजी बांबु दिनाच्या निमित्ताने कडजाई देवराई, चांबळी (ता.पुरंदर) येथे बांबूच्या बल्कोवा, माणगा, मानवेल, टुल्डा व ब्राडासी पाच बांबूच्या प्रजातीची लागवड करून पुरंदर तालुक्यातील बांबू लागवडीला शुभारंभ केला. या कार्यक्रमाला ग्राम गौरव प्रतिष्ठानच्या कार्यकारी विश्वस्त डॉ.सोनाली शिंदे ताई, प्रशांत बोरवाके सर, योगेश मगर सर, रतीलाल जैवतंत्रज्ञान विभाग प्रमुख संगीता ताई, नितीन इंगळे, स्वप्नील शेंडकर, कृषी सहाय्यक कैलास शेंडकर उपस्थित होते.

## वाजेघर गांडुळ खत प्रशिक्षण

दिनांक: १९ ऑगस्ट २०२१ तसेच २० जानेवारी २०२२ रोजी वेल्हे येथे स्त्री शक्ती प्रबोधन केंद्र, वेल्हे व रतिलाल भगवानदास जैवतंत्रज्ञान विभाग ज्ञान प्रबोधिनी निगडी यांच्या संयुक्त विद्यमाने वाजेघर ता.वेल्हे येथे गांडूळ खत निर्मिती प्रशिक्षण व प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले होते. प्रशिक्षणामध्ये गांडूळ खत निर्मिती माहिती व प्रात्यक्षिक करून दाखवले. प्रशिक्षणामध्ये १२ शेतकरी आणि १५ महिला सहभागी झाल्या होत्या.

प्रशिक्षणामध्ये गांडूळ खत निर्मितीची शेड उभारणीपासून ते खत विक्रीपर्यंतची सर्व माहिती दिली.

## नागरी वस्ती गट प्रशिक्षण

नागरी वस्ती गटाच्या प्रमुख हर्षाताई यांच्या माध्यमातून नागरी वस्ती गटातील महिलांच्या असलेल्या गरजा त्यांना प्रशिक्षण कसे देता येईल त्या काय शिकू शकतील याबाबतीत जैवतंत्रज्ञान सदस्य ओमकार अभ्यंकर यांनी मार्गदर्शन घेतले. त्यांच्या मदतीच्या आधारे महिला प्रशिक्षणाचे नियोजन केले.

दिनांक १५फेब्रुवारी २०२२ रोजी  या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये महिलांनी विविध प्रकारच्या चटया विणणे हे कौशल्य आत्मसात केले. या आत्मसात केलेल्या कौशल्यापासून दिवे, पाण्याच्या बॅगा, पर्स, आकाश कंदील, पेन स्टँड अशा विविध आकर्षक वस्तू बनवण्याचा प्रयोग अतिशय यशस्वी झाला.

दिनांक १७ फेब्रुवारी २०२२ ते १९ फेब्रुवारी २०२२ या तीन दिवसांमध्ये नागरी वस्ती महिलांनी प्रशिक्षणातून बनवलेल्या विविध बांबू उत्पादनांचे प्रदर्शन झाले. दिनांक १९ फेब्रुवारी २०२२ रोजी नागरी वस्ती अभ्यास गटातील ज्या महिला बांबू उत्पादन व उद्योजकता विकास कार्यक्रमातील सत्रात सहभागी झाल्या होत्या त्यांचा प्रमाणपत्र वितरण सोहळा पार पडला या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.तैताली (वनस्पती शास्त्रज्ञ, जैवविविधता संवर्धन आणि पर्यायी शेती प्रणालीचे तज्ञ), सुभाषराव देशपांडे (कार्यवाह, ज्ञानप्रबोधिनी), लिमये काका (कार्यवाह, मातृमंदिर विश्वस्त संस्था) तसेच संगीता ताई (जैवतंत्रज्ञान विभाग प्रमुख) उपस्थित होते.

याचाच पुढील टप्पा म्हणजे महाराष्ट्र बांबू प्रमोशन फौंडेशन आणि जैवतंत्रज्ञान विभाग, निगडी केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २जून २०२२ आणि ३जून २०२२ रोजी बांबू हस्तकला कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

या विस्तार कार्यातून अधिकाधिक शेतकरी, महिला बचत गट, नागरी वस्ती महिला गट यांच्याशी संपर्क झाला. यातून ग्रामीण तसेच शहरी भागातील महिलांच्या पुढील रोजगार निर्मितीची गरज समजली, तसेच संवाद कौशल्य वाढले. शेतकऱ्यांच्या समस्या आणि त्यासाठीचे त्यांना आवश्यक असणारे मार्गदर्शन खूप महत्वाचे आहे हे समजले. ओसाड भागात बांबू लागवड करण्याची आवश्यकता किती आहे याचा अभ्यास तसेच पुणे भागातील असणारी जैव  विविधता क्षेत्र भेटीतून समजली.

✷✷✷

### ✻ गणित अभिरुची – विद्यार्थी मनोगत – कु. राधिका साबळे ✻

Hello

Our maths journey started with amazing lectures such as statistics, topology, probability, Pascal's triangle, share market, and many more. I enjoyed each and every session from the beginning. I came to know how we can play with minimum numbers in a very fascinating way. And this thought provoked me to study permutation and combination.

Maths is just hidden in our surroundings it just needs an explorer mind to find it.

I realised many of the topics i learned here, i wouldn't even had known. I am very thankful for all the teachers for sharing their precious knowledge to us and to make maths as my favourite subject.

Thank you!

# संवेद



## ＊ पालक कार्यशाळा – ऋजवू पालकतत्त्व –

विभागाच्या कामामध्ये पालक प्रशिक्षण व अध्यापक प्रशिक्षण हे अतिशय महत्त्वाचे आहे. मुलांसाठी काम करत असताना हे दोन्ही दुवे जर सकारात्मकतेने सोबत असतील तर मुलांच्या वाढ व विकासात नक्कीच उपयोग होणार आहे. रुजवू पालकतत्व ही कार्यशाळा online झाली, विद्यालयातील साधारण ४० पालक त्यासाठी सहभागी होते. मा. उमाताई बापट यांनी हे सत्र घेतले. विषय समजून घेणे, आपली कर्तव्य लक्षात घेणे या सारख्या अनेक विषयांची चर्चा झाली. कार्यशाळा चांगली झाली. त्या संदर्भात पुढे काम चालू आहे.

## ＊ वर्गमित्र व मुक्त संवाद –

वर्गमित्र हा उपक्रम निवडक पालकांनी मुलांसाठी घेण्याचा व मुक्त संवाद हा उपक्रम प्रत्येक वर्गात जाऊन त्या त्या वयाच्या मुलांच्या गरजांनुसार संवेद सदस्यांनी घेण्याचा आहे. विद्यार्थ्यांशी मैत्री वाढवणे, मनमोकळा संवाद, त्यांचे प्रश्न जाणून घेणे अशा activity या वर्गमित्र व मुक्त संवादच्या माध्यमातून होतात. सुरुवातीला अगदीच तीन पालक होते परंतु त्यामध्ये आता भर पडून साधारण १५ पालक यामध्ये स्वतःहून सहभागी झालेले आहेत. उपक्रमाचा उपयोग हळूहळू जाणवत आहे. खरेतर प्रत्येक वर्गासाठी ठरावीक वारंवारितेने असे सत्र होण्याचा खूप उपयोग होईल. मुलांना मोकळेपणाने बोलायला आणि अध्यापकांना वर्गाचा वेगळ्या दृष्टीने अंदाज यायला नक्कीच उपयोग होतो.

## ＊ समुपदेशन –

मुक्त संवाद उपक्रमामुळे जवळजवळ प्रत्येक वर्गात जाणे होतेच. त्यांच्या उद्‌भवणाऱ्या प्रश्नांनुसार व त्या त्या वयोगटासाठी आवश्यक ते विषय घेऊन बोलणे सुद्धा होत होते जसे मैत्री, उमलत्या वयाशी जुळवून घेताना, स्वयं अध्ययन यांसारखे अनेक विषय घेतले जातात. ज्यातून

समूहाचे समुपदेशन होते, तसेच अध्यापकांकडून, पालकांकडून सुचवलेले विद्यार्थी यांच्याशी वैयक्तिक बोलून त्यांच्या प्रश्नांसाठी मार्ग सुचवले जातात. यामध्ये मुलांमध्ये, अध्यापकांमध्ये व पालकांमध्ये सातत्य टिकून राहण्याचा नक्कीच उपयोग होईल. यामध्ये अभ्यासात मागे पडलेल्या विद्यार्थ्यांसाठी वेगळा विचार केला जातो, त्यांची कारणे समजून घेतली जातात, आवश्यकतेनुसार पालकांशी सविस्तर संवाद साधला जातो व मुलांना मुख्य प्रवाहामध्ये घेऊन येण्यासाठी या वैयक्तिक संवादाचा किंवा ठरवून या विद्यार्थ्यांना भेटण्याचा त्यांच्या सोबत चर्चा करण्याचा उपयोग होतो. इथून पुढे अध्यापकांनासुद्धा याबाबत प्रशिक्षण दिले जाणार आहे व लवकरात लवकर मुलांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न असणार आहे.

## ⁕ Aptitude testing -

दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी testing सुरु केले. JPIP मध्ये ज्या पद्धतीने हे चाचणी काम चालू आहे तसेच निगडीमध्ये सुद्धा चालू आहे. सध्या कुठल्याही प्रकारची जाहिरात न करता येणारा ओघ चांगला आहे असे वाटते. विद्यार्थ्यांना आवश्यक ती मदत करणे व पालकांना समाधान होईपर्यंत त्यांच्या शंकांना उत्तरे देणे हे यामध्ये अवश्य पाहिले जाते.

✸✸✸

## ⁕ संवादिनी अभिरुची ⁕

**पालक – सौ सुजाता केळकर**

**इयत्ता आठवी नववीच्या मुलांसाठी शाळेने पहिल्यांदाच अभिरुची हा विषय सुरू केला. त्यात वेगवेगळे विषय होते. माझी मुलगी अपूर्वा संवादिनी शिकत असल्यामुळे तिने संवादिनी हा विषय निवडला. इयत्ता आठवीचे वर्ष पूर्ण ऑनलाईन पद्धतीनेच गेले परंतु तासिका अतिशय उत्तम पद्धतीने झाल्या. काही वेळेला शिक्षकांनी मुलांच्या सोयीप्रमाणे संध्याकाळीही तास घेतले. ऑनलाइन पद्धतीने तासिका असल्यामुळे आम्हा पालकांनाही तासाला नेमके काय होते ते समजत होते. सुरुवातीला संवादिनीचे प्रकार, त्यातल्या काही थोर व्यक्तींची चरित्रे व त्यांची माहिती लिहायला सांगितली. भातखंडे व पलुस्कर यांची माहिती लिहायला सांगितली, वेगवेगळे अलंकार तयार करायला शिकविले, यमन राग शिकवला, त्यानंतर अपूर्वाने स्वतः नोटेशनवरून एक गाणे बसवले. तसेच एक प्रार्थना गीत शिकविले. अशारीतीने दोन्ही वर्ष संवादिनीचा अभ्यास उत्तम रीतीने झाला सर्व शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे अपूर्वाला या विषयाची आवड निर्माण झाली. आत्मविश्वास वाढला. ती स्वतः नोटेशन काढायचा प्रयत्न करायला लागली.**

**दोन वर्षे शिक्षकांनी उत्तम पद्धतीने मुलांना शिकवले. मुले कुठे कमी पडत आहेत हेही सांगितले. मुलांना योग्य ते मार्गदर्शन केल्याबद्दल तुम्हा सर्व शिक्षकांचे मनापासून आभार!**

# निगडी केंद्र



## ❋ हर्षदराय रतीलाल कारीआ कलाभवन उद्घाटन सोहळा

जागतिक योग दिनाचे औचित्य साधून सौर ज्येष्ठ ३१ शके १९४३ अर्थात २१ जून २०२१ रोजी सकाळी ९ वाजता हर्षदराय रतीलाल कारीआ इमारतीच्या चौथ्या मजल्याचा उद्घाटन व लोकार्पण सोहळा पार पडला. नेमबाजी, योग, रायफल शूटिंग व कबड्डी या क्रीडा प्रकारांसाठी सुसज्ज दालनांचे तसेच क्रीडा आयुर्वेद व फिजिओथेरपी कक्षाचे उद्घाटन मा. मोहनराव गुजराथी, श्री. दत्तात्रय निकम यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर प्रसंगाला साजेसे 'सुवर्ण क्षणांची घडो साधना' या पद्याने सुरुवात करत क्रीडाकुलने शानदार क्रीडा प्रात्यक्षिके सादर करून जीवनातील क्रीडेचे महत्वाचे स्थान स्पष्ट केले.

याच दिवशी संध्याकाळी ४.३० वाजता जागतिक संगीत दिनाचे औचित्य साधून तिसऱ्या मजल्यावरील कला दालनांचे उद्घाटन कला क्षेत्रातील आपल्या माजी विद्यार्थ्यांच्या हस्ते करण्यात आले. इमारत बांधकामासाठी एक लक्ष देणगी देत मोलाचे योगदान देणाऱ्या देणगीदारांचा सन्मान या सत्रात करण्यात आला. कल्याणी टेक्नोफोर्जचे श्री. अनंत चिंचोळकर यांनी ध्वनिमुद्रणालयाचे उद्घाटन केले. डोळस मोर पिसारा हे खास मनोहर सभागृहासाठी लिहिलेले पद्य यावेळी शास्त्रीय बाजाने हंस ध्वनी रागात सादर झाले. कलादालनाच्या वास्तु संकल्प वाचनाने कामाची दिशा स्पष्ट झाली. ज्ञानप्रबोधिनीचे कार्यवाह मा. सुभाषराव देशपांडे यांनी कलेचे शिक्षणातील स्थान अधिक स्पष्ट केले. माजी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या संगीत सभेने कार्यक्रमाची सांगता झाली.

इमारतीचा मुख्य उद्घाटन सोहळा सौर आषाढ १ शके १९४३ अर्थात २२ जून २०२१ रोजी सकाळी १०.३० वाजता झाला. हा दिवस म्हणजे वर्षारंभ... प्रसन्न वातावरणात मातृभूमी पूजन करण्यात आले. नंतर उतरले आकाश पक्षी शारदेच्या अंगणी हे यथोचित पद्य सादर झाले. श्री. नितीनभाई कारीआ, श्री. पार्थ मुखर्जी, श्री. संजय कुलकर्णी, मा. संचालक श्री. गिरीशराव बापट या मान्यवरांनीया नवीन वास्तुबाबत आनंद व्यक्त करत शुभेच्छा दिल्या.

## ❋ गणेशोत्सव व्याख्यानमाला

यंदाच्या वर्षी पर्यावरण या विषयाच्या अनुषंगाने व्याख्यानांचे विषय ठरवले होते. त्यामुळे या वर्षी व्याख्यानांमधून पर्यावरणासंबंधित समस्या स्वीकारणे आणि त्यावर उपाय सुचवणे अशा आशयाची ही सर्व व्याख्याने होती. ही व्याख्यानमाला चार भागात घेतली. त्यापैकी एक मुलाखत आणि ३ व्याख्याने असे निश्चित झाले. जनजीवन सुरळीत व्हायला पर्यावरण रक्षण आणि भूसंवर्धन गरजेचे आहे. पर्यावरण रक्षण करण्यापेक्षा आपण आपले रक्षण कसे करू शकू हे पाहायला हवे, वृक्षारोपण करताना किंवा झाडांना पाणी घालताना त्यांची माती सकस आहे ना ? त्यात ओलावा आहे ना ? हे पाहायला हवे, अशा अनेक छोट्या छोट्या गोष्टी केतकीताईंनी सांगितल्या.

नद्यांची भौगोलिक रचना, देश विदेशातील नद्यांची पूर्वस्थिती ते सद्यस्थिती सांगत सर्वात जास्त प्रदूषित नद्या ह्या आपल्या प्रगत महाराष्ट्रात असल्याचे शैलजाताईंनी नमूद केले. विदेशातील प्रदूषण रोखण्यासाठी स्थानिक लोकसहभागाबद्दलही ताईंनी सांगितले. रसायनविरहित जीवनशैलीचा अंगीकार, जलसाक्षरता, दत्तक घेऊ नदीकिनारे, नदी महोत्सव अशा विविध उपक्रमातून लोकांना नदीच्या जवळ आणणे याबद्दल सांगितले. नदी पुनरुज्जीवन व लोकसहभाग यावर ताईनी अभ्यासपूर्ण मांडणी केली.

शाश्वत उर्जा आणि त्यातून आत्मनिर्भरता हवी असेल तर बहुआयामी विचार केला पाहिजे. त्यासाठी भारतामध्ये कशा प्रकारच्या संधी उपलब्ध आहेत यांचे विश्लेषण नितांतजी यांनी केले. सूर्य हा सगळ्या शाश्वत मार्गांचा मुख्य स्रोत आहे व सगळ्या उर्जास्त्रोतांमधून आत्ता आपण कशी उर्जा मिळवतो आहोत याबद्दल त्यांनी सांगितले. सध्या कुठे काय काय प्रयोग केले आहेत, अजून काय करू शकतो आणि त्यातून आत्मनिर्भरतेकडे कसे जाता येईल हे देखील समजावले. या सगळ्या ऊर्जा प्रकल्पांचे विकेंद्रीकरण कसे गरजेचे आहे व पर्यावरणामध्ये मानवी हस्तक्षेपामुळे कसे बिघाड झाले आहेत याबद्दल नितांतजी यांनी फारच छान मांडणी केली.

शेतीमधील विविध आव्हाने, येणाऱ्या विविध नैसर्गिक आपत्ती आणि पर्यावरण या सर्वांसाठी बांबू कसा उपयोगी पडू शकतो, त्याच्या विविध जाती तसेच भारताच्या व भारताबाहेर बांबूची कशी लागवड केली जाते याची सविस्तर माहिती आणि शाश्वत विकासाच्या दृष्टीने बांबू कसा उपयोगी आहे. एक ऊर्जेचा चांगला पर्याय म्हणून आपण बांबूकडे पाहू शकतो हे डॉ. हेमंतजी यांनी सांगितले. चारही व्याख्यानांना ठराविक संख्या प्रत्यक्ष सभागृहात उपस्थित होती बाकी सर्वांसाठी ऑनलाईन प्रक्षेपणाची सोय केली होती.

| दिनांक | विषय | वक्ते |
|---|---|---|
| १५/०९/२०२१ | भूसंवर्धन व उद्योजकता | मा. केतकीताई घाटे |
| १६/०९/२०२१ | नदी पुनरुज्जीवन व लोक सहभाग | मा. शैलजाताई देशपांडे |
| १७/०९/२०२१ | शाश्वत उर्जेतून आत्मनिर्भरता | मा. नितांतजी माटे |
| १८/०९/२०२१ | बांबूची अनोखी दुनिया | मा. डॉ. हेमंत बेडेकर |

## * शारदीय नवरात्र

ज्ञान प्रबोधिनी निगडीमध्ये प्रथमच साकारली एक नवीन कल्पना... शारदीय नवरात्रात आपल्या मनातील भाव, कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी माजी ज्येष्ठ अध्यापिका (पूजन) कृतज्ञता समारंभ. दि. १३ ऑक्टोंबर २०२१ रोजी मनोहर सभागृहात साजरा झाला.

जर शारदादेवी कोणाला बघायची असेल तर आज व्यासपीठावर जमलेल्या या अध्यापिका म्हणजेच आमच्यासाठी शारदा देवी आहेत. अशा समर्पक शब्दांमध्ये कार्यक्रमाची प्रस्तावना झाली आणि प्रत्यक्ष अध्यापिका पूजनाचा कार्यक्रम सुरू झाला.

यात भावपूर्ण व सुखावलेल्या मनांनी आलेल्या अध्यापिकांचे शाळेत सध्या कार्यरत असलेल्या माजी विद्यार्थिनींनी पाद्यपूजा करून आपल्या कृतज्ञतेचा भाव व्यक्त केला. व याच वेळी स्मिताताई व शीतलताई, अनघाताई यांनी नेमक्या शब्दांमध्ये त्या त्या शिक्षकांच्या काही जुन्या आठवणींना उजाळा दिला आणि आपले मनोगत व्यक्त केले. सर्व अधापाकांच्या समोरील विद्यार्थ्यांना घडवण्यासाठी आशीर्वादही मागितले.

बिदरकर बाई, सौ. पुणतांबेकर बाई, सुहासिनीताई पानसे यांनी त्यांच्या प्रबोधिनीच्या प्रवासातील आठवणी सांगत. कै.भाऊंमुळे कसे घडलो आणि प्रबोधिनीमय झालो असे मनोगत त्यांनी व्यक्त केले. आणि विद्यार्थ्यांच्या काही ठराविक गटांमध्ये संवाद साधायला आवडेल अशी हक्काची सूचनाही त्यांनी देवळेकर सरांना केली.

मा. यशवंतराव लिमये यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले, अध्यापकांसोबतचे अनुभव आणि इतर सर्वांसाठी मार्गदर्शन केले. मा. देवळेकर सर यांनी समारोप केला.

संपूर्ण कार्यक्रम खूपच भावपूर्ण झाला... आणि यामुळे एकत्रित आलेल्या गटाची नक्कीच छान मोट बांधली गेली...

## * धन्वंतरी याग

मंगळवार दिनांक २ नोव्हेंबर धनत्रयोदशीच्या दिवशी धन्वंतरी याग पूजन व वास्तुशांती समारंभ यांचे आयोजन करण्यात आले होते. पूजक म्हणून ज्यांनी मनोहर सभागृहाच्या वरील विस्तारित इमारतीच्या बांधकामाची जबाबदारी स्वीकारली होती ते श्री. शिवराज दादा पिंपुडे व सौ. पिंपुडे आणि क्रीडाकुल प्रशिक्षक श्री. निखिल सोनोने व वैद्य सौ. सोनोने यांच्या शुभहस्ते श्री महेश नंदे गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली यज्ञाच्या साक्षीने, मंत्रोचाराच्या जागरात यथासांग पार पडली. पूजेसाठी श्री. नितीनभाई कारिया, परिसरातील क्रीडा क्षेत्रातील मान्यवर, आपल्या विद्यालयाचे डॉक्टर असलेले माजी विद्यार्थी तसेच डॉक्टर पालक सर्व विभाग प्रमुख अध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

## * श्रद्धांजली सभा

रविवार दि. २१ नोव्हेंबर रोजी आ. माई तथा इंदिरा वामन अभ्यंकर यांचे देहावसान झाले.

त्यांच्या स्मरणार्थ शनिवार दिनांक २७ नोव्हेंबर २०२१ रोजी श्रद्धांजली सभेचे आयोजन मातृमंदिर येथे केले होते. सभेची सुरुवात पंचपदीने झाली. त्यानंतर निगडी केंद्रातील अध्यापक पालक यांनी तुकाराम महाराज अभंग, प्रभुजी मै अरज, काया ही पंढरी हे अभंग सादर झाले. भगवद्गीतेतील १२ वा आणि १५ व्या अध्यायाचे पठण घेण्यात आले. केंद्रप्रमुख मा. देवळेकर सर यांच्या सह माईंच्या संस्कारांनी गीतापठणाचा वारसा पुढे चालवणाऱ्या शाळेच्या माजी विद्यार्थिनी, माजी अध्यापक पालक आणि नातेवाईक यांनी प्रातिनिधिक स्वरूपात आपल्या मनोगतातून आदरणीय माईंना आदरांजली वाहिली. भैरवीने कार्यक्रमाची सांगता झाली.

## * सिंहगड मोहीम

छत्रपती शिवरायांची जन्मभूमी..कर्मभूमी !! इथल्या सह्याद्रीच्या प्रत्येक कड्या कपारींना आणि गड किल्ल्यांना स्वतःचाच असा एक इतिहास लाभलेला आहे. आणि हा इतिहास वाचायचा असेल; अनुभवायचा असेल; तर त्यासाठी थंडी, वारा, ऊन याची तमा न बाळगता दगडधोंड्यांची, काट्याकुट्यांची वाट तुडवत, तिथल्या इतिहासातील घडलेल्या प्रसंगांच्या, बलिदानाच्या, विजयाच्या असंख्य खाणाखुणा प्रत्यक्षात पहात गडकिल्ल्यांची भ्रमंती करावी लागेल.

याच हेतूने रविवार दि. ६ मार्च रोजी ज्ञानप्रबोधिनी विद्यालयातील १००० च्या वर पालकांनी एकत्रितपणे सिंहगड दुर्गभ्रमंती करण्याचे ठरले. यामध्ये या सिंहगड मोहिमेत सहभागी होण्यासाठी पालकांना केलेले आवाहन आणि त्याच्या नावनोंदणीसाठी गूगल फॉर्म तयार करण्यापासून ते आपत्ती व्यवस्थापनापर्यंत अनेक गोष्टींचे सूक्ष्म नियोजन यात केलेले होते. विद्यालयातील शिक्षकांचा मोठा गट आणि वैद्यकीय गटही नियोजनात उतरला होता.

सुमारे ३२ बसेसमध्ये ठरलेल्या वेळेत आपले १३५० पालक उत्साहाने घोषणा देत, पद्य म्हणत गडावरील कार्यक्रमाच्या नियोजित ठिकाणी येऊन सुखरूपपणे पोहोचले. त्यानंतर गडावरील सभेची सुरुवात झाली. प्रारंभी श्री. कामथे सर आणि विद्यार्थ्यांचे त्यांच्या खणखणीत आवाजातील अतिशय वीररसपूर्ण पोवाड्याचे सादरीकरण ऐकून उपस्थित श्रोते अगदी मंत्रमुग्ध झाले. यानंतर श्री. शिवराज दादांनी उपस्थितांशी संवाद साधला. त्यादिवशीचे प्रमुख अभ्यागत श्री. अविनाश धर्माधिकारी, श्री. नंदू मते, श्री. मोहन शेटे यांनी उपस्थितीतांशी संवाद साधला. सौ. शीतलताई कापशीकर यांनी महिला दिनाच्या अनुषंगाने पोवाडा सादर केला. यानंतर श्री. अविनाश धर्माधिकारी सरांनी सर्वांना पर्यावरण रक्षण, स्त्री सक्षमीकरण आणि आपले स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष याला अनुसरून शपथ दिली.

केवळ पिंपरी –चिंचवडच नाही तर संपूर्ण पुण्याच्या इतिहासात असा आगळा वेगळा, नाविन्यपूर्ण उपक्रम म्हणून ही मोहीम ओळखली जाईल. अशी ऐतिहासिक मोहीम सर्वांच्या एकजुटीतून अत्यंत उत्साहाने पार पडली. नवनवीन पालकांच्या ओळखी होणे, प्रत्येकातील क्रियाशिलतेला वाव मिळणे, नेतृत्वगुण वाढीस लागणे, आपला परीघ रुंदावणे, पर्यावरणविषयक जाणिवा जागृत होणे, या रोजच्या धकाधकीच्या जीवनात काही क्षण तरी निसर्गाच्या सानिध्यात मुक्तपणे फिरण्याचा आनंद घेणे,

आपल्या मुलांमध्ये निसर्गाविषयी, पुरातन वास्तू, ऐतिहासिक ठिकाणांविषयी आवड निर्माण करणे, तिथला गौरवशाली इतिहास तज्ज्ञांकडून प्रत्यक्ष ऐकणे, अनुभवणे.. !!! अशा अनेक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी पालकांची एकत्रित दुर्गभ्रमंती ही एक मोठी सुवर्णसंधीच ठरली.

## * आ. भाऊ प्रथम पुण्यस्मरण

दिनांक १६ फेब्रुवारी २०२२ रोजी कै. वामनराव अभ्यंकर तथा भाऊ यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त सकाळी ७ वाजता प्राधिकरणातील वेगवेगळ्या ठिकाणाहून प्रभात फेरी काढण्यात आली. अभंग, मनाचे श्लोक, उत्तम पुरुष लक्षणे यांचे पठण विद्यार्थ्यांनी केले होते. अनेक पालक, माजी विद्यार्थी, केंद्रातील सदस्य यात सहभागी झाले होते. प्रभात फेरीला सुरुवात करण्याआधी वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या मार्गदर्शकांकडून भाऊंच्या आठवणी विद्यार्थ्यांना सांगण्यात आल्या आणि त्यानंतर प्रभात फेरीला सुरुवात झाली. सर्व गट एकत्र मातृमंदिरात जमले. तेथे भाऊंच्या आवाजातील वैदिक राष्ट्रगीत सर्वांना ऐकवण्यात आले. केंद्रप्रमुख श्री मनोजराव देवळेकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर पसायदान होऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

तसेच संध्याकाळी भाऊंच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त समर्थ भक्त मोहनबुवा रामदासी यांच्या प्रवचनाचे आयोजन करण्यात आले होते. गुरु- शिष्य हा प्रवचनाचा विषय होता. यावेळी भाऊंचे कुटुंबीयसुद्धा उपस्थित होते. तत्पूर्वी भाऊंच्या 'चिंतनिका' या पुस्तकाचे पुनर्प्रकाशन या कार्यक्रमात करण्यात आले.

✸✸✸

महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती परीक्षा २०२१ - यावर्षी विभागातील इयत्ता ५ वीच्या ११ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती प्राप्त केली.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कु. अर्णव जाधव | प्राप्त गुण २६४ | (जिल्हास्तरीय २७ वा) |
| २. | कु. अमोघ प्रधान | प्राप्त गुण २४० | (जिल्हास्तरीय १३८ वा) |
| ३. | कु. प्रज्ञेश चोंधे | प्राप्त गुण २४० | (जिल्हास्तरीय १४४ वा) |
| ४. | कु. दुष्यंत लोढा | प्राप्त गुण २३२ | (जिल्हास्तरीय १९२ वा) |
| ५. | कु. श्रुती कांदकर | प्राप्त गुण २२४ | (जिल्हास्तरीय २४३वी) |
| ६. | कु. अवधूत पांडे | प्राप्त गुण २२२ | (जिल्हास्तरीय २५७ वा) |
| ७. | कु. चैतन्य पुरोहित | प्राप्त गुण २२० | (जिल्हास्तरीय २८९ वा) |
| ८. | कु. श्रेयस गवारी | प्राप्त गुण २१८ | (जिल्हास्तरीय २९८ वा) |
| ९. | कु. पूर्वा शहा | प्राप्त गुण २१८ | (जिल्हास्तरीय २९९ वा) |
| १० | कु. स्वरा सानप | प्राप्त गुण २१० | (जिल्हास्तरीय ३७४ वा) |
| ११. | कु. राम भारंबे | प्राप्त गुण २०२ | (जिल्हास्तरीय ४५४ वा) |

## ✻ पाककला अभिरुची ✻

**अध्यापक – सौ. विजया आहेर**

**नमस्कार,**

**अनुभव अभिरुची पाककला गटासाठी यावर्षी आम्ही कार्यरत होतो. ८वी आणि ९वी च्या विद्यार्थ्यांचा गट पाककलेमध्ये सहभागी होता. पाहिले सत्र ऑनलाइन पद्धतीने तास घेतले गेले यामध्ये प्रत्यक्ष अनुभव देताना अडचणी येत होत्या. मात्र दर्शनाचा भाग मुलांपर्यंत जास्तीत जास्त पोहचवता आला. यामध्ये पाककला म्हणजे फक्त एखादा पदार्थ बनवणे एवढच मर्यादित नसून पुढे असणाऱ्या करीयरच्या संधी, फूड फॅक्टरी, प्रिझर्वेशन प्रक्रिया याबद्दलचे व्हिडिओ मुलांना दाखवले. त्याचबरोबर मुलांना** Master Chef, epic **या दूरदर्शन वाहिनीवरील काही कार्यक्रमाचे व्हिडिओ दाखवले. या क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मुलाखती मुलांना दाखवल्या. केक बनवण्याची कार्यशाळा घेतली. मुलांनी कार्यशाळेला छान प्रतिसाद दिला. प्रत्यक्ष शाळा सुरू झाल्यानंतर अभिरुचीचे ऑफलाईन तास सुरू झाले. ऑफलाईन तासातील मुलांचा सहभाग खूप छान होता. प्रत्यक्ष तासांना भाज्यांचे कटिंग आणि कार्विंगचे विविध प्रकार दाखवले. गॅसचा वापर न करता पदार्थ बनवणे हा अनुभव मुलांनी घेतला. महाराष्ट्राची खाद्यसंस्कृती यासंदर्भातील चर्चा आणि अभ्यास मुलांनी केला. घराजवळील हॉटेलला मुलांनी क्षेत्रभेट केली आणि तेथील कार्यप्रणालीचे निरीक्षण केले. मुलांना सगळ्यात जास्त आवडलेला उपक्रम म्हणजे चुलीवरची मिसळ. एप्रिल महिन्यात प्रत्यक्ष आईस्क्रीमची कार्यशाळा घेतली. प्रत्यक्ष आईस्क्रीम मुलांनी करून पाहिले. याव्यतिरिक्त नवनवीन पदार्थ मुलांनी पाहिले आणि स्वतः करून पाहिले. खाण्याइतकाच पदार्थ बनविण्याचा आनंद किती मोठा असतो हे मुलांना यातून समजले.**

### अभिनंदन

शालान्त परीक्षा निकाल जून २०२२ (इ. १०वी)

यावर्षी शैक्षणिक वर्ष २०२१-२२च्या विद्यालयातील १०वी च्या निकालातील प्रथम ५ क्रमांक

| क्र. | नाव | प्राप्त गुण | टक्के |
|---|---|---|---|
| १ | कु. मल्हार राहुल ओझर्डे | ४९३/५०० | ९८.६० % |
| २ | कु. प्राची प्रकाश दशरथ | ४८८/५०० | ९७.६० % |
| ३ | कु. सिद्धेश प्रशांत कोतकर | ४८७/ ५०० | ९७.४० % |
| ४ | कु. कोमल सतीश वागस्कर | ४८२/५०० | ९६.४० % |
| ५ | कु. चिन्मयी राजेश रानडे | ४८०/५०० | ९६.०० % |

## English Abhiruchi

**Teacher - Vaishali Gaikwad**

Abhiruchi is very close to hobby and passion which spices human life. It occupies our mind when we are free and makes us happy and content. This was the second year of English Abhiruchi and the teachers of English Abhiruchi wanted to make the classes interesting and enjoyable. This year we had a clear picture in our mind about conducting classes. Actually it was very difficult to think about English Abhiruchi as it was different than the classroom teaching. According to the guidance given by Abhiruchi guides we decided to give more exposure to the English literature. But it was very challenging to introduce volume of English literature to the 9th and 10th standard students. We followed the Moto that the classes will be more interactive, students centric and teachers will be only facilitators. Finally we started this years classes with the introduction of what is English literature? and it was unavoidable to introduce Shakespeare. Some famous Indian English writers like R.K. Narayan and Sudha Murthy encouraged students to read books and watch movies. English prayers and songs made classes more enjoyable. Our focus on skills and technics of English speaking along with some grammar items was found very useful. In group discussions and debates students took opportunity to express themselves in English.We were very keen about the participation of all students. Loud Reading of different dramas in groups made students more confident and free. This activity was of great success and really gave satisfaction to teachers as well. Overall the response of all students was praiseworthy and will boost our energy in future also. Thank you!

## Biotechnology Abhiruchi

**Student - Priyanka Bhate**

Hello everyone I am from 9th em. Today I will be sharing my experience about Biotechnology Abhiruchi since 8th std. I like Science, especially Biology, hence I choose my topic as Biotechnology. In 8th std we learnt about Bioluminescence, bio robotics, preparation of cocopeat, microgreens etc. My favorite topic was microgreens as we had to plant the seeds practically at home using hydroponics techniques. It was a fascinating experience for me to see the plants grow at home with minimal apparatuses. In 9th we learnt about bio fertilizers, bio fuels, seed bombs etc. On the 9th we mainly focused on plant tissue culture. It was an amazing experience to extract the plants from one bottle and initiate them in another. It was tricky but interesting. Once we were taken to kala biotech for a study trip. There we were told about the tissue culture processes in detail and we practically did primary and secondary hardening of plants there. My overall experience of learning biotechnology for 2 tears was very nice. I learnt things both practically and theoretically. I would like to thank all my biotechnology teachers including sagrika miss and anisha miss.

Thank you !

# अभिरुची उपक्रम

**अभिरूची या उपक्रमाची सुरुवात ही निगडी केंद्र हे कुलांचे संकुल व्हावे या उद्देशाने झाली. यात औपचारिक अभिरूची आणि अनुभव अभिरूची अशा दोन गटात इ. ८ वी ते इ. १०वीच्या विद्यांर्थ्यांसाठी विविध उपक्रम घेतले जातात. औपचारिक अभिरूचीत ११ विषय तर अनुभव अभिरुचीत १६ विषय आहेत. विद्यार्थ्यांना त्यांची आवड शोधून त्यातील प्रयोग करत रमून जावे तसेच त्या विषयाच्या सर्व बाजूंचे दर्शन मुलांना व्हावे. हा मुखख्य हेतू आहे.**



*** अभिरुची सांगता**

औपचारिक व अनुभव अशा दोन्ही अभिरुची गटांचा सांगता कार्यक्रम मनोहर सभागृहात दिनांक २६ मार्च २०२२ रोजी झाला. ५ निर्मिती कला (चित्रकला, बागकाम, शिल्पकला, पाककला, शिवणकला), ५ सादरीकरण कला (गायन, संवादिनी, तबला, नृत्य, वाचिक अभिव्यक्ती), ५ तंत्र (संगणक, अटल धडपडालय, मल्टीमीडिया, जैवतंत्रज्ञान, तंत्रशिक्षण), ५ भाषा (मराठी, हिंदी, इंग्रजी, संस्कृत, जपानी), ३ विज्ञान (जीवशास्त्र, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र), इतिहास, भूगोल व गणित अशा एकूण २६ विषयांची PPT सह निवेदने अध्यापकांनी सादर केली. त्यामध्ये वर्षभराचा थोडक्यात आढावा मांडून विद्यार्थ्यांनी त्यांना अधिक काय आवडले ते सांगितले. याच बरोबरीने प्रत्येक विषयाच्या एकेका विद्यार्थ्याने प्रातिनिधिक स्वरूपात आपले मनोगत मांडले. सर्वच मनोगते अतिशय श्रवणीय, रंजक व विद्यार्थ्यांचा भावनाकोष उलगडणारी होती.

कार्यक्रमाच्या प्रस्तावनेतून अनुभव शिक्षण प्रमुख मा.अनुजाताई भंडारी यांनी अभिरुची संकल्पना, या योजनेचा उद्देश, ती राबविताना झालेला अभ्यास, वर्षभरातील घडामोडी आदी गोष्टी मांडल्या. मा. शरदराव सुंकर कार्यक्रमासाठी प्रमुख अभ्यागत म्हणून उपस्थित होते. निगडी केंद्रात सतत काहीतरी नवीन घडतं, हा एक अगदी विलक्षण प्रयोग आहे या सर्वाचा संग्रह व्हायला हवा. 'प्रबोधिनी नेहमीच आगळ्यावेगळ्या कल्पना राबवते.' असे ते विद्यार्थी, अध्यापक, मार्गदर्शक सर्वांचे कौतुक करताना

म्हणाले. समारोप करताना 'अध्यापकांनी शिकवलं, आता विद्यार्थ्यांनी सराव करत आपली अभिरुची जोपासायला हवी, वाढवायला हवी' असे केंद्रप्रमुख मा. मनोजराव देवळेकर म्हणाले.

इयत्ता सातवी ते नववीचे दोन्ही माध्यमाचे सर्व विद्यार्थी, अभिरुची तासिका घेणारे अध्यापक-मार्गदर्शक या कार्यक्रमाला उपस्थित होते. यातील काही विषयातील अनुभव लेखन अध्यापक, पालक आणि विद्यार्थ्यांनी मांडले ते पुढीलप्रमाणे

## * अभिरुची - वाचिक अभिव्यक्ती *

अध्यापक -सौ.मयुरी जेजुरीकर

अभिरुची हा शब्द गेले ३ वर्ष सतत ऐकत होते. या बैठकांना मला अनेक नव्या गोष्टी कळत होत्या आणि सलग दुसऱ्या वर्षी जेव्हा माझा विद्यार्थी गट मला मिळाला तेव्हा मला फार आनंद झाला. कारण शिक्षक म्हणून काम करताना तुमचा आणि मुलांचा सहवास कायम महत्वाचा ठरतो. जितके जास्त दिवस मुलं तुमच्यासमोर, तितक्या नवीन गोष्टी करून बघायची संधी तुम्हाला मिळत राहते हे नक्की. वाचिक अभिव्यक्ती या विषयाची व्याप्ती अजून थोडी वाढवून जे जे बोलून व्यक्त होणारे प्रकार म्हणजेच वक्तृत्व, कथाकथन, अभिवाचन, काव्यवाचन, नाट्य, अभिनय या सगळ्यातला एक एक प्रकार तरी मुलांना कळावा अशीच रूपरेषा ठरवली. पण अभ्यासात बांधताना त्याला काही मर्यादा आल्या, त्यामुळे मग सुरुवातीला एकदम वाईट वाटून गेलं,कारण ऑनलाइन तास असल्याने मुलं फार प्रतिसाद देत नव्हती.. मग शेवटी स्वतःला बजावलं की मयुरी तू ठरवलं की काय शिकवायचं पण मुलांना विचारलं का की त्यांना काय आवडेल शिकायला? आणि मग लगेच गूगल फॉर्म कामी आले. सगळ्यानी फॉर्म भरून छान प्रतिसाद दिला. आणि मी माझ्या नियोजनात त्यानुसार बदल करून घेतले. खरंतर या मुली आता यावर्षी आपल्याकडे येणार नाहीत ह्या विचारांनीच वाईट वाटलं पण तरी त्यांच्या दहावी नंतर त्यांनी या विषयाचा आनंद घेत राहावा असे काहीतरी करावे असे वाटते आहे. विचार चालू आहे बघू काय सापडतयं! पण एकूणच अभिरुची प्रकल्पाचा मला एक व्यक्ती म्हणून, शिक्षक म्हणून खूप फायदा झाला...

## * बागकाम *

अध्यापक- सौ सुजाता मोरे

यावर्षीची सर्वात मोठी सुवर्णसंधी म्हणजे अभिरूची उपक्रमात बागकाम गटातील सहभाग. सुरूवातीला टेन्शन होते पण सहकारी गटच इतका उत्साही व प्रत्येक गोष्टींचे बारकाईने मार्गदर्शन करणारा होता त्यामुळे वर्षभरात खूप काही गोष्टी शिकता आल्या.

जूनमध्ये शाळा सुरू झाली तेंव्हा बागकामाचे online तास सुरू झाले. या तासांना व्हिडिओ दाखवणे, मुलाखती घेणे, बोनसाई प्लांट्सची ओळख, किचन वेस्ट पासून खत निर्मिती - डेमो, Online visit, Landscaper - शर्वरी भावे यांचे मार्गदर्शन, काष्टी येथील पानसरे नर्सरीची online visit इत्यादी. या विषयांचे दर्शन झाले.

खत निर्मिती प्रकारात सादरीकरण, विद्यार्थ्यांची नर्सरी व्हिजिट, आठ गटात विविध झाडांचा अभ्यास असे विषय ठरवले होते तर दुसऱ्या सत्रात रामदासकाकांनी मुलांना कलम करायला शिकवले. देशपांडे काकांच्या बागेला सर्व विद्यार्थांनी व शिक्षकांनी भेट दिली .



द्वितीय सत्रात तर मुलांनी उत्साहाने बालभवन परिसराात प्रत्यक्ष काम केले. जागा साफ करणे, बिया लावणे, रोप तयार करणे, झाडांना पाणी घालणे ही कामे मुले आनंदाने करत होती. चिखली गुरूकुलला भेट दिल्यावर खूप माहिती मुलांना मिळाली. या सर्व गोष्टीं जाणण्यात, पाहण्यात मुलांचा प्रतिसाद खूप चांगला होता. मुले प्रयोगशील होती. अनेक प्रयोग ते करून मुले पहात होती. उदा. खत निर्मिती/ झाडांवर पडणारी किड इ. माहिती त्यांनी मिळविली.

बागकाम या गटात ६ शिक्षक आहेत आणि प्रत्येक जण विविध माध्यमांचा उपयोग करून नवीन काहीतरी शोधून शेअर करत होता. आठवड्यातून एक दिवस आम्ही शिक्षकांची बैठक घेत होतो. वेगवेळ्या माहितीचे संकलन करतो. एकत्र चर्चा करून मुलांच्या तासांचे नियोजन करत होतो. दर आठवड्याला मुलांच्या नोंदी करत होतो. त्यामुळे शिक्षकांची गटबांधणी उत्तम झाली.

मी या वर्षी प्रथमच बागकाम गटात सहभागी झाले. मला खूप गोष्टी शिकायला मिळाल्या. माझ्या घरी टेरेस गार्डन आहे. ते मुलांना online दाखवले. मला बागकाम विषयी जी माहिती आहे ती मी मुलांना देण्याच्या प्रयत्न केला. विद्यार्थ्यांना काही दाखवायचे/सांगायचे या निमित्ताने वाचन/व्हिडीओज पाहणे शोधणे असे अनेक प्रकार केले. यानिमित्ताने ज्ञानात भर पडत आहे याचा आनंद आहे.

मुलांना बागकामात प्रत्यक्ष कृती करायला आवडते. पुढील वर्षी मुलांना काम करायची संधी मिळावी असे नक्कीच वाटते.

**शिवण अभिरुची खाटला वर्क**
**(क्षेत्रभेट)**



# * संस्कृत अभिरुची *

अध्यापक - सौ. श्वेतल महात्मा

हे अभिरुची योजनेचे दुसरे वर्ष त्यामुळे पहिल्या वर्षाचा अनुभव गाठीशी होता. आम्ही सर्व संस्कृत अध्यापकांनी अभ्यास आणि नियोजनपूर्वक अगदी पहिल्या तासापासून आमच्या गटात काम सुरू केले. त्यासाठी स्वयंअभ्यास, एकत्रित चर्चा, अभ्यास विषयांवर आधारित उपक्रम- अभ्यासकृती इ. रचना केली.

पूर्ण वर्षभरात विद्यार्थ्यांची संस्कृत विषयातील अभिरुची हळूहळू वाढत होतीच पण इथे एक नमूद करायला नक्की आवडेल की, विद्यार्थ्यांसोबत आम्ही सुद्धा आमच्या विषयाच्या पुन्हा पुन्हा प्रेमात पडत होतो आणि नवनवीन शिकण्याचा व शिकवण्याचा आनंद घेत होतो. या दरम्यान माझ्या एक लक्षात आले की माझे आणि विद्यार्थ्यांमधील नाते एवढे विश्वासाचे, मैत्रीचे झाले की शाळेच्या व्यतिरिक्त दिवसभरात केव्हाही विद्यार्थी माझ्याशी फोनवरून संवाद साधत होते. यात वेळेचे बंधन नव्हते. या संवादात शंकानिरसन तर होतेच परंतु काही वेळा विद्यार्थ्यांनी केलेल्या अभ्यासाने आश्चर्य आणि समाधान अशा दोन्ही भावना एकत्रित मनात येत होत्या. हा संवाद पुढची अभिरुची तासिका अधिक रंजक बनवत होता.

एकंदरच संस्कृत अभिरुची ही आम्हा संस्कृत अध्यापकांच्या आनंदमय कोषाचे साधन झालेली आहे आणि इथून पुढे संस्कृत विषय हा विद्यार्थ्यांच्या आनंदमय कोशाचे साधन व्हावा यासाठी आम्ही प्रयत्नशील असू. धन्यवाद!

# * इतिहास अभिरुची *

विद्यार्थी मनोगत - कु. अथिला सुहास पाटील.

अनुभव शिक्षणाबरोबरच आपल्या अभ्यासातील विषयातून आपण आनंद मिळवू शकतो हे औपचारिक अभिरुचीतून कळले. इतिहास विषयात आवड असल्यामुळे मी इतिहास विषय निवडला पण त्यात online माध्यमातून किती आवडीच्या गोष्टी होतील यावर थोडी शंकाच होती. पण Online तास सुरू झाले व लेणी, मंदिरे, किल्ले यावर व्याख्याने झाली. आपण ज्या परिसरात राहतो त्याचा इतिहास माहीत करून घेण्यापासून आम्ही अभ्यासाला सुरुवात केली व स्वतःचा इतिहास, वंशावळ जाणून घेतली. अभिरुचीमुळे मा. प्र. के. घाणेकर व इतर इतिहास अभ्यासकांना भेटण्याची व त्यांच्याशी गप्पा मारण्याची संधी मिळाली. शिक्षकांशी मी विविध ऐतिहासिक गोष्टींविषयी गप्पा मारू लागले. मावळा सारखे छान खेळ खेळायला मिळाले. अश्मयुगापासून रशिया-युक्रेनच्या युध्दा पर्यंत अनेक गोष्टींचा अभ्यास करायला मिळाला. रशिया युक्रेन युद्धाचा अभ्यास आम्ही करून माहिती सादर केली. इतिहास म्हणजे सनावळ्या पाठ करणे नव्हे तर इतर अनेक गोष्टी समजून घेणे असते हे अभिरुची मुळे कळले.

पद्मदुर्ग किल्ला बनविणे हा सर्वात आवडता उपक्रम होता. आपण बनविलेला किल्ला पडताना बघितल्यावर किल्ल्यांचे महत्त्व कळले. भुलेश्वर मंदिर बघणे हा एक अविस्मरणीय अनुभव होता.



धनत्रयोदशी या दिवशी
धन्वंतरी पूजन संपन्न झाले

पूर्व प्राथमिक विभागातील वर्गशः
पालकपाल्य सादरीकरणात
सहभागी होताना





विज्ञानदिन –
प्रयोगांमध्ये रमलेल्या
इआठवीच्या विद्यार्थिनी





प्राथमिक पहिली, दुसरी गटात
कार्यशाळेत सहभागी झालेले विद्यार्थी



सिंहगड मोहिमेत
श्री अविनाशजी धर्माधिकारी
यांच्यासोबत प्रतिज्ञा म्हणताना

हराळी येथील आरोग्य तपासणी शिबिरात वैद्याकीया सेवा  करत असताना स्नातक संघाचे सदस्य.





गोदावरी विद्यालयास भेट (३)



गुरुकुल स्नेहसंमेलनानिमित्त सोनियाताई  परचुरे यांच्या गटाने कथ्थक नृत्यामधून मांडलेला बुद्धिबळाचा पट

शारदीय नवरात्र उत्सवात
सहभागी झालेल्या
ज्येष्ठ माजी अध्यापिका






विद्यार्थी व पालक प्रबोधन
कार्यशाळेत ऑनलाईन मार्गदर्शन
करताना डॉ. प्राग पाटील

# संघटन

## युवक विभाग



दरवर्षी प्रमाणे या ही वर्षी युवक विभागाची चार दले व मार्गदर्शक दलाच्या माध्यमातून वर्षभर नियमित काम चालू होते. यावर्षी ३३ युवकांनी वर्षभर जबाबदारी घेऊन १५०-२०० विद्यार्थी युवकांसाठी काम केले. नियमित झालेल्या कामासोबत काही प्रासंगिक उपक्रम यावर्षी झाले. त्यातील सहा उपक्रमांचे तपशील पुढे देत आहोत.

### ✻ प्रतिज्ञाग्रहण

प्रबोधिनीचे संस्थापक संचालक कै. आप्पा पेंडसे यांच्या स्मृतिदिनानिमित्त १९ ऑगस्ट २०२१ या दिवशी युवक विभागाच्या १३ युवकांनी प्रथम प्रतिज्ञा घेतली. युवक सहविचार समिती मधील चार सदस्यांनी द्वितीय प्रतिज्ञा घेतली तर एका युवकाने तृतीय प्रतिज्ञा घेतली. ह्यासोबत काम करणाऱ्या दोन युवकांच्या चार कुटुंबीयांनीही प्रथम प्रतिज्ञा घेतली.

प्रतिज्ञा घेण्यापूर्वी या सर्व युवकांची प्रशिक्षणाची सत्रे ५ झाली. ह्याची जबाबदारी अवधूत गुरवने घेतली होती. तसेच आ. केंद्र व्यवस्थापक व आ. केंद्रप्रमुख यांच्यासोबत प्रतिज्ञा घेऊ इच्छिणाऱ्या सर्व सदस्यांची बैठक झाली होती. प्रतिज्ञाग्रहणाच्या दिवशी उपस्थित सर्व सदस्यांसाठी आ.संचालाकांचे वैचारिक सत्र झाले. यात प्रबोधिनीच्या चार प्रतिज्ञा व life goal, carrier goal, academic goal ह्यांची सांगड कशी घातली जाऊ शकते याबद्दलचे त्यांनी मार्गदर्शन केले.

### ✻ गिर्यारोहण

कोरोनाचे निर्बंध याही वर्षी कायम होते. ते हळूहळू कमी झाल्यावर शालेय व महाविद्यालयीन दलांचे चार वेगवेगळ्या ठिकाणी गिर्यारोहण झाले.

#### शालेय गट

विनायक दलाचे इयत्तानुसार दोन ट्रेक अनुक्रमे राजगड व तोरणा येथे जाऊन आले. राजगडला ५५ विद्यार्थी तर तोरण्याला ४४ विद्यार्थी सहभागी झाले होते. दोन्ही वेळी शालेय दलाचे ८ मार्गदर्शक

सहभागी झाले होते. ह्या दोन्ही गडांच्या सहलीची जबाबदारी विनयक दल प्रतोद नचिकेत भाटे याने घेतली होती.

**महाविद्यालयीन गट**

यावर्षी युवक विभागाच्या नियमित कामात साहसगटाची नव्याने भर पडली. साहसी क्रीडा प्रकारांचे अनुभव आणि गिर्यारोहणाचे नेहमीसारखे न घेता येणारे अनुभव घेणे, शारीरिक व्यायामाची आवड लागण्यासाठी केलेले विविध सत्रांचे आयोजन करणे असे याचे स्वरूप होते. वर्षभरामध्ये दोन गर्यारोहणाचे अनुभव युवकांनी घेतले.

महाराष्ट्रातील सर्वात उंच किल्ल्यावर साल्हेर–सालोटा या सातपुडा पर्वत रांगेतील गिर्यारोहणामध्ये १५ युवकांनी सहभाग नोंदवला. ह्या गटाचा दुसरा ट्रेक हिमालयातील १३८५० फूट उंचीवरील 'सार पास' येथे जाऊन आला. आठ दिवसांच्या या प्रवासात १४ युवकांनी एकूण ४५ किमी चे अंतर थंडीत पायी पूर्ण केले. तन्मय साळुंखे व अवधूत गुरव या दोघांनी या गटाची व या दोन्ही सहलींची जबाबदारी घेतली होती.

## ✻ रक्तदान शिबिर

मागील दोन वर्षांप्रमाणे याहीवर्षी युवक विभागाने वार्षिक रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. जवळपास ५०० हून अधिक रक्तदात्यांची माहिती या शिबिरांच्या निमित्ताने युवक विभागाकडे गोळा झाली आहे. वर्षभरात ४–५ वेळा गरजू रुग्णांना आपण रक्त देऊ शकलो.

कै. आ. भाऊंच्या जन्मदिनानिमित्त १ मे २०२२ ला 'श्री शंकर महाराज ट्रस्ट' आयोजित या शिबिरात चार रक्तपेढ्या सहभागी झाल्या होत्या. एकूण १८७ रक्तदात्यांनी यावेळी रक्तदान केले.

## ✻ पोफळी विस्तार शिबिर

ज्ञान प्रबोधिनीच्या संपर्क केंद्राच्या पुढाकारातून 'परशुराम एज्युकेशन सोसायटी' च्या पोफळी येथील शाळेत ३ दिवसांचे 'नेतृत्व प्रशिक्षण शिबिर' युवक विभागाच्या सहा सदस्यांनी घेतले. इयत्ता आठवीतून नववीत जाणारे ४० विद्यार्थी यामध्ये सहभागी झाले होते. संवाद कौशल्य, गटबांधणी, नियोजन यांसारख्या कौशल्यांचे प्रशिक्षण विविध कृतीसत्रांच्या मदतीने विद्यार्थ्यांना देण्यात आले. सुमेध जोशी याने या उपक्रमाची जबाबदारी घेतली होती.

## ✻ विनायकदल शिबिर

कुमारांसाठी चालणाऱ्या विनायक दलाचे निवासी शिबिर यंदा जून महिन्यामध्ये पार पडले. गटकार्य व गटबांधणी हे विषय मध्यवर्ती ठेवून आठ दिवसांचे आयोजन करण्यात आले होते. माध्यमिक मराठी व माध्यमिक इंग्रजी मध्ये शिकणारे एकूण ४६ विद्यार्थी शिबिरात सहभागी झाले

होते. शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना अनुभव कथन, कृतिसत्र, नियमित दल, रायगड येथील भेट, व्याख्याने यांसारख्या माध्यमातून गट बांधणीचे महत्व पटवून देण्यात आले. नचिकेत भाटे व निषाद वाटवे या दोघांनी या शिबिराची जबाबदारी घेतली होती.

**क्रीडा स्पर्धा :** दरवर्षी होणाऱ्या युवकांच्या क्रीडा स्पर्धांचा ह्या वेळी format बदलण्यात आला. सहविचार समितीने एप्रिल महिन्यात दोन खेळांच्या दिवसभराच्या सामन्यांचे आयोजन केले होते. स्वा. सावरकर दल, वीर चापेकर दल या सोबत युवक विभागाच्या संपर्कातील ५० युवक ह्या स्पर्धांमध्ये सहभागी झाले होते. ते lleyball व football चे चार –चार सामने प्रत्येक संघाने खेळले व त्यातून विजेते निश्चित करण्यात आले. युवक सहविचार समितीच्यावतीने अनुज देशपांडे व आदित्य काळभोर ह्या दोघांनी या स्पर्धांची जबाबदारी घेतली होती.

✸✸✸

## ❊ सप्रेम नमस्कार ❊

गेल्या वर्षातील या दिवसांचा भूतकाळ आजही माझा पाठलाग करत आहे. बेचाळीस वर्षांचा सहवास असलेली माझी पत्नी २८ जुलैला माझ्यापासून दुरावली. तो आघात सहन करेपर्यंत दोनच दिवसात माझा मुलगा, सून, जावई व माझी मुलगी असे घरातले चौघेजण कोरोना पॉझिटिव्ह निघाले. त्यांना दहा दिवस रुग्णालयात दाखल करावे लागले. एकट्याने काढलेले ते दिवस परीक्षा घेणारेच होते. कोरोनाची दुसरी फेज भयंकरच होती. मृत्यूचे तांडवाच होते. अशा जीवघेण्या परिस्थितीत जवळचे आप्तही फोनवरून फक्त काळजी व्यक्त करत असताना आपण मात्र वेळ मिळेल तेव्हा घरी येऊन माझी व मुलांची मनापासून चौकशी करत होतात. मला धीर देत होतात. घर सॅनिटाईझ करून घेण्यातही आपण मला मनापासून मदत केलीत. रक्तापेक्षा माणूसकीच्या नात्याने आपण हे सर्व केलेत. माणसामधल्या देवत्त्वाचे दर्शन मला आपल्यामुळे झाले. हे असेच कार्य आपण खूप जणांसाठी केलेत. याची मला जाणीव आहे. या कामी श्री. वावरे व इतर जणांची पण आपल्याला मदत झाली असणारच. हे सर्वच जण कौतुकास पात्र आहेत हे नक्की. हे पत्र म्हणजे औपचरिकता नसून मनातील भावनांचे प्रकटिकरण आहे. आपले व आपल्या सहकाऱ्यांचे मनापासून आभार मानून व्यक्त होण्यापेक्षा मी कायम आपल्या ऋणात राहणेच स्वीकारेन. परमेश्वर आपल्या पाठीशी सदैव उभा राहो ही प्रार्थना.

आपला

सतीश थिटे

# युवती विभाग



२०२१-२२ मध्ये युवती विभाग निगडीची प्रमुख म्हणून ऋचा मापारी व मार्गदर्शक म्हणून अनघा देशपांडे यांनी काम केले. या वर्षी युवती विभागात शालेय व महाविद्यालयीन गट या दोन गटांमध्ये काम करण्यात आले. शालेय गटप्रमुख म्हणून गीतांजली शिंदे आणि महाविद्यालयीन गटाची प्रमुख म्हणून मीनल गजेंद्रगडकर यांनी काम केले. शालेय गटात चार दले तर महाविद्यालयीन गटात दोन दले भरवण्यात आली. या वर्षी सहविचार समितीच्या नियमित बैठका झाल्या. ९ नियमित काम करणाऱ्या युवती व त्यांच्यासोबत ९ प्रतिनिधी अशा १८ युवतींनी काम केले. महाविद्यालयीन गटात अरुणिमा दल व अभ्यास दल अशी दोन दले घेण्यात आली. गेली दोन वर्षे सातत्याने सुरु असलेल्या या दलाची प्रतोद म्हणून अबोली भंडारी व प्रतिनिधी म्हणून श्रुती केसकर, श्रुती कुलकर्णी यांनी काम केले. एकूण वर्षभरात दलात क्रीडा, दीपोत्सव, गरबा, treasure hunt, स्व-संरक्षण सत्र सायकल सहली, काही कृतीसत्र व एक गिर्यारोहण घेण्यात आले. अभ्यास दलात शॉर्टफिल्म, वाचन इत्यादी कृतीतून विषयांचा अभ्यास करण्यात आला. सोशल मिडियाच्या माध्यमातून गार्गी साळवेकर हिने उत्तम पद्धतीने काम केले. नवरात्रीच्या निमित्ताने ९ दिवस विविध क्षेत्रात उत्तुंग कामगिरी केलेल्या तरी फारशा माहिती नसलेल्या ९ महिलांची माहिती सोशल मिडियावरून पोचविली गेली. शालेय दलात येसूबाई दल, परिस्थिती ज्ञान दल, असीमा विज्ञान दल व प्रेरणा दल अशी चार दले घेण्यात आली. येसूबाई दलात क्रीडादल, पद्यदल, जाहिरात करणे, treasure hunt, इत्यादी गोष्टी घेतल्या गेल्या. सायली पतकी हिने या दलाची प्रतोद म्हणून व प्रतिनिधी म्हणून वेदश्री काळे हिने काम केले. असीमा विज्ञान दलाची प्रतोद म्हणून अबोली भंडारी व प्रतिनिधी म्हणून स्फूर्ती कुलकर्णी आणि शर्वरी पेठे ह्यांनी दल घेतले. दलात अनेक वैज्ञानिक प्रयोग करण्यात आले, शॉर्ट फिल्म्स दाखविण्यात आल्या, न्यूटनचे गतीचे नियम, inertia असे अनेक वेगवेगळ्या विषयांचे प्रयोग करत विज्ञान शिकवण्याचा प्रयत्न केला. परिस्थिती ज्ञान दल प्रतोद म्हणून श्रीया वामन व प्रतिनिधी म्हणून पंकजा वैद्य यांनी काम केले. हे दल नववीच्या गटावर घेण्यात आले. प्रेरणा दल हे चिंबळीच्या मुलींसाठी घेतले गेले. या दलाची प्रतोद म्हणून सृष्टी सापटणेकर व दल प्रतिनिधी म्हणुन सृष्टी भोईटे हिने काम केले. या दलात

अनेक कृतीसत्र व इंग्रजी भाषा मुलींना शिकवली गेली.

यावर्षी गणेशोत्सव आणि नेतृत्व प्रशिक्षण शिबिर हे दोन मोठे उपक्रम घेण्यात आले. गणेशोत्सवात पूजा साहित्य विक्री, गणपती बनण्याची कार्यशाळा व पोथी असे उपक्रम घेण्यात आले. पुढील १० वर्षांसाठीचा भवितव्य लेख लिहिण्याचे काम झाले. पौरोहित्य प्रशिक्षण युवतींनी केंद्र स्तरावरील इतर समित्यांमध्ये सहभाग नोंदवला. ३ युवती संघटन समिती, ३ युवती 'युवती संघटन समिती' तर २ युवती 'भवितव्य लेख समिती'मध्ये सदस्य होत्या.

✷✷✷

## ✻ शिल्पकला अभिरुची अनुभव ✻

**विद्यार्थी मनोगत,**

**नमस्कार माझे नाव गौरी प्रसाद कुलकर्णी. मी आठवी या वर्गात शिकते माझा विषय शिल्पकला आहे. कोरोना च्या काळामध्ये काहीतरी नवीन शिकायचं होतं. आठवीमध्ये अभिरुची गट असतो, त्यामध्ये ही संधी मिळाली. मी चित्रकला विषय निवडला होता. आणि द्वितीय सत्रात शिल्पकला विषय निवडला. मला शिल्पकला विषयांमध्ये फक्त माती काम करायचे असते असा समज होता. पण विषय निवडल्यानंतर त्यामध्ये इतके प्रकार आहेत हे समजले शाडू मातीपासून आकार बनविणे व त्यानुसार कलाकृती करणे, पेपरचे मॉडेल तयार करणे, पॉटरी व पॉटरीवरील नक्षीकाम. साबणावर कोरीव काम, त्यापासून मंदिर मॉडेल तयार करणे. गटामध्ये काम करणे. असे अनेक विषय शिल्पकला मध्ये शिकले. याव्यतिरिक्त मला अजून पुढील वर्षी जसे पीओपी कोरीवकाम. सिपोरेक्स कोरीव काम. मोल्डिंग, वॅक्स लाकडावर कोरीव काम. हे शिकण्यासाठी मी नववी मध्ये पुन्हा शिल्पकला विषय निवडला आहे. राकेश दादा यांचे वेळोवेळी शिल्पकला विषयाबद्दल मार्गदर्शन मिळत आहे. मी सर्व अभिरुची शिक्षकांचे मनःपूर्वक आभार मानते त्यांच्यामुळे आज आम्ही असे अनेक विषय शिकत आहोत.**

**धन्यवाद.**

### ✻ अभिनंदन ✻

सातारा येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय एल्बोबॉक्सिंग स्पर्धेमध्ये बारा वर्षाखालील गटात पूर्व माध्यमिक विभागातील इयत्ता सहावी मधील कु. श्रुतिका पवार या विद्यार्थिनीने सुवर्णपदक पटकावले.

# पालक महासंघ



**इवलेसे रोप लावियले द्वारी... तयाचा वेलू गेला गगनावरी ।**

याच पंक्तीला अनुसरुन सुरुवातीला म्हणजेच साधारण दहा वर्षांपूर्वी केवळ खेळाच्या माध्यमातून एकत्र आलेल्या पालकांच्या एका लहानशा गटाचे आज पालक महासंघासारख्या मोठ्या वृक्षात रूपांतर झालेले आहे. वेगवेगळ्या क्षेत्रात रुची असणारे अनेक पालक एकत्र येऊन कला, क्रीडा, सामाजिक, शैक्षणिक, माहिती तंत्रज्ञान, उद्योग अशा पालक संघाच्या विविध उपक्रमात सहभागी होत आहेत.

## श्रावणधारा

गेली तीन वर्षे पालक संघाच्या सांस्कृतिक विभागाकडून पावसाळी कविता आणि गीतांवर आधारित श्रावणधारा हा स्वरचित आणि इतर कवितांवर आधारित काव्यमैफिलीचे आयोजन होत आहे. विद्यालयातील आई, बाबा पालक आणि अध्यापक यात सहभाग होत आहेत. यानिमित्ताने अनेक नवनवीन पालक या पालकसंघाशी तसेच विद्यालयातील इतर उपक्रमांशीही जोडले जात आहेत. यानिमित्ताने अनेकांच्या कलागुणांना छान व्यासपीठ उपलब्ध होतं आहे. याचबरोबर पालकसंघाचाच एक भाग असलेल्या महिलांच्या सखी गटानेही जानेवारी महिन्यातील ८ जानेवारी ते १५जानेवारी या दरम्यान आधुनिक नवरात्र या उपक्रमांतर्गत 'स्त्रीशक्तीचा जागर' हा सप्ताह साजरा केला. यामध्ये भगिनी निवेदिता. सावित्रीबाई फुले, येसूबाई सावरकर, आनंदीबाई जोशी, दुर्गाबाई चापेकर या आणि अशा अनेक विदूषींची व त्यांच्या कार्याची अभ्यासपूर्ण मांडणी झाली. हा कार्यक्रम ऑनलाईन पद्धतीने घेतला गेला.

## चित्रपट महोत्सव

एखादा विषय, गोष्ट लोकांपर्यंत पोहोचविण्याचे अत्यंत प्रभावी माध्यम म्हणजेच चित्रपट होय. केवळ मनोरंजन हा उद्देश न ठेवता अनेक माहितीपर विषय, सामाजिक संदेश ही याद्वारे लोकांपर्यंत पोहचवता येतो. पालक महासंघाच्या सामाजिक विभागाकडून महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले

यांच्या कार्यास सलाम करणाऱ्या ज्योती या आशयघन लघुपटाचे  तसेच स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने स्वातंत्र्य संग्रामातील समिधा या शौर्यगाथेच्या लघुपटाचे, गणेशोत्सवाच्या दरम्यान मोदक तसेच सार्वजनिक स्वच्छतेचा संदेश देणाऱ्या कचराकोंडी या अणि अशा अनेक सामाजिक विषयावरील चित्रपटांचे विद्यालयातील विद्यार्थी, पालक, अध्यापक यांच्यासाठी आयोजन केले गेले आणि याला अतिशय  छान प्रतिसाद मिळाला.

## उद्योग विभाग

उद्योगक्षेत्रातील संधी त्यातील नवनवीन आव्हाने, उद्योग सुरू करताना येणाऱ्या अडचणी यासाठीची आर्थिक गणितं, याचबरोबर नवोदित ते यशस्वी उद्योजक हा प्रवास या सगळ्या गोष्टींचे सखोल  मार्गदर्शन  आपल्या पालकांना, विद्यार्थ्यांना करुन देण्यासाठी उद्योग विभागाकडून आपल्याच विद्यालयातील पालक आणि यशस्वी उद्योजक असलेल्या श्री. अजय लोखंडे अणि श्री. प्रशांत मातेरे यांना अभ्यागत म्हणून आमंत्रित केले होते. या दोघांची अनौपचारिक मुलाखत आणि उपस्थितांना मार्गदर्शन आणि प्रश्नोत्तरे असा कार्यक्रम आयोजित केला गेला

याचप्रसंगी आपल्या उद्योजक पालकांसाठी

१ **Start up support**

२ औद्योगिक भेटी या दोन प्रकल्पांचीही यावेळी घोषणा झाली.

याच औद्योगिक भेटीच्या अनुषंगाने groGas "BioCNG Station, Primove Engineering Pvt. Ltd. पिरंगुट याठिकाणी ज्ञानप्रबोधिनी प्रशालेच्या माजी विद्यार्थ्यांनी सुरू केलेल्या एका प्रकल्पाला उद्योग विभागातील काही पालकांनी भेट दिली. आणि तेथील कामकाज जाणून घेतले.

## ❊ व्याख्यान

यावर्षी पालक संघातर्फे अनेक वेगवेगळ्या आणि उत्तम विषयावर व्याख्याने आयोजित केली. यामध्ये सुचेता कडेठाणकर, मौक्तीक कुलकर्णी, मधुर पडवळ असे संगीत, पर्यटन साहसी क्रीडा प्रकार अशा वेगवेगळया क्षेत्रातील वक्त्यांना आमंत्रित केले होते.

## ❊ क्रीडा महोत्सव-दुर्गभेटी-सूर्यनमस्कार यज्ञ

ज्ञान प्रबोधिनीतील पालक- शिक्षक क्रीडास्पर्धा म्हणजे सर्वांचा जिव्हाळ्याचा विषय. संपूर्ण वर्षभर आपले पालक या महोत्सवाची आतूरतेने वाट पहात असतात. हे वर्ष म्हणजे क्रीडा स्पर्धेचे दशकपूर्ती वर्ष! याही वर्षी क्रीडा स्पर्धा मोठया उत्साहात पार पडल्या. याचाच पुढचा भाग म्हणजे महिलांची मल्हारगड ही दुर्गभेट. यासाठी जवळपास ५० महिला सहभागी झाल्या होत्या. श्री. निलेशदादा गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही दुर्गभ्रमंती पार पडली.

यावर्षी पालक संघाच्या क्रीडा विभागाने (महिलांसाठी) सूर्यनमस्कार यज्ञाचे आयोजन केले होते. सुमारे दोन महिने विद्यालयातील अनेक महिला पालक मातृमंदिरात सकाळी उपासनेनंतर नियमितपणे सामूहिकरित्या सूर्यनमस्कार घालत होत्या. रथसप्तमीच्या दिवशी या कार्यक्रमाची सांगता झाली.

## ✲ प्लॅस्टिक संकलन

पर्यावरणाची जोपासना, वृक्षारोपण या गोष्टीत आपले पालक अगदी सजगतेने कार्यरत आहेत. प्लॅस्टिकचा कमीतकमी वापर करणे ते पुनर्निर्मिती करण्यासाठी पाठविणे. अशा गोष्टी पाल्यांपर्यंत कटाक्षाने पोहोचवून मुलांमधील पर्यावरणविषयक जागृती वाढविण्यासाठी आपण दर महिन्याला घरात साचलेले प्लॅस्टिक गोळा करुन ते पुनर्वापरासाठी सागरमित्र या संस्थेकडे सुपूर्त करतो.

यावर्षी सुमारे ९०० किलो प्लॅस्टिक विद्यालयातून गोळा केले आहे.

अशाप्रकारे सामाजिक, क्रीडा, कला, शैक्षणिक, वैद्यकीय या सगळ्याच क्षेत्रात पालक संघ अत्यंत धडाडीने कार्यरत आहे. अशा अनेक उपक्रमातून नवनवीन लोक पालकसंघाशी जोडले जात आहेत याद्वारे संघटन होऊन एकमेकांच्या साथीने अनेक विधायक उपक्रम यापुढे ही नक्कीचं उत्तमरीत्या पार पाडले जातील असा दृढ विश्वास वाटतो.. !!!

✸✸✸

महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती परीक्षा २०२१ – यावर्षी विभागातील इयत्ता ८वीच्या विद्यार्थ्यांपैकी शिष्यवृत्ती प्राप्त १० विद्यार्थ्यांची नावे खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कु. सृजा खातू | प्राप्त गुण ८५.१०% | (जिल्हास्तरीय १३ वी) |
| २. | कु. यश पिंगळे | प्राप्त गुण ८३.८९% | (जिल्हास्तरीय २२ वा) |
| ३. | कु. कार्तिक पाटील | प्राप्त गुण ७२.४८% | (जिल्हास्तरीय १३५ वा) |
| ४. | कु. समृद्धी काळे | प्राप्त गुण ७१.१४% | (जिल्हास्तरीय १६६ वी) |
| ५. | कु. आर्या कुलकर्णी | प्राप्त गुण ६९.७९% | (जिल्हास्तरीय २०९ वी) |
| ६. | कु. अथिला पाटील | प्राप्त गुण ६८.४३% | (जिल्हास्तरीय २२९ वी) |
| ७. | कु. सुधीर राणे | प्राप्त गुण ६८.००% | (जिल्हास्तरीय २४३ वा) |
| ८. | कु. कृष्णा गावडे | प्राप्त गुण ६४.४२% | (जिल्हास्तरीय ३३३ वा) |
| ९. | कु. आस्था प्रधान | प्राप्त गुण ६३.००% | (जिल्हास्तरीय ३८२ वी) |
| १० | कु. सृष्टी कोटकर | प्राप्त गुण ६२.४१% | (जिल्हास्तरीय ४०१ वी) |

# स्नातक संघ



गेल्या वर्षभरात वैद्यकीय स्नातक संघाच्या गटाने अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. लॉकडाऊनच्या काळात ऑनलाईन आणि शक्य असेल तेव्हा प्रत्यक्षपणे उपक्रम राबवण्यात आले. एकूण ६५ सदस्य असणाऱ्या या गटामध्ये सर्व विषयांतील तज्ज्ञ डॉक्टर्स, फिजिओथेरेपिस्ट, पॅरामेडिकल आणि टेक्निकल सपोर्ट टीमचा समावेश आहे. सर्वजण उत्साहाने आपली जबाबदारी पार पडतात आणि कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतात. 'सर्वे भवन्तु सुखिनः, सर्वे सन्तु निरामयाः' या उद्दिष्टाला अनुसरून वर्षभर अनेक आरोग्यविषयक विषयांवर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ नागरिकांचे आरोग्य, स्त्री स्वास्थ्य, कोविड व मुलांचे आरोग्य, मानसिक स्वास्थ्य, अर्गोनॉमिक्स, डायबेटिस ध्यान आणि योगसाधना अशा विविध विषयांवर एकूण १५ वेबिनार्स ऑनलाईन घेण्यात आले आणि जवळपास १५०० लोकांनी त्यात सहभाग नोंदवला.

## ❊ सेवावाहिनी उपक्रम

यावर्षातील सर्वात महत्त्वाचा उपक्रम म्हणजे कोरोना काळातील सेवावाहिनी उपक्रम. कोरोनाच्या दुसऱ्या लाटेदरम्यान डॉ. अमित म्हेत्रे व डॉ. पराग पाटील यांनी २४ तास फोनवर रुग्णांना वैद्यकीय सेवा दिली तसेच ३५ डॉक्टर्स, ११ मेडिकल कोऑर्डिनेटर्स, आणि इतर ६६ जणांच्या मदतीने गरजूंना टेलिमेडिसिनद्वारे वैद्यकीय सेवा, योग, प्राणायाम फिजिओथेरेपीचे वर्ग, मानसिक स्वास्थ्यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. पिंपरी चिंचवडमधील ९० जणांनी याचा लाभ घेतला. तसेच हराळी गावातील १६० लोकांना टेलिमेडिसिनद्वारे मार्गदर्शन करण्यात आले.

## ❊ आरोग्य तपासणी शिबिर

डॉ. बागेश्री देवकर आणि डॉ. मेधा देवळेकर यांनी वेल्हे तालुक्यातील गावात जाऊन १०० लहान मुलांची वैद्यकीय तपासणी केली आणि त्यांच्या पोषणासाठी आहारात सोयाबीनपासून बनवलेल्या पदार्थांचा समावेश करण्यात आला. तसेच दिनांक १३ ऑक्टोबर, २०२१ रोजी नवरात्रीच्या निमित्ताने शाळेतील सर्व सेविकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या

आरोग्य तपासणीसाठी डॉ. बागेश्री देवकर (बालरोग तज्ज्ञ), डॉ. सोनल बोन्द्रे (स्त्रीरोग तज्ज्ञ), डॉ. भारती देवकर (अस्थिरोग तज्ज्ञ) यांनी सर्वांना मार्गदर्शन केले. आपल्या दैनंदिन जीवनात स्वतःच्या तब्येतीबद्दल जागरूक राहणे महत्त्वाचे आहे, त्यासाठी आपण वेळ काढून स्वतःकडे लक्ष दिले पाहिजे, असे डॉक्टरांनी सांगितले. जरी श्रमाची कामे करत असलो तरी काही ना काही व्यायाम केला पाहिजे. असे त्यांनी सर्वांना सांगितले. स्त्रियांना होणारे सर्वसाधारण आजार कोणते (अनेमिया, स्तनांचा कर्करोग, पाळीचे आजार) व ते कसे टाळता येतील याबद्दल त्यांनी मार्गदर्शन केले. यानंतर सर्वांची वैयक्तिकरित्या वैद्यकीय तपासणी तसेच रक्त तपासणी करण्यात आली. गरजेनुसार काहींना आवश्यक ती औषधे मोफत देण्यात आली.

दि १६ ऑक्टोंबर २०२१ रोजी ज्ञान प्रबोधिनी, निगडी केंद्राच्या डॉक्टर टीमने हराळी येथे जाऊन वंचित गटातील लोकांसाठी आरोग्य शिबिर घेतले. ज्यात महिला, बालके व पुरुषांची मोफत वैद्यकीय तपासणी करून त्यांना मोफत औषधे देण्यात आली. १५ ऑक्टोंबर २०२१ रोजी विजयादशमी निमित्त प्रत्यक्ष सीमोल्लंघन करून निगडीच्या मेडिकल SPG मधील ४ डॉक्टर, पालक महासंघातील २ डॉक्टर व दोन साहाय्यक अशी टीम हराळीला पोहोचली. यामध्ये डॉ बागेश्री देवकर यांच्या नेतृत्वाखाली डॉ पराग पाटील, डॉ शुभांगी बहिरट, डॉ मेधा देवळेकर, डॉ सौरभ देशमुख, डॉ वसुंधरा रिकामे यांच्या बरोबर तुषार देशपांडे व आनंद बिराजदार हे सहभागी झाले होते. दुसऱ्या दिवशी हराळी पासून अंदाजे २० किलोमीटर अंतरावरील वडाचा तांडा येथे एकूण १७५ लोकांची आरोग्य तपासणी केली तसेच त्यांना मोफत औषधेही पुरविण्यात आली. सकाळी आठ ते दुपारी बारा अशी चार तास ही तपासणी चालू होती. त्यानंतर दुपारी जेवळी गावाजवळील मसणजोगी वस्ती व वडार वस्ती येथील सुमारे १०० मुले व महिलांची तपासणी करून औषधे देण्यात आली.

याच उपक्रमातील दुसरा टप्पा म्हणून दि. १२ फेब्रुवारी २०२२ रोजी निगडी केंद्राच्या डॉक्टरांच्या टीमने हराळीच्या शाळेतील पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिर घेतले. यात डॉ. वसुंधरा रिकामे यांनी झूमद्वारे सर्व मुलांशी संवाद साधून त्यांना आपल्या दातांची व तोंडाच्या आतील भागाची स्वच्छता कशी ठेवायची व त्याची काळजी कशी घ्यायची याबाबत माहिती दिली. त्यानंतर डॉ. बागेश्री देवकर, डॉ. शुभांगी बहिरट, वैद्य मेधाताई देवळेकर व डॉ. पराग पाटील यांनी सुमारे १०० विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली. या तपासणीतून पुढे आलेले मुख्य प्रश्न म्हणजे रक्तातील हिमोग्लोबिनची कमतरता व त्वचेचा अतिकोरडेपणा. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांची रक्त तपासणी करून घेण्याचे ठरले आहे. याव्यतिरिक्त ६-७ मुलांच्या अधिक तपासण्या करून पुढील निदान करण्याची आवश्यकता असल्याचे जाणवले. तसेच एका विद्यार्थ्याला त्वरित शस्त्रक्रियेची गरज असल्याचेही निष्पन्न झाले. दुपारी ३ ते ४ या वेळात वैद्य मेधाताई देवळेकर यांनी जास्वंद गटातील मुलींना बला तेल, निरगुडीचे तेल व शतावरी कल्प कसे बनवायचे हे शिकवले. त्याच बरोबर त्यांचे उपयोगही समजावून सांगितले. त्यानंतर डॉ. बागेश्री देवकर व डॉ शुभांगी बहिरट यांनी जास्वंद गट

व किशोरी विकास गट अशा दोन्ही गटातील सुमारे २५ मुलींची मासिक पाळी समज-गैरसमज या विषयावर ९० मिनिटांची कार्यशाळा घेतली. त्या भागात मुलींची लवकर लग्न करण्याची पद्धत आहे, असे असले तरी मूल योग्य वयातच व्हावं यासाठी कोणते उपाय करता येऊ शकतात व त्यामुळे आरोग्य कसे सुदृढ ठेवता येईल याबद्दल सखोल माहिती दिली.

## ❊ मेळावा

डिसेंबर महिन्यात एक मेळावा आयोजित करण्यात आला होता त्यामध्ये ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्र आणि प्रशालेच्या साधारण २०० माजी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. मा. गिरीशराव यांच्या मार्गदर्शनानंतर सर्वजण आपल्या Special Purpose Group मध्ये चर्चेसाठी गेले. या चर्चासत्रात १४ डॉक्टर्स होते. डॉ. सचिन गांधी यांनी JP मेडिकल ट्रस्टच्या संजीवन हॉस्पिटल ते दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल या प्रवासाबद्दल माहिती सांगितली. अनेकांनी आपली मते मांडली व भविष्यात काय काय करता येईल याबद्दल चर्चा केली.

## ❊ महिला दिन

यावर्षातील प्रत्यक्षपणे घेण्यात आलेला उपक्रम म्हणजे जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित केलेले व्याख्यान मेडिकल SPG, पालक महासंघ आणि इंडियन मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने स्तनांच्या कर्करोगाबद्दल माहिती आणि जागरुकता या महत्वपूर्ण विषयावर व्याख्यान मनोहर सभागृहामध्ये आयोजित करण्यात आले होते. या विषयातील अतिशय तज्ज्ञ डॉ. दक्षा निऱ्हाळे यांनी दृक्श्राव्य माध्यमांचा उपयोग करून स्तनांचा कर्करोग आणि तो टाळता कसा येईल याबद्दल माहिती दिली. ६० जणांनी प्रत्यक्ष सभागृहात आणि १५०० जणांनी ऑनलाईन सहभाग नोंदवला.

✸✸✸

## ❊ अभिनंदन ❊

- **साने गुरुजी कथामाला पुणे, आयोजित कथाकथन स्पर्धेमध्ये इयत्ता पाचवी ते सातवीच्या गटात कु. पर्णवी कुलकर्णी या विद्यार्थिनीने स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक तर कु.शर्वरी गुर्जरने तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळवले.**

- ALIVE **आयोजित 'चला चिऊ वाचवू ' या अभियानांतर्गत आयोजित 'गोष्ट माझी; गोष्ट चिऊची' या कथालेखन स्पर्धेमध्ये इयत्ता सातवीमधील चि. वेदांग गद्रे याने प्रथम क्रमांक मिळवला.**

## संलग्न विभाग

# मातृमंदिर विश्वस्त संस्था




### * 'ऑनलाईन क्लास-शिकविण्याचा ध्यास' स्पर्धा

कोरोना काळात शाळा बंद असताना शिक्षकांनी ऑनलाइन पद्धतीने विद्यार्थ्यांशी संवाद साधत शिक्षण चालू ठेवले. त्यासाठी विविध कृतीयुक्त उपक्रम राबविले. ज्यामुळे विद्यार्थ्यांची अभ्यासातील गोडी टिकून राहिली. अशा उपक्रमांना व्यासपीठ देण्याच्या हेतूने 'सकाळ माध्यम समूहाच्या 'सकाळ एन.आय.ई.' (न्यूजपेपर इन एज्युकेशन) आणि मातृमंदिर विश्वस्त संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने 'ऑनलाईन क्लास-शिकविण्याचा ध्यास' स्पर्धा घेतली गेली. तिला राज्यभरातील शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. श्री. विशाल सराफ यांनी या स्पर्धेचे संयोजन केले. 'सकाळ'चे संपादक सम्राट फडणीस, सहयोगी संपादक मुकुंद लेले, मातृमंदिर विश्वस्त संस्थेचे विश्वस्त ज्ञानेश्वर सावंत, कोषाध्यक्ष शिवराज पिंपुडे यांच्या हस्ते पारितोषिक प्राप्त शिक्षकांना सन्मानित करण्यात आले. हा पारितोषिक वितरण कार्यक्रम पुण्यातील सकाळ कार्यालयात पार पडला.

### * पद्मदुर्ग किल्ल्याची भव्य प्रतिकृती

मातृमंदिर विश्वस्त संस्था व ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्र यांच्या एकत्रित प्रयत्नातून पद्मदुर्ग या जलदुर्गाची ३०० चौरस फुटांमध्ये प्रतिकृती साकारण्यात आली. ही प्रतिकृती ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालयातील बालभवनच्या जागेत १८ नोव्हेंबर २०२१ पर्यंत सर्वांना विनामूल्य पाहण्यासाठी खुली होती. प्रतिकृतीसोबतच प्राध्यापक मोहन शेटे यांच्या आवाजातील पद्मदुर्ग किल्ल्याचा इतिहास ऐकण्याची सोय करण्यात आली होती. परिसरातील अनेक विद्यार्थी, पालक, नागरिकांनी प्रदर्शनास भेट दिली. श्री. प्रमोद सादुल व श्री. अवधूत गुरव यांनी या प्रकल्पाचे काम बघितले. श्री. रघुराज एरंडे यांनी प्रतिकृती तयार करण्यासाठी विशेष मेहेनत घेतली.

### * राज्यस्तरीय अभिवाचन स्पर्धा

डिसेंबर महिन्यात छात्र प्रबोधन व मातृमंदिर विश्वस्त संस्था निगडी यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय अभिवाचन स्पर्धा घेतली. यात ३७ संघांच्या अभिवाचन सादरीकरणाच्या चित्रफिती जमा

झाल्या. या स्पर्धेचे परीक्षण दोन स्तरांवर संगीता पुराणिक, मानसी फाटक, मयुरी जेजुरीकर, प्रसाद कुलकर्णी, प्रज्ञा कुलकर्णी व शिल्पा कुलकर्णी यांनी केले. बक्षिसपात्र संघांना पुस्तक व रोख अशा स्वरूपात बक्षिसे देण्यात आली.

## ❊ गुरुपौर्णिमा कार्यक्रम

यंदाचा गुरुपौर्णिमा हा दिवस मातृमंदिर विश्वस्त संस्थेचा हा १७ वा वर्धापन दिन होय. शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या व्यक्ती व संस्था यांचा गुणगौरव करण्याचा हा महत्त्वाचा दिवस. हा कार्यक्रम कै. श्री.वा. ना.अभ्यंकर (मातृमंदिर संस्थापक व ज्ञान प्रबोधिनी, निगडी केंद्राचे केंद्रप्रमुख) यांनी सुरु केला. आ. भाऊंच्या अनुपस्थितीत प्रथमच हा कार्यक्रम भारतीय सौर, श्रावण १३, शके १९४३ म्हणजेच बुधवार दि. ४ ऑगस्ट २०२१ रोजी मनोहर सभागृहात पार पडला.

समाजाप्रती निष्ठा राखून वेगवेगळी समाजहिताची कामे करणाऱ्या अनेक व्यक्ती, अध्यापक, समाज शिक्षक, कार्यकर्ता, वंदनीय गुरु अशा अनेक भूमिका पार पाडत असतात. अशांचा यथोचित सन्मान करावा व समाजापुढे आदर्श घालून द्यावा ही यामागची प्रमुख भूमिका.

''ध्येयाचा सुगंध लाभला जीवना।'' अशा ध्येयसुगंधित व्यक्तींच्या संपर्कात आपल्याला कार्यप्रेरणा मिळाल्याचा अनुभव या कार्यक्रमात सर्वांना मिळाला.

### अध्यापकोत्तम पुरस्कार

ज्ञान प्रबोधिनी पुणे येथील समाजाचे प्रश्न सोडवणारा धडपड्या कार्यकर्ता, विविध उपक्रम समन्वयक श्री.ओंकार बाणाईत यांना हा पुरस्कार मिळाला. आपले मनोगत व्यक्त करताना त्यांनी आजवरचा प्रवास मांडला.

### धन्य राधामाता पुरस्कार

मनात आणले तर एक स्त्री काय करु शकते हे स्वतःच्या उदाहरणातून दाखवून देणाऱ्या, कोणत्याही कामाची लाज न बाळगणाऱ्या, शिक्षणाचे महत्त्व समजून घेऊन त्याप्रमाणे सतत कार्यरत राहणाऱ्या द्वारकाताई वालगुडे यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. प्रबोधिनीच्या अनेक कार्यकर्त्यांनी केलेल्या सहकार्यामुळेच हा प्रवास साध्य होऊ शकला असे त्या मनोगतात म्हणाल्या.

### कार्यकर्ता गुणगौरव पुरस्कार

'छात्र प्रबोधन' सोबतच श्री. महेंद्रभाई सेठिया यांचे नाव आठवते. प्रबोधिनीच्या अग्रदूतांपैकी एक, अध्यापनाला नावीन्यपूर्ण अनुभवाची जोड देणारे, विलक्षण लोकसंपर्क असणारे म्हणजे महेंद्रभाई होय. त्यांना 'कार्यकर्ता गुणौरव' या पुरस्काराने गौरविण्यात आले. प्रबोधिनीत काम केल्याने कार्यकर्ता म्हणून घडण्याची, फुलण्याची प्रक्रिया खूप सुखद आहे याचा अनुभव आला असे त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले.

### समाजशिक्षक पुरस्कार

पाबळच्या विज्ञान आश्रमाचे संचालक, कृतीशीलता जोपासणारे, प्रत्येक अडचण ही एक संधी मानणारे श्री.योगेशजी कुलकर्णी यांना या पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. 'स्वतःला समाधान मिळण्यासाठी काम करायचे असते' असे त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले.

### गुरुगौरव पुरस्कार

नर्मदा परिक्रमा करताना आलेल्या विविध अनुभवातून विचारप्रक्रिया सुरु झालेल्या व स्वामी विवेकानंद यांच्या प्रेरणेतून, मुलांच्या अभिरुचीनुसार शिक्षण देणाऱ्या मध्य प्रदेशातील 'नर्मदालय' या संस्थेच्या संस्थापिका श्रीमती भारतीताई ठाकूर यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अनेक व्यक्तींच्या सहकार्यामुळेच हा प्रवास साध्य होऊ शकला असे भारतीताई आपल्या मनोगतात म्हणाल्या.

कार्यक्रमाचे अध्यक्ष व पुणे प्रबोधिनीचे कार्यवाह श्री.सुभाषराव देशपांडे यांनी अध्यक्षीय भाषणात सर्व पुरस्कारार्थींचा उल्लेख करत ''शिक्षणाचा अर्थ किती व्यापक आहे हे या सर्वांकडे पाहताना लक्षात येते. आचार्य हे एक व्रत म्हणून स्विकारल्यानंतर विविध जबाबदाऱ्या पेलताना आपले व्यक्तिमत्त्व समृद्ध होत असते'' असे आपल्या मनोगतात मांडले. ''आ. वा.ना.अभ्यंकर यांनी हा कार्यक्रम सुरू करताना किती दूरदर्शी विचार केला होता. हेही या निमित्ताने अधिक स्पष्ट झाले.'' असेही ते म्हणाले.

कार्यक्रमाचा समारोप करताना निगडी केंद्राचे केंद्रप्रमुख श्री.मनोजराव देवळेकर सर यांनी ''आ. भाऊंचे स्मरण करत अनेक कल्पना पुढे चालवणाऱ्या कार्यकर्त्यांमुळे ही चळवळ चालू आहे. आपणही हे व्रत समजून घेत ही परंपरा पुढे सुरु ठेवूयात'' असेही स्पष्ट केले.

## ❊ गुणगौरव पुरस्कार वितरण सोहळा

मातृमंदिर विश्वस्त संस्था आयोजित आचार्य विनोबा भावे यांच्या जयंतीनिमित्त गुणगौरव पुरस्कार वितरण सोहळा सौर २० भाद्रपद, शके १९४३, दिनांक ११ सप्टेंबर २०२१ रोजी प्रमुख अभ्यागत डॉ. गणेश राऊत यांच्या हस्ते संपन्न झाला.

तपस्वी विद्वत्त पुरस्कार प्र.के.घाणेकर यांना देण्यात आला व आयुर्वेद पुरस्कार डॉ अतुल काळे यांना तर विमल पुरस्कार वाघ मावशी यांना मान्यवर नितीनभाई कारीआ यांच्या हस्ते देण्यात आला. अन्नपूर्णा पुरस्कार नचिकेत बालग्राम येथे कार्यरत असणाऱ्या संगीताताई कोरबोळू यांना व १००% गुण मिळालेली ज्ञान प्रबोधिनी निगडीमधील विद्यार्थिनी अनुष्का पांडे हिचाही सत्कार करण्यात आला. स्वानंद पटवर्धन व अबोली भंडारी यांना युवक-युवती प्रोत्साहन पुरस्कार प्रदान करण्यात आला. यानंतर वैद्य अतुल काळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले त्यांनी आपल्या मनोगतामध्ये आयुर्वेदामुळे माणसांचे जीवन कसे सुखकर बनते हे संगितले व कोरोनासारख्या महामारीमध्ये आयुर्वेदामधील विविध उपाययोजना सांगितल्या.

तपस्वी पुरस्कार प्राप्त प्र. के. घाणेकर यांनी आपल्या मनोगतामध्ये अनेक रायगड रत्नांचा उल्लेख केला व आपले विविध ठिकाणच्या भेटीचे अनुभव सांगितले. इतिहासाचे अनेक दाखले दिले. माननीय अभ्यागत डॉ. गणेश राऊत यांनी विनोबा भावे यांची इतिहासातील पाने उलगडून प्रसंगाचे वर्णन केले.

## * संत साहित्य पुरस्कार वितरण सोहळा

भारतीय सौर मार्गशीर्ष १, शके १९४३,२२ नोव्हेंबर २०२१, हा दिवस म्हणजे मातृमंदिर विश्वस्त संस्थेचा स्थापना दिवस. मातृमंदिर विश्वस्त संस्थेमार्फत राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांपैकीच संत साहित्य हा एक उपक्रम आहे. संत साहित्य हे नेहमीच समाजाला मार्गदर्शन करणारे ठरत असते. आणि संत विचार हे तर मानवी मनाला शांती, समाधान मिळवून देणारे असतात. लेखक आणि प्रकाशक या दोघांनाही पुरस्कार दिल्यास भावी पिढीला संत विचारांचे धान्य दिल्यासारखे होईल. खरं तर १९९६ पासून संत साहित्य पुरस्कार उपक्रमास प्रारंभ झाला २२ नोव्हेंबर हा दिवस प्रत्यक्ष पुरस्कार प्रदान करण्याचा दिवस असला तरी दुसऱ्या दिवशीपासून पुढील वर्षीच्या कार्यक्रमाची तयारी चालू होते. २३ नोव्हेंबर ते २१ ऑगस्ट या कालावधीमध्ये लेखकांनी लिहिलेले जे ग्रंथ आहेत किंवा प्रकाशकांनी प्रकाशित केलेले ग्रंथ आहेत ते संस्थेकडे पाठविले जातात त्यानंतर सप्टेंबर आणि ऑक्टोबर या दोन महिन्यांमध्ये त्याचे परीक्षण केले जाते. पुस्तकांची तीन गटांमध्ये विभागणी केली जाते.

गट क्र.१- विवेचनपर चिंतनपर, गट क्र. २ - संत जीवन - ललित साहित्य,

गट क्र. ३ या वाङमय लेखनाचा विचार करायला हवा असे लेखन. दोन प्रतींमध्ये हे साहित्य मागविले जाते. दोन तज्ज्ञ परीक्षकांकडून त्याचे परीक्षण करून घेतले जाते. यासाठी पहिले परीक्षक लाभले ते सौ. कल्पना ताई काशीद आणि दुसरे परीक्षक डॉक्टर विश्वासराव मोरे. यावर्षी एकूण २३ पुस्तके परीक्षणासाठी आली. त्यापैकी ८ पुस्तकांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. त्यांची नावे खालीलप्रमाणे -

गट क्र. -१ मध्ये - १) सद्गुरु अच्युताश्रम स्वामी कृत - ।। अभंगगाथा ।।

२) ।। श्री नाथ भागवत ।।

यानंतर डॉ. चंद्रकांत देखणे यांनी उपस्थितांशी संवाद साधला. पुरस्कार प्राप्त लेखकांचे आणि प्रकाशकांचे अभिनंदन करून ते म्हणाले 'ज्ञान प्रबोधिनी माझे माजघर असून मी या पुरस्कार योजनेचा प्रथमपासून साक्षीदार आहे. त्यामुळे मला या कार्यक्रमाला येऊन खूप आनंद वाटला.'

**गगनापरी जगावे। मेघा परी मरावे।।**
**तीरावरी नदीच्या। गवतातूनी उरावे ।।**

....याचा आदर्श भाऊंच्या रूपाने आपल्या समोर आहे. या पुरस्काराची संकल्पना भाऊंमुळे उभी राहिली. आणि ती जवळपास २३ वर्षे चालू आहे. अशा निष्ठेने हा उपक्रम चालू ठेवणाऱ्या ज्ञानप्रबोधिनी

संस्थेचे मनःपूर्वक अभिनंदन केले. मराठी साहित्यामध्ये संत साहित्याचे वेगळे स्थान आहे. मराठी भाषेचा दर्जा टिकवला आहे तो संतांनी. देश भाषेची प्रतिष्ठा, भक्ती पंथाचा उदय आणि कर्म याची संगत या तीन गोष्टी एकत्र केल्यावर संत चळवळ उभी राहिली. आणि ही संत चळवळ काय आहे हे आपल्याला संत साहित्यातून, वाङमयामयातून समजते. आणि ते पुढे वाढत राहील असे त्यांनी सांगितले.

आधुनिक विचारांची विविध दालने आपल्यासमोर आली पाहिजेत. मानवी जीवनात काठिण्य कुठे असावे, कोवळीकता कुठे असावी हे ज्याला समजते त्याला जीवनातील विवेक समजतो. यासाठी नवीन पिढी ही विज्ञाननिष्ठच नव्हे तर आधुनिक विचारांचे संत साहित्य अभ्यासक असलेली निर्माण झाली पाहिजे. अशी अपेक्षा त्यांनी नव्या पिढीकडून व्यक्त केली.

वरील ग्रंथांना मा.डॉ. रामचंद्रजी देखणे यांच्या हस्ते पुरस्कृत करण्यात आले.

गट क्र. २ मध्ये - १) सृजनगंध, २) महाराष्ट्राचे विचारदुर्ग, ३) ओळख वेदांची

वरील सर्व ग्रंथांना संस्थेचे अध्यक्ष मा.नितीनभाई कारिआ यांच्या हस्ते पुरस्कृत करण्यात आले

गट क्र. ३ मध्ये - १) ज्ञानज्योती - ओवी पुन्हा नव्याने

२) दशग्रीव रावण एकादशमुखी हनुमान भाग -१

चिरंजीव अंजनीसुत हनुमान व रामायण भाग -२

३) जो संती वसविला ठावो

वरील ग्रंथसंपदेला मा. यशवंतराव लिमये यांच्या हस्ते पुरस्कृत करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान परीक्षक डॉ. विश्वासराव मोरे, पुरस्कृत डॉ. चंद्रकांत पोतदार, डॉ. मेधा गोसावी यांनी आपले मनोगत मांडले. श्री. रामचंद्रजी देखणे यांनी विविध अंगांनी संत साहित्याचा अभ्यास केला पाहिजे. संत साहित्याच्या चिंतनासाठी विविध क्षेत्रातील नव्या नव्या तरुणांनी पुढे येऊन संत साहित्याचा ठेवा लिखाणाच्या माध्यमातून पुन्हा मांडावा आणि पुरस्कारासाठी नवे नवे संदर्भ यावेत अशी आशा त्यांनी व्यक्त केली. अत्यंत रसाळ आणि मधुर वाणीने संत साहित्याचा अवघा पट उलगडून त्यांनी सर्वांसमोर मांडला.

✸✸✸

## ✻ अभिनंदन ✻

- **राष्ट्रीय कुस्ती स्पर्धा झारखंड - कु. यश रांजणे इ.१०वी अ ४१ किलो वजनी गटात कांस्यपदक प्राप्त झाले.**
- **कु. अर्णव देशमुख इ.१० वी याने औरंगाबाद येथे झालेल्या राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत (६८) किलो मध्ये रौप्य पदक मिळवले.**

# चिपळूण विस्तारकार्य



## ※ महापूर मदत कार्य

'आपत्तीतूनही संधी निर्माण होतात.' याचेच उदाहरण म्हणजे चिपळूणचा महापूर! साद देण्याच्या आधीच ज्ञान प्रबोधिनीचा प्रतिसाद आला. महापूर मदत कार्य हे संकट खूप मोठे होते. पण सगळ्यांच्या आधी आमची 'ज्ञान प्रबोधिनी' चिपळूणमध्ये पोहोचली. यामुळे खूपच दिलासा मिळाला आणि सर्वांच्या अंगात १० हत्तींचे बळ संचारले. ज्ञान प्रबोधिनीच्या कार्यकर्त्यांचे उत्कृष्ट नियोजन, अफाट मेहनत आणि योग्य स्वरूपाची मदत मिळाली. सर्वात आधी कार्यकर्त्यांनी घरे स्वच्छ केली. त्यामुळे त्यांचे मनोबल वाढून इतरांसाठी स्थानिक कार्यकर्ते हाकेला धावून गेले. पिण्याचे पाणी, अन्न-धान्य, कपडे आणि असंख्य गोष्टी सर्वात महत्वाची म्हणजे दवाखान्यांची स्वच्छता, विद्युत साहित्य वाटप, प्रथमोपचाराचे साहित्य वाटप इत्यादी सर्वेक्षण करून नेमकी मदत योग्य व्यक्तीपर्यंत पोहोचत होती. या सगळ्या मदतीसाठी आ. श्री. देवळेकर सर, आदित्यदादा, श्रीरामदादा या नावांचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. या सर्वांमुळे दळवटणे गावात पुराच्या वेळेस साहाय्य करता आले. यामुळे आता तिथल्या ग्रामस्थांची छान ओळख झाली.

श्री. देवळेकर सर, आदित्यदादाच्या मार्गदर्शनाखाली, निगडी व पुण्याहून कार्यकर्ते मदतीसह हजर झाले. त्यांचे नियोजन, तळमळ बघून खूपच आधार मिळाला. यामुळे चिपळूणचे काही युवक प्रबोधिनीशी जोडले गेले ही एक मोठी जमेची बाजू होय.

## ※ क्रीडा दल

लॉकडाऊनच्या काळात जेव्हा शाळा बंद होत्या तेव्हा जाणवले की मुले देवळात येऊन पत्ते खेळणे, तासनतास मोबाईल बघणे यात वेळ घालवत आहेत. हे बघूनच युवकांनी ठरविले की येथे आपण दल सुरू करायचे. यानुसार सौर भाद्रपद ७ शके १९४३ रोजी क्रीडा दल सुरू झाले. चार ते सहा या वेळात तीन ते चार युवक तिथे जातात. खेळ, गप्पा, पद्य म्हणणे असे नियमित चालू झाले. बेसबॉल खेळणे, पतंग बनवून उडविणे, विज्ञान प्रयोगातून खेळ खेळणे मासे पकडण्याचे प्रशिक्षण असे वेगळे पण छान उपक्रम इथे सुरू झाले.

## ❊ निवासी बैठक

आदित्यदादाच्या मार्गदर्शनाखाली भवितव्य लेखाविषयी एक दिवसीय निवासी बैठक झाली. भविष्य वेधशास्त्र, कल्पना विस्फोट, इस्रोचे उदाहरण या वेगवेगळ्या विषयांवर मार्गदर्शन झाले. केंद्राची रचना व जबाबदाऱ्या घेणाऱ्या व्यक्ती किंवा उपक्रम प्रमुख, केंद्र सहविचार समिती याविषयी आदित्यदादाने सुतोवाच केले. त्यानुसार केंद्र सहविचार समिती तयार झाली. त्यामुळे या कामाला आता आखीव रेखीव स्वरुप प्राप्त झाले आहे. नियोजनपूर्वक काम सुरु झाले आहे. चिपळूणचे कार्यकर्ते काही कार्याच्या निमित्ताने ज्ञानप्रबोधिनीच्या संपर्कात आलेले आहेत.

## ❊ संगीत संध्या

ज्ञान प्रबोधिनीच्या हितचिंतकानी एकमेकांशी परिचय व्हावा म्हणून त्रिपुरी पौर्णिमेच्या औचित्याने. 'फुल फुल गुंफूनीचं माळ होतसे.' ही संगीतसंध्या आयोजित केली होती. त्याच वेळी छोटा कलाकार उपक्रम घेण्याचे ठरले. एकाच दिवशी वेगवेगळ्या सहा शाळांमध्ये जाऊन आपल्या कलांचे रोटेशन पद्धतीने सादरीकरण करण्यात आले. शास्त्रीय संगीत, सुगम संगीत, तालवाद्य, पखवाज, नारदीय कीर्तन, हार्मोनियम यांचे सादरीकरण झाले. उद्देश हाच की मुलांना कलेविषयी आवड निर्माण व्हावी. कलेचे हस्तांतरण व्हावे, चांगले ऐकायची मुलांना सवय लागावी. ३०० विद्यार्थ्यांपर्यंत हे सादरीकरण पोहोचवता आले. कार्यक्रमाच्या समारोपासाठी निवडक सहभागी मुलांसाठी सांगीतिक कार्यशाळा झाली. दर्शन कुलकर्णी दादाची मार्गदर्शक मुलाखत झाली. सत्र घेणाऱ्या मार्गदर्शक दादांनी नवरसांचे सांगीतिक सादरीकरण केले. कार्यक्रमासाठी आलेल्या आदित्यदादा, शीतलताई यांनी मनोगत व्यक्त केले.

## ❊ मा. संचालकांची चिपळूण भेट

माननीय संचालकांची चिपळूण संपर्क केंद्र भेट वैयक्तिक तसेच गटाबरोबर मार्गदर्शक बैठका, गृहभेटी खूपच आनंददायी, प्रेरणादायी झाल्या. प्रत्येक गटाला मा. संचालकांनी उपयुक्त असे मार्गदर्शन केले. याशिवाय छोटे सायंटिस्ट, छात्र प्रबोधन, सौर दिनदर्शिका नोंदणी व वितरण ऑनलाइन पद्धतीने वाचन, स्वयं अध्ययन कौशल्य, गणपती आरती, अग्रणी प्रशिक्षण, शिक्षक प्रशिक्षण, आरोग्य विषयक व्याख्याने, युवती गट बांधणी, केंद्राचा भवितव्य लेख लेखन, नियमित साप्ताहिक उपासना याचाही समावेश आहे. माननीय संचालक, आदित्यदादा, नचिकेतदादा, सौगंधदादा यांचे मार्गदर्शन युवक व युवतींचा सहभाग यामुळे आम्हा सर्वानाच कार्य करण्यासाठी खूप उत्साह वाटत आहे !!!

✸✸✸

## ✻ अभिरुची – तंत्रशिक्षण ✻

पालकांचे मनोगत,

शिक्षण आणि विचार यांनी आयुष्य घडते, शिक्षणाने जगण्याची रोजीरोटीची व्यवस्था होते. शिक्षणाने आपले आयुष्य किती जगावे त्यापेक्षा कसे जगावे हे पूर्णत: कळते.

विशेषतः जसे ग्लास भर दुधामध्ये मूठभर साखर टाकली तर त्यात ती विरघळते पण दुध मात्र तेवढेच दिसते तसेच उत्तम तंत्र शिक्षणाने आयुष्य घडते.

शिक्षणाला जर तंत्रशिक्षणाची जोड मिळाली तर ते सुलभ व योग्य दिशेने स्वावलंबनाकडे नेते. वेदांतने तंत्रशिक्षण हा विषय घेतला त्यावेळी मी जास्त काही लक्ष दिले नाही. त्याची आई व तो विषय हाताळत होते, मी तंत्र शिक्षण घेण्यासाठी परवानगी दिली. काही दिवसांनी माझ्या लक्षात आले की त्याने घरातील नळ दुरुस्त केला त्यात त्याला टेफ्लॉन टेप समजू लागले, पोपट पान्हा वापरू लागला.

मला एक दिवशी त्याने न्यूट्रल काय असते ते टेबल फॅन दुरुस्त करताना सांगितले, मला त्याचे खूप आश्चर्य वाटले. ए.सी व डी.सी ऐकल्यावर मला ज्ञान प्रबोधिनीतून तंत्रशिक्षण विभागात किती चांगल्या प्रकारे शिक्षण दिले जाते याची पूर्ण कल्पना आली. तो स्वयंपुढाकाराने आलेल्या पाहुण्यांशी बोलतांना आश्चर्यच वाटले. आलेल्या पाहुण्यांच्या मुलांना कुठे तरी लीडरशिप घेण्याची तयारी दाखवत होता. शाळेतील माहिती व ड्रिलिंग व पॉलिशिंग बद्दल सांगत होता. त्याने फॅन दुरुस्त करण्यासही मदत केली. तो आता सायकल सर्व्हिसिंग करतो. तसेच तो लहान सहान कामे करतो. ट्यूब लावणे यांसारखी अनेक कामे मी नसताना करतो. सर्व सुरक्षा साधनांचा वापर करून कामे करतो हे तो आवर्जून सांगतो, इलेक्ट्रिकल काम करताना चप्पल किंवा लाकडी खुर्ची असावी फिरणाऱ्या पार्ट वर हात मोजे घालून काम करू नये असेही तो म्हणतो, सर्व तंत्रशिक्षण व शिक्षकांचे आभार या वयात एवढी सखोल माहिती व प्रशिक्षण दिल्याबद्दल धन्यवाद !

## Physics Abhiruchi

**Teacher: Vaishali Yelgaonkar**

In physics abhiruchi we decided to introduce some branches of physics to the students. In online mode it was little hard to get active involvement of students. We were trying to make it interesting by showing them videos,giving some tasks, activities, discussions. But in offline mode we decided to engage the students in activities and practicals. Students actively participated in the activities in the lab. Tried many experiments on their own. All the teachers shared their responsibilities.

## ✻ अभिनंदन ✻

केन्द्रीय विश्वविद्यालय, मुंबई यांच्या वतीने महाराष्ट्र राज्यस्तरीय संपूर्ण भगवद्‌गीता पाठांतर स्पर्धा कु. सुरात्री राणेने (इ.९ अ) द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

## ✻ अभिनंदन ✻

ज्ञानप्राप्ती, कौशल्य संपादन, सुयोग्य दृष्टिकोन आणि अभिरूची या मुख्य उद्दिष्टांवर आधारित क्रीडाकुल मध्ये मानस विभागातर्फे विविध तासिका घेण्यात आल्या. वरील मुख्य उद्दिष्टांच्या अंतर्गत उत्तम खेळाडू- विद्यार्थी वृत्तीघडण, कल्पकता वाढवणे, शब्दसंग्रह वाढवणे, उत्तम आदर्श डोळ्यासमोर ठेवणे, विविध कौशल्यांचे विकसन जसे निरीक्षण, कौशल्य, वाचन कौशल्य, कारक कौशल्य विकसन' एका जागी बसण्याची बैठक तयार होणे, इ. याच बरोबर प्रेरणा जागरण, शोधक वृत्तीचा विकास, सामाजिक बांधिलकी जोपासणे, उत्तम खेळाडू चरित्र जाणून घेणे इत्यादी विषयांवर आधारित सुनियोजित कृतीसत्र घेण्यात आली. या सर्वांसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. विविध व्हिडिओ क्लिप्स, फोटो, ऑडियो क्लिप्स, शॉर्ट फिल्म इत्यादींचा समावेश यामध्ये करण्यात आला. त्यामुळे खेळाडू विद्यार्थ्यांचा या तासिकांमधील अभिरूची टिकून राहण्यास खूप मदत झाली. प्रत्येक सत्रामधील विषय विद्यार्थ्यांपर्यंत व्यवस्थित पोहोचतो आहे ना हे बघण्यासाठी या सत्रांमधून 'मी काय शिकलो/ले' याबाबतचे लेखन करण्यास सांगण्यात आले होते.

Covid-१९ च्या प्रादुर्भावामुळे क्रीडाकुलचे खेळाडू विद्यार्थी प्रत्यक्ष मैदानावर तसे स्पर्धेमध्ये सहभागी होणे शक्य नव्हते. परंतु हा स्पर्धेचा अनुभव त्यांना देण्यासाठी प्रत्येक सत्रातून उत्तम कृती करणारे दोन खेळाडू विद्यार्थी निवडले गेले व त्यांना 'स्टार ऑफ द वीक'असे सर्टिफिकीट देण्यात येत होते.

मानसच्या तासाला ज्या कृती करून घेतल्या जात आहेत त्याबाबत पालकांना माहिती होण्यासाठी सत्राचा हेतू उद्देश, घेतलेली कृती व त्याचे फलित अशा स्वरूपात सत्राचा सारांश पालकांच्या whats app गटावर पाठवण्यात येत होता. तसेच प्रत्येक सत्रातील 'स्टार ऑफ द वीक' हे सर्टिफिकेटही गटावर पाठवण्यात येत होते.

ऑनलाइन शिक्षणातील पालकांची गंभीरता टिकून राहण्यासाठी विविध पालक मार्गदर्शनपर लेखांमधून पालकांशी संवाद साधण्यात आला.

वर्षभर घेण्यात आलेल्या मानस सत्रांची परिणामकारकता तपासण्यासाठी काही पालकांच्या प्रातिनिधिक स्वरूपात मुलाखती घेण्यात आल्या, तसेच उर्वरित पालकांकडून गुगल फॉर्म भरून घेण्यात आला यावरून विविध विषयांवरील मानस सत्रांची परिणामकारकता लक्षात आली वर्षभर घेतलेल्या मानस सत्रांवर आधारित मूल्य कलाशिक्षणातील माझे विविध या अंतर्गत 'मानस सत्रातील अनुभव शिक्षण' या विषयावर शोधनिबंध लिहिण्यात आला. लवकरच या शोधनिबंधाचे सादरीकरण करण्यात येणार आहे.

सौ. आरती सु. खोत (मानसतज्ज्ञ)

## पूर्व माध्यमिक

- पूर्व माध्यमिक विभागातील सहविचार सदस्या सौ. स्मिता माने शिक्षणशास्त्र विषयाच्या UGC नेट परीक्षेत ९९.६३ percentile मिळवून उत्तीर्ण झाल्या.

  तसेच Asymmetritc या US शैक्षणिक संस्थेने आयोजित केलेल्या online शिक्षक प्रशिक्षण उपक्रमासाठी त्यांची निवड करण्यात आली. त्यांनी हा सहा महिन्याचा प्रशिक्षण वर्ग विशेष श्रेणीत पूर्ण केला.

## माध्यमिक मराठी

इ.८ वी शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी – सृजा खातू ८५.९० % गुण प्राप्त करून राज्यात २६ वी

- मोरया शिक्षण संस्था आयोजित राज्यस्तरीय अभिवाचन स्पर्धेत सांज भागवत (इ.९ अ) – प्रथम क्रमांक, अथर्व अभोणकर (इ. ८ ब) – द्वितीय क्रमांक, स्वरा दिकोंडा (इ.९ क) – उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले आहे.
- खानदेश अहिराणी कस्तुरी साहित्य सांस्कृतिक कला क्रीडा मंच पुणे आणि कै शिवाजीराव देशमुख शैक्षणिक व सामाजिक संस्थेद्वारे महाराष्ट्र सौंदर्य सम्राज्ञी आणि सम्राट महाराष्ट्राचा पर्व ३ रे आयोजित स्पर्धेत पूर्व प्राथमिक विभागातील *सौ सुरेखा दयाराम क्षीरसागर* हिने महाराष्ट्राची प्रथम उपविजेती होण्याचा मान पटकावला.

## माध्यमिक इंग्रजी

- सिटी प्राईडतर्फे आयोजित Student pof the year या आंतरशालेय स्पर्धेत माध्यमिक इंग्रजी विभागाच्या विद्यार्थ्यांनी विविध फेऱ्यांमध्ये यश संपादित केले.
- पृथ्वीराज जाधव (इयत्ता नववी) या विद्यार्थ्याने individual case study या फेरीमध्ये तृतीय क्रमांक मिळविला.
- आत्मजा महाजन, अश्विन देवळेकर, मिहिका चौधरी, पिनाक चिंचोळकर या इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांच्या गटाने Branding round मध्ये द्वितीय क्रमांक मिळविला.
- इयत्ता नववीची विद्यार्थिनी जिज्ञासा चौधरी हिने जिल्हास्तरीय SB चषक मिळवला.

## अटल

- अटल धडपडालयाचा प्रकल्प (Project Business Model Development) ATL Tinker Prenour च्या राष्ट्रीय स्तरावरील प्रकल्पांमध्ये १५व्या क्रमांकावर निवडला.
- "ATAL Community Innovation Center." या केंद्र पुरस्कृत संस्थेकडून जैवतंत्रज्ञान विभागाची अधिकाधिक संशोधन करण्यास आणि ते कार्य समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी निवड झाली.

# Donor's List

| | |
|---|---|
| Shri Ashok Kallappa Jadhav | 5000.00 |
| Shri Uday Rangnath Vipradas | 5000.00 |
| Shri Jitendra Dadaram Dhavan | 5000.00 |
| Shri Yogesh Joshi | 5000.00 |
| Shri Sachin Shahaji Pawar | 5000.00 |
| Smt.Padmashree Dhanaraj Upadhye | 5000.00 |
| Shri.Shekhar Nivrutti Pawar | 5000.00 |
| Smt.Smita Vikas Pawar | 5000.00 |
| Shri.Yoganand Phadake | 5000.00 |
| Shri Maheshshankar Diwan | 5000.00 |
| Shri.Dattatraya Bhanudas Nikam | 5000.00 |
| Smt.Sharayu Sunil Nikam | 5000.00 |
| Shri Shriprasad Kulkarni | 5000.00 |
| Smt.Sandhya Santosh Suryawanshi | 5000.00 |
| Smt.Swati jpnv | 5000.00 |
| Shri. Sunil Zanzane | 5000.00 |
| Smt.Anuradha Shrikrishna Gore | 5000.00 |
| Shri. Kishor Jagannath Vaze | 5000.00 |
| Shri. Abhijeet Ramdhave | 5000.00 |
| Shri.Santosh Sawant | 5000.00 |
| Shri.Amit Jaganade | 5000.00 |
| Shri.Sudhir Patil | 5000.00 |
| Shri.Hrishikesh Deshmukh | 5000.00 |
| Smt.Anjali Chincholkar | 5000.00 |
| Shri.Sanjay Kalkar | 5000.00 |
| Smt.Swati Dalavi | 5000.00 |
| Shri.Vasant Terwadkar | 5000.00 |
| Shri.Amit Bagaitkar | 5000.00 |
| Shri.Atul Kale | 5000.00 |
| Dr. Ashok Kunnure | 5000.00 |
| Smt. Pallavi Gore | 5000.00 |
| Shri. Abhijit Laghate | 5000.00 |
| Shri. Pradeepkumar Patil | 5000.00 |
| Shri. Shurpali Smita | 5000.00 |
| Smt.Renuka Pendse | 5000.00 |
| Smt.Achala Phadke | 5000.00 |
| Shri. Mukund Gadgil | 5000.00 |
| Shri. Dhiraj Dhakad | 5000.00 |
| Smt.Hemalata Thatte | 5000.00 |
| Shri. Ashish Joshi | 5000.00 |
| Shri. Ashish Shalu | 5000.00 |
| Smt.Anuja Joshi | 5000.00 |
| Smt.Vishakha Velankar | 5000.00 |
| Smt. Suhasini Biwalkar | 5000.00 |
| Smt.Swatee Halbe | 5000.00 |

| | |
|---|---|
| Shri. Dinesh Pethe | 5000.00 |
| Shri. Vishwnath Puranik | 5000.00 |
| Shri. Dayanand Zomte | 5000.00 |
| Smt. Saroja Vishwanathan | 5000.00 |
| Shri. Keshav Vaze | 5000.00 |
| Shri. Sayali Soman | 5000.00 |
| Shri. Vinayak Gokhale | 5000.00 |
| Smt. Suruchi Pawar | 5000.00 |
| Smt.Shubhada Alekar | 5000.00 |
| Smt.Kimaya Siddhabhatti | 5000.00 |
| Shri. Mukund Joshi | 5000.00 |
| Shri. Bhushan Dongre | 5000.00 |
| Shri. Prafulla Hande-Deshmukh | 5000.00 |
| Shri. Chintaman Jog | 5000.00 |
| Shri. Purushottam Tamhankar | 5000.00 |
| Shri. Souman Biswas | 5000.00 |
| Shri. Kunal Patil | 5000.00 |
| Smt.Kalyani Kulkarni | 5000.00 |
| Smt.Smita Nabar | 5000.00 |
| Shri. Mandar Bapat | 5000.00 |
| Shri. Prakash Todne | 5000.00 |
| Smt.Shobhana Kane | 5000.00 |
| Shri. Keshav Vaze | 5000.00 |
| Smt.Janhavi Bhave | 5000.00 |
| Shri. Vikrant Nagarkar | 5000.00 |
| Shri. Lalit Shimpi | 5000.00 |
| Smt.Seemantini | 5000.00 |
| Smt.Pratibha Gadre | 5000.00 |
| Smt.Anjana Rajan Wadikar | 5000.00 |
| Smt.Kalpana Hardikar | 5000.00 |
| Smt.Bhagyashree Paradkar | 5000.00 |
| Shri. Mahesh Bond | 5000.00 |
| Smt.Punam Kabadi | 5000.00 |
| Shri. Bhalchandra Satwik | 5000.00 |
| Shri. Rajendra Kulkarni | 5000.00 |
| Shri. Rajesh Bapaye | 5000.00 |
| Shri. Keshav Vaze | 5000.00 |
| Shri. Omkar Upasani | 5000.00 |
| Smt.Shilpa Dhumal | 5000.00 |
| Smt.Deepali Kelekar | 5000.00 |
| Smt.Megha Butala | 5000.00 |
| Shri. Parth Bapaye | 5000.00 |
| Smt.Varsha Bondre | 5000.00 |
| Shri. Mukund Mate | 5000.00 |
| Shri. Dhananjay Shahane | 5000.00 |

| | |
|---|---|
| Smt.Pratiksha Patankar | 5000.00 |
| Smt.Akanksha Junawane | 5000.00 |
| Shri. Amit Kondhare | 5000.00 |
| Shri. Anil Varna | 5000.00 |
| Shri. Vivek Deshpande | 5000.00 |
| Shri. Suresh Vaze | 5000.00 |
| Shri. Rajesh Nadkarni | 5000.00 |
| Smt.Mangala Khadilkar | 5000.00 |
| Shri. Shriniwas Mahabal | 5000.00 |
| Smt. Nikhila Rahul Shirodkar | 5000.00 |
| Smt. Meenal Deshpande | 5001.00 |
| Smt.Sharada Bhope | 5001.00 |
| Shri. Vijaykumar Bhagat | 5001.00 |
| Smt.Amruta Bari | 5001.00 |
| Smt. Madhuri Datar | 5001.00 |
| Shri. Omkar Kulkarni | 5001.00 |
| Shri. Ashok Kulkarni | 5001.00 |
| Smt.Bhagyashree Sane | 5001.00 |
| Shri. Mukund Sahastrabuddhe | 5001.00 |
| Shri. Saurabh Deshmukh | 5024.00 |
| Shri. Sachin Suresh Deshpande | 5101.00 |
| Shri. Aditya Deshpande | 5300.00 |
| Shri. Abhishek Jog | 5320.00 |
| Aapulki | 5500.00 |
| Smt. Anita Gaikwad | 6350.00 |
| Shri. Dnyandeo Dattatray Borude | 6400.00 |
| Smt.Nilima Dixit | 6500.00 |
| Smt.Yutika Patwardhan | 7000.00 |
| Smt.Anuja Upasani | 7000.00 |
| Shri. Dinkar Patil | 7000.00 |
| Shri. Shantiling Gabhane | 7000.00 |
| Shri. Anil Paranjape | 7500.00 |
| Smt.Pooja Kakade | 8000.00 |
| Shri Gaurishankar Manohar Jadkar | 9000.00 |
| Smt.Sarita Arun Sane | 9000.00 |
| Dr. Jayashri Raju Kotwal | 10000.00 |
| Jnana Prabodhini Sevak Sahakari Patsanstha | 10000.00 |
| Smt. Vishakha Kalsur | 10000.00 |
| Dr. Pradnya Vikram Khare | 10000.00 |
| Smt. Vandan Shrikrishna Karambelkar | 10000.00 |
| Shri. Aditya Prashant Aher | 10000.00 |
| Smt. Vidya Devendra Udas | 10000.00 |
| Shri. Vikram Shivaji Bhosale | 10000.00 |
| Smt. Usha Shashikant Kotnis | 10000.00 |
| Aim Plast | 10000.00 |
| Shri. Mandar Gopal Damale | 10000.00 |

| | |
|---|---|
| Smt.Manjiri Padhye | 10000.00 |
| Smt.Anuja Ashotosh Bhandari | 10000.00 |
| Shri. Yuvaraj Wagade | 10000.00 |
| Shri. Avinash Bhate | 10000.00 |
| Shri. Ravindra Joshi | 10000.00 |
| Innovative Chem Tech (Medha Madhekar) | 10000.00 |
| Shri. Yogeshwar Bodas | 10000.00 |
| Shri. Gunesh Satish Patil | 10000.00 |
| Shri. Pradeep Deo | 10000.00 |
| Shri. Santosh Danavale | 10000.00 |
| Smt.Yogini Kulkarni | 10000.00 |
| Shri. Narendra Deshmukh | 10000.00 |
| Shri. Dnyaneshwar Petkar | 10000.00 |
| Shri. Suhas S Cholkar | 10000.00 |
| Shri. Mahesh Damle | 10000.00 |
| Smt.Mukta Kuulkarni | 10000.00 |
| Shri. Ashutosh Adkar | 10000.00 |
| Smt.Aditi Gosavi | 10000.00 |
| Smt.Kunda Joglekar | 10000.00 |
| Shri. Yogesh Joshi | 10000.00 |
| Shri. Umesh Abhyankar | 10000.00 |
| Smt.Sneha Pethe | 10000.00 |
| Shri. Vinod Kulkarni | 10000.00 |
| Shri. Saurabh Vaze | 10000.00 |
| Shri. Shrinivas Palande | 10000.00 |
| Shri. Shripad Choudhari | 10000.00 |
| Smt.Sunanda Joshi | 10000.00 |
| Smt.Seeka Modak | 10000.00 |
| Smt.Anjali Kale | 10000.00 |
| Shri. Sudhir Chitnis | 10000.00 |
| Smt.Nalini Modak | 10000.00 |
| Smt.Devayani Joshi | 10000.00 |
| Shri. Suresh Patwardhan | 10000.00 |
| Smt.Nutan Waykar | 10000.00 |
| Shri.Kiran Gadre | 10000.00 |
| Shri. Prasanna Gandhi | 10000.00 |
| Shri. Hemant Gokhale | 10000.00 |
| Smt.Shilpa Savkur | 10000.00 |
| Shri. Ishant Kunkolikar | 10000.00 |
| Smt.Sangeeta Karlekar | 10000.00 |
| Smt.Varsha Keskar | 10000.00 |
| Shri. Bhushan Zinzuwadia | 10000.00 |
| Shri. Sangram Bhosale | 10001.00 |
| Shri. Pratik Prakash Bhise | 10001.00 |
| Shri. Makarand Chhapekar | 10100.00 |
| Shri. Vasant N Terwadkar | 11000.00 |

| | |
|---|---|
| Smt. Sharada Deokar | 11000.00 |
| Shri. Manoj Vasant Deolekar | 11000.00 |
| Shri. Ashok Gulabrao Kamthe | 11000.00 |
| Shri. Darshana Vijay Tarak | 11000.00 |
| Shri. Mohan Damle | 11000.00 |
| Shri. Subhash Kularni | 11000.00 |
| Shri. Dhondiba Y Pansare | 11111.00 |
| Smt.Kavita Swapnil Bagul | 11111.00 |
| Shri. Swapnil Vilas Jamdade | 15000.00 |
| Shri. Jaydeep Chandrakant Sawadekar | 15000.00 |
| Shri. Kunal Purushottam Kulkarni | 15000.00 |
| Shri. Milind Arvind Padhye | 15000.00 |
| Smt.Tejashree Pradeep Paranjape | 15000.00 |
| Shri. Anil Nesari | 15000.00 |
| Shri. Nitin Kulkarni | 15000.00 |
| Smt.Pradnya Erande | 15000.00 |
| Smt.Shriya Deshpande | 15000.00 |
| Smt.Kamalakar Hari Shukla | 15000.00 |
| Shri. Harshal Choudhari | 15001.00 |
| Shri. Swapnil Vilas Jamdade | 15500.00 |
| Shri.vivek Peshave | 15500.00 |
| Sharp Engineering | 16180.00 |
| Lions Club Of Poona Nigdi | 16500.00 |
| Shri. Kishor Dattatray Deshmukh | 35500.00 |
| Shri. Trunal Vishwanath Dighe | 20000.00 |
| Smt. Sangeeta Banginwar | 20000.00 |
| Apra Deodhar | 20000.00 |
| Smt.Vedavati Katkar | 20000.00 |
| Smt.Deepti Waghmare | 20000.00 |
| Nikhil Engineers | 20000.00 |
| Shri. Yogesh Sewak | 21000.00 |
| Shri. Vinayak Patwardhan | 21000.00 |
| Smt.Swati Kale | 21000.00 |
| Smt. Chhaya Sandeep Kale | 21100.00 |
| Smt. Vinaya Shankar Vaze | 25000.00 |
| Shri. Nagmani Murthy Katta | 25000.00 |
| Smt. Ashwini Subhash Inamdar | 30000.00 |

| | |
|---|---|
| Shri. Jay Apparao Aherkar | 25000.00 |
| Shri. Raghvendra Ravindra Sandhane | 25000.00 |
| Shri. Nitin Phatak | 25000.00 |
| Shri. Anil Bhide | 25000.00 |
| Shri. Sameer Bhave | 25000.00 |
| Shri. Rahul Deshpande | 25010.00 |
| Questern Tours | 27000.00 |
| Shri. Vivekanand Vinayak Kapshikar | 28000.00 |
| Inner Wheel Club Of Nigdi Pride | 30000.00 |
| Smt.Jaya Sagade | 30000.00 |
| Shri. Avadhoot H. Gurav | 32000.00 |
| Dr. Kedar Kulkarni | 35000.00 |
| Shri. Shashank Chandorkar | 50000.00 |
| Shri. Sushil Keshavrao More Huf | 50000.00 |
| Smt. Mangala Anant Sewak | 50000.00 |
| Smt. Deepti Pravin Waghmare | 50000.00 |
| Shri. Swanand Shende | 50000.00 |
| Dhanwantari Medical Foundation | 50000.00 |
| Smt.Gayatri Sevak | 60000.00 |
| Shri. Prasanna Mangesh Karandikar | 57000.00 |
| Durga Devi Charitable Trust | 60000.00 |
| Pradeept Bharat Foundation | 86500.00 |
| Shri. Rajiv Balwant Ranade | 100000.00 |
| Shri. Purushottam Laxman Patil | 100000.00 |
| Shri. Vasant D Patil | 100000.00 |
| Shri. Gulab Dharmaji Walhekar | 100000.00 |
| Shri. Suresh Trimbak Gijare | 100000.00 |
| Shri. Sudhir Tukaram Patil | 100000.00 |
| Shri. Anup Avinash More | 150000.00 |
| Smt. Pratibha Arjun Joshi Dalal | 300000.00 |
| Shri. Ajay Narhar Yervadekar | 500000.00 |
| Raviraj Hi-Tech Pvt. Ltd | 500000.00 |
| Prabodh Arth Sanchay | 1000000.00 |
| Matrumandir Vishwast Sanstha | 3561000.00 |
| Shri Nitin Ratilal Karia | 7725000.00 |
| Prabodh Arth Sanchay Pvt Ltd | 1132000.00 |

✸✸✸

**ज्ञान प्रबोधिनी फाऊंडेशने** (JPF) "Sponsor A Child" **या उपक्रमाच्या अंतर्गत २०२१-२२ या शैक्षणि ५ वर्षासाठी कोविड महामारीच्या काळात रु.२८,५७,६००/- ची देणगी दिली. यामध्ये १३४ विद्यार्थ्यांना काही ना काही रक्कम शिष्यवृत्ती मिळाली. कोविडच्या या कठीण काळातही आपल्या साहाय्यामुळे होतकरू विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबले नाही.**

**ज्ञान प्रबोधिनी फाऊंडेशने दिलेल्या या देणगीसाठी फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रणव कुलकर्णी आणि सर्व सदस्यांचे मन:पूर्वक धन्यवाद!**

AIM आयोजित दिल्ली येथे झालेल्या
आजादी का अमृत महोत्सव या कार्यक्रमात
सहभागी होताना अटल धडपडालय
यातील श्री. कल्पेश कोठाळे





हेरिटेज फाऊंडेशन ऑफ आर्ट आणि कल्चर,
बंगलोर तर्फे आयोजित
जागतिक आंतरशालेय कथ्थक नृत्य स्पर्धेत
पाचवे पारितोषिक प्राप्त कु. रितू गोखले

विजयादशमीच्या निमित्ताने
मुक्तीसोपान विभागातर्फे
आयोजित केलेले वाद्यपूजन











PRABODH
24477503